मा। २६१ अंक ५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — ग्रंथमाला

संपादक —

मासिक क्रमांक — सन —

अंक —

(महिने)

# ग्रंथमाला
१९०१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

प्रकाशक

[illegible]

[illegible]

निबंध २

निबंधलेखक

यांनी लिहिले

ते

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

पं. III-३०/३५

# धर्मदृष्ट्या कांहीं विचार

धर्म हा विषय फार महत्वाचा व गहन आहे, त्याचर कितीही लिहिलें व बोललें तरी पुरें व्हावयाचें नाहीं. आजपर्यंत कित्येकांनीं लिहिलें आहे व पुढेंही लिहितील. हा विषय कधींच जुना व्हावयाचा नाहीं. याचा नेहमीं घोष व वादविवाद हा चाललाच पाहिजे. आज जवळ जवळ जगाच्या आरंभापासून या विषयाचा विचार मोठमोठे तत्वज्ञानी, मोठमोठे वेदान्ती, शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुज, तसेंच विलायतेचे कॉम्ट्, मिल्ल, बटलर, स्पेन्सर, सेजविक् वगैरे तत्वज्ञानी यांनीं यावर जे गहन विचार केलेले व लिहून ठेवलेले आहेत तेच वाचतां वाचतां आपलें आयुष्य पुरें पडणार नाहीं. असें असून मी यःकश्चित् मनुष्य अशा गहन विषयावर काय लिहिणार आहें? तरी पण जें कांहीं आपण वाचतों, ऐकितों व पहातों तें दुसऱ्यास सांगावें व त्यापासून होतां होईल तों आपलें ज्ञान वाढवावें व लोकांसही त्यापासून उपयोग व्हावा असें जें रामदासांनीं ह्मटलें आहे त्या हेतूनें आज मी चार शब्द लिहिण्याचा विचार केला आहे.

धर्म या शब्दांत दोन गोष्टींचा समावेश होतो. एक पदार्थांच्या अंगचा धर्म ह्मणजे त्यांचे ठायीं असलेला गुण किंवा कर्तव्यशक्ति हा एक व दुसरा मनुष्याचा परमात्म्याशीं संबंध हा दुसरा. यां पैकीं आज आपल्यास पहिल्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. दुसऱ्या गोष्टीचाच फक्त आज विचार कर्तव्य आहे. मनुष्यानें पाळावयाचा जो धर्म, ज्या धर्मांत तो उत्पन्न झाला, ज्या धर्मांत जीवात्म्याचा परमात्म्याशीं संबंध जोडलेला आहे, ज्या धर्मापासून मनुष्याचें साधारण समाधान होतें व व्हावें, ज्या धर्मामुळें त्याचें मन दृढतर होऊन त्यास सुमार्ग दिसावा, त्या धर्माचा आज थोडासा विचार कर्तव्य आहे. ज्या धर्माच्यायोगानें

मनुष्यास कांहीं बंधन किंवा आळा राहतो तो धर्म. या धर्माची कल्पना कशी काय निघाली याचें बरेंचसें दिग्दर्शन, कै० प्रि० अगरकर यांनीं आपल्या जगन्मान्य लेखांनीं विलायतेंतील हरबर्ट स्पेन्सर यांच्या विचारांच्या साहाय्यानें प्राकृत वाचकांकरितां मराठींत वेळोवेळीं केलेलें आहेच, त्यावरून कळून येणारी आहे.

प्रथमतः मनुष्य या सृष्टींत उत्पन्न झाल्याबरोबर त्याची दृष्टि प्रथम आपले स्वतःकडे वळली व ह्मणून प्रथम त्यास आपली शक्ति कळून येऊं लागली. नंतर तो आपले आसपास व सभोंवती असलेल्या अफाट व विस्तृत अशा ज्या वस्तू त्या वस्तूंची अपूर्व शक्ति व आश्चर्यकारक क्रिया पाहून त्यांविषयीं त्याच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. सूर्योदय झाल्याबरोबर दिनमणि व्योममार्गें जसजसा वर येऊं लागला तसतसा तो मनुष्याचें चित्त जास्त आकर्षण करूं लागला. व त्याची अपूर्व व अघटित शोभा पाहून हाच देव असावा अशी कल्पना त्याच्या मनांत उत्पन्न झाली. याप्रमाणें नद्या, डोंगर, चंद्र, आकाश, प्रचंड वृक्ष, खोल दरी वगैरे यांपैकीं प्रत्येक गोष्ट आपल्या विशालत्वानें मनुष्याच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न करूं लागली. अशा रीतीनें सृष्टींत अघटित असें जें जें त्यास दिसलें त्याचेविषयीं देवत्वाची कल्पना त्याचे मनांत आली. जसें हल्लींही आपण आपल्यापेक्षां विद्वान्, वयोवृद्ध, तपोवृद्ध अशा मनुष्यास पूज्य मानतों, तद्वत्च प्राचीन मनुष्यांच्या आटोक्याबाहेरच्या ज्या शक्ती त्यांविषयीं त्या काळच्या मनुष्यांच्या मनांत साहजिक पूज्यबुद्धि जागृत झाली. या शक्ति मनुष्यास जगाचें ज्ञान करून देण्यास फार चांगल्या उपयोगीं पडल्या. ही ज्ञान वाढविण्याची त्यांची जिज्ञासा जसजशी जास्त वाढूं लागली. तसतशा कांहीं नवीन देवता त्यांचे आढळण्यांत आल्या. मनुष्याचें पाऊल पुढें टाकितांना पुढें काय आहे हें पहाण्यांत एखादे वेळीं त्यास भीति उत्पन्न होते. त्या भीतीची किंवा भयकारक शक्तीची ह्मणजे ज्या वस्तूपासून भीति उत्पन्न होते त्या भीत्युत्पादक वस्तूची किंवा शक्तीची एक निराळी देवता झाली. मनुष्याचे मनांत

देवतेची कल्पना उभी राहिली ह्मणजे आसपासच्या देवतारूप धारण केलेल्या सर्व वस्तूंना आपल्याप्रमाणेंच क्रिया करावयास लावितात. याला इंग्रजींत तत्ववेत्त्यांनीं Anthropomorphism असें ह्मटलें आहे. याचा अर्थ त्या त्या देवतेला मनुष्य आपलें रूप देतो. मनुष्याला आकार, इंद्रियें, रूप आहे. त्याप्रमाणें देवालाही आकार, रूप, इंद्रियें आहेत असें समजून लोक त्याची भक्ति करितात. आपल्यास भूक लागते तशीच देवालाही भूक लागते, ह्मणून त्यास नैवेद्य दाखवितात वगैरे वगैरे.

ही देवाची कल्पना अशीच पुढें वाढत गेली. तीच पुढें मनुष्यामनुष्यांत युद्धप्रसंग होऊं लागले त्यावेळीं प्रत्येक बाजूचे प्रत्येक देशाचे देव निराळे येथपर्यंत येऊन पोंचली. या गांवच्या सीमेचा देव निराळा, त्याच्या पुढल्या गांवचा निराळा. हा एक देव कोपला तर त्याचे हद्दींतून दुसऱ्याचे हद्दींत गेलें असतां कांहीं अपाय होणार नाहीं, इतकेंच नाहीं, तर ज्याचे हद्दींत जावें तो देव, ज्याचे हद्दींतून आला त्या देवाशीं आपलेकरितां झगडेल. ह्मणून एकाचे हद्दींतून दुसऱ्याचे हद्दींत जावें अशी पूर्वीच्या लोकांची कल्पना होती.

वर भीत्युत्पादक देवतेची कल्पना कशी आली हें सांगितलेंच आहे. तशीच आपलें प्रिय करणारी, आपल्यावर अनुग्रह करणारी अशी एक देवता आहे अशी ही भावना वर सांगितलेल्या भावनेबरोबरच आली. अशा रीतीनें या दोन देवता प्रथम उत्पन्न झाल्या. एक चांगल्या गोष्टी करणारी व एक वाईट गोष्टी करणारी किंवा भीति दाखविणारी किंवा दुःख देणारी. या दोन देवतांपासून पुढें अनंत देवता उत्पन्न झाल्या. या दोन देवता ख्रिस्तीधर्मांत God आणि Satan या तऱ्हेनें दृष्टीस पडतात. पारसिकधर्मांत Ormuz आणि Ahri--man या दोन देवता होत. आपल्या हिंदुधर्मांत देव आणि दैत्य अथवा सुर आणि असुर हे होत.

अशी ही धर्मकल्पना पुढें कालावधि लोटल्यावर व्युत्क्रमपंथानें (Evolution Theory) इतर गोष्टीसारखी वाढत जाऊन कांहीं एक काळापूर्वीं बरीच उन्नतावस्थेप्रत पावली होती व पुढें पुढें त्याची उन्नतावस्था इतकी वाढली कीं, आपले पितर, आपले इष्टमित्र, आपला एखादा तिऱ्हाईत पण आपणांस पूज्य झालेला मनुष्य, फार तर काय एखादें आवडतें जनावर किंवा एखादा पक्षीसुद्धां देव होऊन बसूं लागला. अशा या अतिशयत्वामुळें (अति सर्वत्र वर्जयेत्) मुळांत एखाद्या गोष्टीचें महत्व नाहींसें होतें असें आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें. सागर जो एवढा परम पूज्य मानितात त्यांत मोऱ्यांचें पाणी सोडिलेलें असतें. दूरच्या लोकांस काशीसारखें ठिकाण परमपूज्य वाटतें, पण प्रत्यक्ष तेथें रात्रंदिवस अनाचार चाललेले असतात. एखादे वृद्ध आजोबा आपल्या नातवास सांगत असतात 'अरे तें तीर्थ व तो निर्माल्य पायदळीं पाडूं नकोस' पण एखाद्या देवळांत जाऊन पहावें तर बेलफुलांच्या राशीच्या राशी व तीर्थाचे पाट दर्शनास आलेल्या लोकांच्या पायाखालीं तुडविले जात असतात. यावरून ह्मणजे सागरास पूज्य मानूं नये, काशीस जाऊं नये, तीर्थ व निर्माल्य पायदळीं जाऊं द्यावा व वर आजोबांनीं नातवास सांगितलें तें अगदीं चुकलें असें मुळींच ह्मणावयाचें नाहीं; पण कधीं कधीं अतिरेकापासून जे वाईट परिणाम घडतात ते टाळले पाहिजेत येवढेंच येथें सांगावयाचें.

सर्व देशांत सर्व धर्मांत नेहमीं दोन पक्ष असतात. ते पक्ष ह्मणजे नवे व जुने; रिफॉर्मर आणि नॉन्‌रिफॉर्मर किंवा लिबरल आणि कान्सर्व्हेटिव्ह हे होत. या दोन्ही पक्षांचा आपण थोडासा विचार करूं. पहिला पक्ष:—"आपले पूर्वज मूर्ख, आपले पूर्वज गाढव" असें ह्मणणारे कोण असतील ते असोत, पण असेंही ह्मणणारे कांहीं आहेत. त्यांच्या दृष्टीनें जुनें तितकें वाईट व नवें तितकें चांगलें. दुसरा पक्ष—'आपले पूर्वज फार शहाणे होते, त्यांचे वेळीं जो कांहीं शहाणपणा होता

म.भा. ३०/३८

त्याच्या शतांश देखील आतां नाहीं" असें ह्मणणारांचा. यांस उद्देशून एका कवीनें ह्मटलें आहे "तातस्य कूपोयमिति ब्रुवाणाः क्षारं जलं का पुरुषाः पिबंति"

'आमचा धर्म ह्मणजे गाढवपणा आहे, आमचीं पुराणें ह्मणजे शिमगा आहे' वगैरे अनर्गल प्रलाप करणाऱ्यांचा पहिला पक्ष व वडिलांच्या विहिरीचें पाणी खारें असलें तरी गोड समजून पिणें भाग आहे किंवा वडिलांप्रमाणेंच आपणही कच्छ सोडून वैश्वदेव करणें भाग आहे' असें ह्मणणारा दुसरा पक्ष. या दोन्हीं पक्षांस मीं नांवें ठेवूं इच्छित नाहीं; पण मला मोठ्या कष्टानें व जुलमानें असें ह्मणणें भाग पडतें कीं, हे दोन्ही तट जरा वाहवले आहेत. असें ह्मटलें तरी त्याची जबाबदारी मी आपल्यासारख्या क्षुल्लक माणसाकडे घेत नाहीं व घेऊन तरी माझें अल्पज्ञाचें कोण ऐकणार? ह्मणून कविकुलगुरूचा आधार देऊन आपल्यास मोकळें करून घेऊन पुढील विवेचनास लागतां येईल. कविकुलगुरु कालिदासांनीं ह्मटलें आहे. 'पुराणमित्येव न साधु सर्वम् नचापि काव्यं नवमित्यवद्यम् । सन्तः परिक्ष्यान्यतरद्भजन्ते । मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ।

अलीकडे असा एक आरोप ऐकूं येऊं लागला आहे कीं, आपण दिवसानुदिवस धर्मलंड किंवा धर्मभ्रष्ट होत चाललों आहोंत. त्या आरोपाची सत्यता कितपत दृष्टोत्पत्तीस येते ती पाहूं.

प्राचीनकाळीं स्वधर्म स्वधर्म ह्मणून जो कांहीं एक प्रकारचा पूज्यतादर्शक विचार किंवा मनाची समजूत बाणून गेली होती, त्यामुळें पूर्वींच्या लोकांत एकप्रकारचें तेज झळकत असे. ते आपल्या धर्माकरितां प्राणही देण्यास तयार असत. इतकी त्यावेळच्या लोकांची धर्माविषयीं श्रद्धा व पूज्यता होती. ह्मणून त्यावेळचे धर्मप्रचारक किंवा अधिकारी यांणीं अशी युक्ती काढली कीं, धर्माज्ञा करतांना किंवा धार्मिक कायदे करितांना सर्वांस इष्ट वाटणाऱ्या सुधारणा किंवा गोष्टी धर्माज्ञांच्या रूपानें एकत्र

गोंवून दिल्या. उदाहरणार्थ आरोग्याच्या दृष्टीनें, वैद्यकाच्या दृष्टीनें, युक्तीच्या दृष्टीनें, व्यावहारिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें ज्या ज्या गोष्टी श्रेयस्कर व इष्ट अशा वाटल्या त्या धर्माज्ञा म्हणून सांगितल्या. आणि खरोखर तें फार दूरदर्शीपणाचें होतें. कारण धर्मासारखी परम पूज्य वस्तू किंवा बंधन मनुष्यास नसतें, व इतर व्यावहारिक पण धर्माइतक्याच इष्ट बंधनाचा परिणाम मनुष्याचे मनावर त्यांच्या नुसत्या शुद्धरूपानें झाला नसता, इतका तीं बंधनें धर्मांत गोंवून दिल्यामुळें झाला व अजून साधारणपणें होत आहे. अशा रीतीनें सर्व गोष्टी यथासांग आचरल्या जाव्या म्हणून पूर्वकालीन लोकांनीं धर्मांत गोंवून ठेविल्या, म्हणून त्यांनीं कांहीं अपराध केला असें नाहीं. हल्लीं मात्र इंग्रजी शिक्षणानें दिव्य दृष्टी प्राप्त झाल्यासारखें झाल्यामुळें अलीकडील लोकांस त्या गोष्टी व तीं बंधनें आवडत नाहींत. हल्लींच्या काळीं तीं बंधनें निरनिराळीं दर्शविल्याशिवाय लोकांचें समाधान होत नाहीं. उदाहरणार्थः—दारांत तुळस लावणें, रोज नमस्कार घालणें, लघुशंकेस पाणी नेणें वगैरे वगैरे गोष्टी शरीरशुद्धतेच्या पण पूर्वजांनीं धर्मदृष्ट्या सांगितल्या, म्हणून त्या योग्य नाहींत असें समजून हल्लींचे लोक आचरण करीत नाहींत; पण तीच एखाद्या गौरकाय युरोपियनांनीं किंवा अमेरिकनांनीं सांगितली म्हणजे ती मात्र तावडतोब करावयाची. तर असें कां! तुम्हांस ती धर्मदृष्ट्या इष्ट वाटत नाहींत तर अन्य तऱ्हेनें तरी पाळा, पण पाळा; पण एखाद्या गौरकायानें सांगेपर्यंत कां वाट पहातां! या तुमच्या "एकच एक इंग्रजी (ख्रिस्ती) शिक्षणानें" "तुमच्यांतील श्रेष्ठ वासना मृतप्राय झाल्या आहेत." या तुमच्या श्रेष्ठवासना निरंतर निद्रित राहिल्यानें तुम्हांस ख्रिस्ती होण्याचें धैर्य नाहीं व स्वधर्माभिमानी रहाण्याचें रुचत नाहीं. त्यामुळें सर्व लौकिकव्यवहारांत विद्वान् लोक दुबळे, आळशी, आवेशहीन, असाध्याच्या साध्यतेकरितां खटपट करणारे, अखेरीस अपयशानें निराश होऊन शुद्ध स्वहितास लागणारे असे दिसतात. जर विद्वान् लोक आपलें ख्रिस्तीशिक्षण विसरून आपल्याच बुद्धीनें निःपक्षपातानें हिंदु संस्थांचा विचार करितील तर त्यांस दुसरें एक नवें जगत

सांपडेल असें मला वाटतें.* ' ' आपलें तितकें वाईट असें नुसतें ह्मणून तें टाकूं नका. त्यांत काय तथ्य आहे तें पहा व मग काय वाटेल तें करा. अशाच अर्थाचे अलीकडे युरोपियन लोकही तुह्मांस उपदेश करूं लागले आहेत, त्याकडे तरी लक्ष द्या.' असें हल्लींच्या काळीं कांहीं जुन्या किंवा जुन्या मताच्या लोकांचें ह्मणणें आहे. या दृष्टीनें पाहिलें असतां खरोखरीच आपण धर्मभ्रष्ट होत चाललों आहोंत. ह्मणून याचा अलीकडील लोकांनीं ' शुद्ध बुद्धीनें ' व निरपेक्षपणें विचार केला पाहिजे. ही एक बाजू दाखविली. आतां दुसऱ्या बाजूनें विचार करावयाचा.

या गोष्टीचा दुसऱ्या एका बाजूनें विचार केला असतां निराळेंच कांहीं दिसून येईल. या काळांत ज्ञानरवि मध्यान्हीवर येऊं लागल्यामुळें धर्माचें स्वरूप, त्यावरील पूर्वीचीं कांहीं अभ्रपटलें नाहींशीं होऊन उज्ज्वल दिसूं लागलें आहे. त्यामुळें पूर्वींच्या व आतांच्या धर्मकल्पनेंत पुष्कळ अंतर पडलें आहे. एक युरोपियन ग्रंथकार ह्मणतोः—

" If I have to condense in a short space the various reasons why we are apparently becoming less religious, I should say that it is because knowledge and feeling embodied or expressed in the sciences and art are now too full and variously developed to remain within the limits of what is considered sacred knowledge or religious emotion. It was possible for them to remain well within those limits in ancient times and it is still possible for a mind of limited activity and range to dwell almost entirely in what was known or felt at the time of the Christ; but this is not possible for an energetic and inquiring mind and the consequence is that the energetic mind will seem to the other, by contrast, to be negligent of holy things and too much occupied within purely secular interest and concerns. ... ... ... ... ... But if such a matter could be put to positive test it would probably be found that those whose minds are energetic and inquisitive know more even of their theology than others do

---

* प्रो० गोळे यांच्या ' हिंदुधर्म आणि सुधारणा ' नांवाच्या पुस्तकांतील उतारा.

and that instead of being indifferent to the great problems of the universe, we have given to such problems an amount of careful effort, their own simple acquiesence."

प्राचीनकाळीं ग्रीस देशाच्या इतिहासांत एक निकायस नांवाचा सरदार सिऱ्याक्यूझच्या लढाईचे (वेढ्याचे) वेळीं आपलें अफाट सैन्य घेऊन मोठ्या निकरानें लढला; पण त्याच्या दुर्दैवानें त्याला त्या वेढ्यांत यश आलें नाहीं, ह्मणून तो परतण्याच्या विचारांत होता. इतक्यांत एक ग्रहण आलें, * त्यामुळें तो अपशकुन झाला असें समजून वाटेंत शत्रूस तोंड न देतां तसाच एके ठिकाणीं राहिला. त्यामुळें त्यास किती नुकसान सोसावें लागलें हें इतिहासवाचकांस सांगण्याची जरूर नाहीं. पण इतरांस सांगणें भाग आहे. निकायस धर्मभोळा असल्यामुळें त्यानें ग्रहणाच्यारूपानें आलें या अरिष्टाचे निवारणार्थ एका धर्मप्रवर्तकास विचारलें, त्यानीं तीन आठवडेपर्यंत राहूची पीडा आहे ती टाळण्याकरितां तेथून हलतां कामा नये असें सांगितलें. त्यामुळें निकायस यास तेथून हलतां येईना. ग्रहण वाटेंत आल्यानें ३ आठवडेपर्यंत त्यांनीं हालचाल न केल्यामुळें शत्रूस बरेंच फावलें; व त्याचें आरमार व सैन्य शत्रूला भारी असतांही

---

* येथें एक गोष्ट सांगणें जरूर आहे. ग्रहणाच्या वगैरे इतर खगोलस्थितीच्या अस्तित्वावर मनुष्याची सिद्धी वगैरे अवलंबून आहे ही कल्पना कशी आली याचें बायरन कवीनें एका पद्यांत वर्णन केलें आहे:—

" Ye stars! which are the poetry of heaven!
If in your bright leaves we would read the fate
Of men and empires, it is to be forgiven
That in our aspirations to be great,
Our destinies overleap their mortal state,
And claim a kindred with you; for ye are
A beauty and a mystery, and create
In us such love and reverence from afar,
That fortune, fame, power, life, have named
themselves a star "

Byron-Child Harold-III-88.

३ आठवड्यानंतर तेथून हलणें त्यास दुरापास्त झालें. शेवटीं मोठ्या शर्थीनें परत फिरत असतां त्या सैन्याची दुर्दशा होऊन तें शत्रूच्या हातीं सांपडलें व कांहीं समुद्रकांठींच बळी पडलें.

अशा या प्रसंगीं निकायसचें आचरण पूर्ण धार्मिकपणाचें होतें. त्याची पक्की खात्री होती कीं आपलें आचरण धार्मिक असल्यामुळें देव आपल्यावर पूर्ण कृपा करील व पुरतें साहाय्य करील. ग्रहणाच्यायोगें देवांनीं आपली नाखुषी दाखविली अशी त्याची पूर्ण समजूत होती. इतकें असूनही शेवटीं त्यास तसा दुर्धर प्रसंग सोसावा लागला. हेंच ग्रहण आतां आलें असतां आपण ह्मणजे साधारण शिकलेले लोक त्यास काय महत्व देऊं हें सांगण्याची जरूर नाहीं. खगोलवस्तुमात्र परस्परांचे आड आल्यानें एकाची दुसऱ्यावर छाया पडावी हा सृष्टिनियमच आहे. त्याप्रमाणेंच सूर्य, चंद्र, पृथ्वी व इतर तारे यांच्या परस्पर आड येण्यानें एकाची छाया दुसऱ्यावर पडून ग्रहणें होतात हें आपल्यास ठाऊक आहे, व तेंही अलीकडे शास्त्रांचा प्रसार झाल्यामुळें. व ह्मणूनच निकायसच्या वेळेच्या व हल्लींच्या धर्मकल्पनेंत फरक पडला तो ज्ञान व शास्त्र यांच्या वृद्धीमुळें. त्यावरून हल्लीं लोक धर्मभ्रष्ट झाले व त्यावेळीं धर्मशील होते किंवा त्या वेळेपेक्षां आतां धर्मश्रद्धा कमी झाली असें ह्मणतां येणार नाहीं

वरील ग्रहणाचे उदाहरणावरून सृष्टिनियमाची अनुल्लंघनीयता दिसून येते. सृष्टिरचना ही नियमित चालावयाची, तिला कधीं कांहीं आड येत नाहीं. हा नियम खरा आहे तरी तो सिद्ध करतां यावयाचा नाहीं. कारण सृष्टिरचनेंत ज्या ज्या गोष्टी घडतात व ज्या ज्या फेरबदली होतात त्या प्रत्येकांतून मनुष्यास जाणें शक्य नाहीं, त्यामुळें तो नियम सिद्ध करतां यावयाचा नाहीं. पण दिवसानुदिवस शास्त्राभ्यासानें या सृष्टिरचनेंतल्या गोष्टींचा परस्पर संबंध कळूं लागल्यापासून हा नियम बरेच लोक कबूल करूं लागले आहेत.

हा नियम धर्मकल्पना शिथिल करून नष्ट करण्याच्या कामीं कसा उपयोगीं पडतो हें सिद्ध करण्यास रेलवेच्या रस्त्यावर थोडे दिवसांपूर्वीं घडलेलें एक उदाहरण घेतों. घाटांत त्या सालीं पाऊस फार पडल्यामुळें डोंगरावरचीं झाडें उमळून रेलवेच्या सडकेवर येऊन आडवी पडतील असें वाटत होतें. त्याप्रमाणें दोन मोठाले वृक्ष त्यावेळीं येऊन पडले होते. सकाळची वेळ. मेलगाडी त्या घाटांत त्या वळणाजवळ धुक्याच्या अंधुक उजेडांत येऊन ठेपली. गाडी उतरणीवरून येत असल्यामुळें जोरानें धांवत त्या झाडांजवळ आली नाहीं तोंच ड्रायव्हरनें ( चालकानें ) कळ दाबून वेग कमी केला, ह्मणून ती गाडी मोठ्या शर्तीनें त्या झाडावरून उडून पुढें असलेल्या एका धक्क्यापाशीं थांबली. थोडक्यांत चुकलें, नाहीं तर अंमळ गाडी पुढें गेली असती ह्मणजे पुढें भयंकर कडा तुटलेला होता. कोणास इजा झाली नाहीं, कोणी दगावलें नाहीं. या चमत्कारिक रीतीनें झालेल्या सुटकेचें कारण निरनिराळे लोक निरनिराळें देऊं लागले. त्या गाडींत एक भटजी बसले होते, त्यांनीं तो धक्का बसल्याबरोबर देवाचा धांवा केला. आणि यामुळें सर्व उतारूंचे जीव वांचले असें त्या भटजीचे ह्मणण्यांत आलें व धर्मभोळ्या लोकांना हें खरेंही वाटणें भाग आहे, व तसें त्या गाडींत असलेल्या प्रत्येक धर्मभोळ्या मनुष्यास वाटलें असेल; पण सृष्टिरचनेच्या नियमितपणाचा लोकांच्या मनावर असा कांहीं दृढ परिणाम झाला आहे कीं, ते त्या भटजीस ह्मणूं लागले कीं, जी गोष्ट सृष्टिनियमानें सहज घडते असें सांगतां येतें, तिचें सर्व श्रेय भटजी आपल्या धांव्याकडे लावूं पहात आहेत. त्यांना त्या सुटकेंत अपूर्व व अमानुष असें कांहींच वाटलें नाहीं. अतिवृष्टीमुळें झाडांचे मुळ्यांची माती झरून जाऊन झाडें पडलीं तीं ड्रायव्हरच्या नजरेस आल्यामुळें त्यांनीं वेग कमी करून झाडें उडवून गाडी सुरक्षित नेण्याची योग्य तजवीज केली, व उतारू एखाद्या मोडक्या गाडींत न बसल्यामुळें वांचले. इंजनांतले व इतर लोक पावसानें मऊ झालेल्या जागीं पडल्यामुळें वांचले यांत कांहीं नवल व अपूर्व असें त्यांस वाटलें नाहीं, व ते आणखी असें ह्मणूं लागलें कीं, जर एखाद्या खरोखर

मे.ग्रं. ३०१३



अमानुष शक्तीची कृपादृष्टी आपल्यावर असती, तर झाडें कांहीं खालीं आधार नसतांही तशींच उभीं राहिलीं असतीं, व त्यामुळें बारीकसारीक इजा जी झाली ती झाली नसती.

या अपघाताचे आणखी काय परिणाम घडतात तें पाहूं. जे एखाद्या दिव्य व अमानुष शक्तीवर भरंवसा ठेवितात, ते देवाला अनन्य भावानें शरण जातील, व जे नुसत्या सृष्टिरचनेच्या नियमितपणावर विश्वास ठेवितात, ते आपल्या सुटकेचा नुसता आनंद मानतील. याशिवाय पहिले लोक जेव्हां जेव्हां असा प्रसंग येईल, तेव्हां तेव्हां देवाची प्रार्थना करितील व अनन्यभावें त्यास शरण जातील; पण दुसऱ्या प्रकारचे लोक अशा प्रसंगाच्या पुनरावृत्तीचे वेळीं आपल्या वाटेंत झाडें पडलीं आहेत कीं काय? तें आधीं पहातील व अतिवृष्टीचे वेळीं जास्त काळजी घेतील. सारांश, असा अपघात क्वचित् घडावा अशी खात्री करून घेतील. तेव्हां अशा एखाद्या अपघाताचे वेळीं या दोन्ही तऱ्हेच्या लोकांचीं मतें अनुक्रमें अनुकूल प्रतिकूल किंवा दोन्हीही अनुकूलच होतील!

येथपर्यंतच्या प्रतिपादनावरून एवढें सिद्ध झालें कीं, ज्याला पूर्वी लोक धर्म असें ह्मणत व ज्याचा दैविक शक्तीकडे संबंध जोडीत, तेंच आतां शास्त्र व ज्ञान यांच्या वृद्धीनें स्वाभाविक व साहजिक असें वाटूं लागलें आहे, व आतां जी शास्त्राची माहिती आहे, त्यापेक्षां पुढें ह्मणजे पुढल्या काळीं जास्त शास्त्रपरिज्ञान होईल; आणि ह्मणूनच हल्लीं ज्या गोष्टीला आपण धार्मिक किंवा दैविक ह्मणतों तीच गोष्ट पुढें शास्त्रसिद्ध व ह्मणूनच स्वाभाविक अशी वाटूं लागेल. तेव्हां शास्त्रप्रगतीमुळें मागल्या व पुढल्या काळच्या धर्मकल्पनेंत बरेंच अंतर पडेल व या दृष्टीनेंच आपण धर्मभ्रष्ट झालों असें ह्मणणें असेल तर खुशाल ह्मणावें.

वर सांगितलेल्या उदाहरणासारखीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील. फार लांब कशाला? हल्लींचा जो मुंबईस व इतर ठिकाणीं भयंकर प्लेग

पसरला आहे, व सर्व देशभर जी दुष्काळाची ओरड १८९६ सालीं ऐकूं येत होती, याचें देखील असेंच स्पष्टीकरण देतां येईल. या सांथी-सारख्या अनेक भयंकर रोगांचा विचार दोन तऱ्हेनें करितां येईल. एक, दैव अथवा दैववादी यांच्या दृष्टीनें व दुसरा, सृष्टिरचनावादी अथवा सृष्टिवादी यांच्या दृष्टीनें. दैविकवादी ह्मणतील कीं, देवाची प्रार्थना सर्वांनीं करावी व होत असलेल्या भयंकर गोष्टीचा प्रतिकार करणेंविषयीं त्याची करुणा भाकावी. इतकें करून तें स्वस्थ बसतील. सृष्टिवादी जे असतील ते या सांथीचे किडे व जंतु शोधून काढून नाहींसे करण्याचा प्रयत्न करितील व हवापाणी स्वच्छ राखण्याचा प्रयत्न करतील. हीच गोष्ट दुष्काळाची.

आतां पहिल्या जुन्या लोकांच्या ह्मणण्याचा विचार केला असतां असें दिसून येईल कीं, या एकतर्फी परकीय शिक्षणानें व अंधवत अनुकरणानें खरोखरच वाईट परिणाम घडत आहेत. व दुसऱ्या नव्या लोकांच्या दृष्टीनें या मुद्याचा विचार केला असतां असें दिसून येईल कीं शास्त्रप्रगती व सृष्टिनियमांचें परिज्ञान हीं दिवसानुदिवस वाढत चालल्यामुळें धर्मकल्पनाही बदलत जाणारच व ही अशी बदलत चालली ह्मणून मनुष्यास दोष देतां यावयचा नाहीं. धर्म व शास्त्र यांच्या या वादांत कांहींचें ह्मणणें असें आहे कीं, ते परस्पर विरुद्ध आहेत. हें ह्मणणें कितपत खरें आहे हें वर सिद्ध केलेंच आहे. पण हल्लींचे एक प्रसिद्ध तत्वज्ञानी ऋषिवर्य हर्बर्ट स्पेन्सर यांचें ह्मणणें याचे अगदीं विरुद्ध आहे. मात्र ते धर्मशास्त्र यांची व्याख्या जरा विस्तृत करितात. *

आणखी एक मुद्दा ध्यावयाचा तो हा:—ईश्वराच्या अस्तित्वाची शंका घेणारे कांहीं सवाल टाकतात तेही विचार करण्यासारखे आहेत. त्यांचा विचार त्यांच्या दृष्टीनें करूं लागतां त्यांचाही त्यांत फारसा दोष आहे असें ह्मणतां यावयाचें नाहीं. ते त्यांचे विचार सर्वच न सांगतां

---

* स्पेन्सरचें एज्युकेशन. पृ० ४५—४६.

एक दोहोंचाच येथें उल्लेख करितों. वैतरणा आगबोट बुडण्याच्या प्रसंगासारखे प्रसंग वारंवार येणें; सत्कर्मानें, सद्धर्मानें व सद्गुणानें वागणारांस या जगांत सदोदित दुःख भोगावें लागणें; व तद्विरुद्ध आचरण करणारांस सुखातिशयाचाच वांटा सदोदित मिळणें; दुष्काळाचे प्रसंगीं दीन निरपराधी मोठीं माणसें व लहान मुग्ध बालकें पटापट ढेकूण पिसा चिरडल्यासारखीं मृत्युमुखीं पडणें; व कर्मानुसार मनुष्यास दुःख भोगावें लागून तेथें ईश्वरभक्तीचा कांहीं उपाय न चालणें वगैरे वगैरे.

अशा लोकांनीं निर्मळ अंतःकरणानें असे विचार प्रकट करून आपली शंका जरी दर्शविली, तरी ढोंगी धर्माभिमानी व धार्मिक हठवाद्यां-इतके ते निंदेस खास पात्र नाहींत असें मला वाटतें. फार तर त्यांची धर्मकल्पना संकुचित व जवळ जवळ खरें जें सत्य त्यापर्यंत पोंचली असें ह्मणतां येईल. कारण ते आपली शंका दर्शवितात तरी मानव-जातीच्या सुखाकरितां निर्लोभपणें झटत असतात. (आणि हें माझें ह्मणणें त्यांसच लागू पडेल कीं जे दिसण्यांत किंवा वागण्यांत किंचित नास्तिकसे दिसतात, पण आपल्या कृतीनें परोपकार करण्यांत गुंतलेले असतात व " उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् " ही ह्मण सार्थ करून दाखवितात. पण जे अप्पलपोटे व स्वार्थसाधु अपुरत्या व तात्पुरत्या दृष्टीनें पहातात त्यांस मुळींच माझें हें ह्मणणें लागू पडावयाचें नाहीं.) पण हे ढोंगी धर्माभिमानी व हठवादी बाहेरून धर्माचा आंव आणून आंतून दुसऱ्याचा गळा कापण्याचा प्रयत्न चालवितात. अहो ढोंगी धर्माभिमानी हो! जळो तो तुमचा धर्म, कीं ज्यायोगें तुह्मीं निःशंकपणें नीच कामें करून पुनः आपला धर्माचा टेंभा मिरवितां! खरा धर्म हा नव्हेच

अशा तऱ्हेनें हे दोन विरोध दाखविले आहेत. ते अगदीं खरे. आहेत. आपणच पहा कीं, स्पेन्सरसारख्या महातत्त्वज्ञान्यापासून ते एखाद्या लुंग्यासुंग्या, शास्त्रदृष्टीनें विचार करणाऱ्या मनुष्यापर्यंत सर्व अमक्या मजलेपर्यंत ज्ञेय व त्यापुढें अज्ञेय असें आपल्या शुद्ध सरळ व खऱ्या विचारांनीं प्रकट किंवा सिद्ध करून दाखवितात.

इतकेंच नव्हे, तर त्याबरोबर आपल्या शुद्ध व निर्मळ आचरणानें लोकांस कित्ता घालून देण्यायोग्य आहेत ते सर्व धर्मभ्रष्ट किंवा धर्मलंड असे समजले जातात. व जे रात्रंदिवस नीच, अमंगल व अनीतीच्या विचारांनीं ओथंबलेले, जे कधीं धर्मकर्मदेखील यथासांग करीत नाहींत, ज्यांचा जन्म व्यसनांत गेला, "शास्त्रशून्य" अशी पदवी मिळण्याची ज्यांची योग्यता वगैरे वगैरे. असे जे, ते धर्मशील, धर्मनिष्ठ व सनातन धर्माचे अभिमानी गणले जातात. इतकेंच नाहीं तर जे खरोखर धर्मशील व आपल्या आचरणानें लोकांस पूज्य झालेले किंवा होण्यासारखे त्यांबरोबर मोठ्या दिमाखानें वागतात. तेव्हां यांस काय ह्मणावें.

धर्मसंबंधीं कोणाचें मत कसेंही असो, पण त्याबद्दल छळवाद मांडणें हें सर्वथैव त्याज्य आहे. जे लोक आपलीं धर्मसंबंधीं मतें कायम करीत नाहींत, ते नास्तिक आहेत असें नाहीं. उलट जे आह्मांस धर्माची पूर्ण माहिती आहे असें ह्मणतात त्यांचींच मनें शंकाग्रस्त असतात व त्यांस फारच थोडी माहिती असते. सॉक्रेटीसाला " साक्रेटीस दी वाइझ" ( Socrates the wise ) ही पदवी मिळण्याचें तरी कारण हेंच. जे आह्मीं शहाणे, आह्मीं शहाणे असें त्या वेळचे लोक ह्मणत असत, ते तर मूर्खच होते.

दिवसानुदिवस मनुष्यांच्या शास्त्रशोधामुळें दैविक गोष्टींचें दैविकत्व नाहींसें होऊं लागलें आहे. हें जर खरें आहे तर ज्यास शास्त्रशोधामुळें विशिष्ट माहिती झाली आहे, त्यांचे विचार दैविकदृष्टच्या अगदीं भिन्न दिसूं लागले तर त्याबद्दल त्यांचा छळ करूं नये. कारण प्रत्येकाचें मत निराळें असणारच. प्रत्येकजण जर असें ह्मणूं लागेल कीं, माझ्या मताप्रमाणेंच दुसऱ्यानें वागावें; मला जें मान्य किंवा त्याज्य तेंच दुसऱ्यास मान्य किंवा त्याज्य असावें, तर असें होणें शक्य नाहीं. इतकेंच नाहीं, तर त्यामुळें अनर्थ होईल. असो!

अशी ही कालक्रमामुळें घडून येणारी क्रान्ति अशीच सतत होत राहि-ली तरी आपणांस अगम्य, अज्ञेय असें कांहींतरी या विश्वगोलावर रहाणा-रच, त्यासच ईश्वरांश कल्पून त्या ईश्वरांशाच्या व आपल्या उद्योगाच्या अशा या जोडगोळीनें आपली इष्ट कार्यसिद्धि करून घ्यावी व ही संसार-यात्रा करवेल तितकी सुखकर करून तिचे पैलतीरास जावें.

जसें मुलांस अंधकारामुळें भय वाटतें तशी अज्ञानामुळें मनुष्यास धर्म-संबंधी भीति वाटते. तीच भीति ज्ञानानें व प्रेमानें नष्ट होते. काला-न्तरानें जगांत शान्ति व प्रीति वाढून ज्या शुद्धधर्माचें अस्तित्व अज्ञानावर व विस्तृत पाखंडवादावर अवलंबून रहाणार नाहीं, व जो ज्ञान आणि प्रेम यांच्या साहाय्यानें आपली सुखप्रद व शीतळ छाया सर्व मनुष्यमात्रांवर पाडील तो खास भावी धर्म होय, अशी आशा करण्यास सबळ कारण आहे.

आणखी एका दृष्टी: विचार करावयाचा राहिला आहे, तो केल्यावर या विषयाची व वाचकांची रजा घेऊं. पाश्चात्य किंवा नवीन विचा-राच्या दृष्टीनें आतांपर्यंत विचार झाला. आतां प्राच्य किंवा पूर्वीच्या दृष्टीनें विचार कर्तव्य आहे. या जगाचा उत्पत्तिकर्ता ह्मणून कोणी आहे. ( यासच आपण मागें अज्ञेय, अगम्य किंवा ईश्वरांश असें ह्मटलें आहे. ) त्या ईश्वराच्या कृपाप्रसादाची इच्छा करणाऱ्या मुमुक्षुजनांस मुक्ति किंवा मोक्ष मिळण्यास भक्ति, ज्ञान आणि वैराग्य असे तीन मार्ग आहेत. यांत कोणी ज्ञानमार्ग श्रेष्ठ समजतात, कोणी भक्तिमार्ग, तर कोणी वैराग्य-मार्ग श्रेष्ठ समजतात. अशा या वादांत श्रेष्ठ मार्ग कोणता हें सांगतां येणें कठीण आहे. तरी पण ज्ञान आणि वैराग्य ह्या दोन भक्तिमार्गाच्या पुढल्या पायऱ्या आहेत. यांपैकीं कोणताही मार्ग श्रेष्ठ असो; पण या तीनही मार्गांनीं देव आळविला जाऊन मनुष्याचें इष्टकार्य होतें हें दिसून येते. कधीं कधीं तर या मार्गांनीं सृष्टिनियमांचें उल्लंघन होतें, असेंही दिसून येतें. याचा अनुभव पहाण्यास फार लांब जाणें नको आपले भगवद्भक्त, आपले संत, आपले ईशचरणांबुजीं लीन झालेले सत्कवी,

आपले पुण्यवान् पुरुष यांच्या गोष्टी ऐकिल्या व पाहिल्या ह्मणजे कळून येतें. आजपर्यंत जी संतमालिका झाली, जे अलौकिक पुरुष आपली अजरामर कीर्ति मागें ठेवून गेले, त्यांच्या कथा वाचल्या ह्मणजे ह्या ईश्वराचा महिमा कळून येतो. आजपर्यंत झालेल्या सर्व साधुसंतांच्या कथांत व अलौकिक पुरुषांच्या गोष्टींत कांहींच तथ्य नाहीं. त्या आपल्या नुसत्या कल्पित गोष्टी आहेत असें नवे लोक ह्मणोत व त्यांत कांहीं सत्याचा अंश असेलही; पण सर्व गोष्टी व कथा अगदींच मूळ आधारावांचून असतील असें ह्मणणें शक्य नाहीं. ‘ पिकल्याशिवाय विकत नाहीं ’ असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. बाजारांत जे पदार्थ विकावयास येतात ते पिकल्याशिवाय येणारच नाहींत. कांहीं तरी पिकलें पाहिजे. तद्वत्च आजपर्यंत होऊन गेलेल्या साधुपुरुषांमध्यें आणि दिव्य व अलौकिक पुरुषांमध्यें थोडका कां होईना; पण कांहीं तरी—दिव्यपणा व अलौकिकपणा ह्मणजेच अर्थात् ईश्वरांश हा असला पाहिजे. इतकेंच नाहीं, तर असतो हें खास समजावें. कारण असें कबूल केल्याशिवाय दुसरा मार्ग किंवा तोडच नाहीं. सृष्टिनियमाविरुद्ध भिंत चालविणें, रेड्याकडून वेद बोलविणें, व अमृतानुभवासारखे व ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ २०–२१ वर्षांच्या वयांत निर्माण होणें व जी गोष्ट मनुष्यप्राण्यासारखे असंख्य प्राणी एकवटल्यासही होण्यास अशक्य, अशी एकट्या ज्ञानेश्वराच्या किंवा शंकराचार्यांच्या हातून घडणें हें ईश्वरांशावांचून घडणें शक्य आहे काय? ( यासच कोणी ईश्वरी देणगी किंवा सृष्टिदत्त देणगी असें ह्मणतात. कांहीं असलें तरी या अशा अपूर्व गोष्टीचा खुलासा कोणाच्याच दृष्टीनें होत नाहीं एवढें मात्र खरें. ) तसेंच एकनाथ, तुकाराम, रामदास, चोखामेळा, चांगदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, जनाबाई, कबीर, कमाल, तुळशीदास वगैरेसारख्या महा भगवद्भक्तांनीं जे दैविक व अपूर्व चमत्कार करून दाखविले, तसेंच शंकराचार्यांसारख्या धर्मसंस्थापकांनीं व अगदीं अलीकडचें उदाहरण घतल्यास श्रीशिवाजी महाराजांसारख्या गोब्राह्मणप्रतिपालकांनीं जी अजरामर कीर्ति करून ठेविली, ती ईश्वरांशाशिवाय किंवा मानवी

शक्तीच्या बाहेर अशा ईश्वरी साहाय्याशिवाय झाली कीं काय? याचें उत्तर काय देतां येईल? मागें एका प्रसंगीं घेतलेल्या उदाहरणांत सृष्टिनियमवादी असें ह्मणत होते कीं, आगगाडीला जो अपघात झाला त्यांत सृष्टिनियमाखेरीज दुसरें जर कांहीं असतें ह्मणजे ईश्वरीकृपा जर असती, तर आधारावांचून झाडें उभीं राहिलीं असतीं व उतारूंस जी थोडथोडी दुखापत झाली ती झाली नसती. त्यांच्या दृष्टीनें वर सांगितलेल्या साधुसंतमालिकेच्या व अलौकिक पुरुषांच्या उदाहरणांत ईश्वरीकृपा किंवा ईश्वरी अंश नाहीं असें ह्मटलें तर घरोघरीं व दारोदारीं साधुसंत व अलौकिक पुरुष व्हावेत; पण ते तसे होत नाहींत. यावरून त्यांत कांहीं विशेष आहे असें ह्मटलें पाहिजे.

मोठमोठे तत्वज्ञानी व सृष्टिनियमवादी एरवीं कधीं ईश्वराच्या अस्तित्वाचा विचार करणार नाहींत व तोंडून कधीं नांवही काढणार नाहींत. ते एकादा भयंकर प्लेगसारखा सांथीचा किंवा दुसरा एखादा रोग आला असतां किंवा एखादें संकट आलें असतां ईश्वराच्या अस्तित्वाचा कांहीं गंभीरपणानें विचार करूं लागतात व नंतर Fatalist किंवा दैववादी बनतात.

असे हे दोन वादाचें साधारण विवरण केलें आहे. मागें सांगितलेला शास्त्रवाद व आतां सांगितलेला ईश्वरवाद या दोहोंचाही विचार करतां साधारण लोकांस असुलभ असा हा शास्त्रमार्ग किंवा वाद सोडून देऊन ईश्वरवादच इष्ट आहे, व ज्यांना दोन्ही वाद गम्य आहेत, त्यांनीं बहुजनाकरितां दोहींची तडजोड करून एक मार्ग स्वीकारावा हें इष्ट आहे. आतां सरते शेवटीं एक 'बालबोध' मासिक पुस्तकांतील उतारा घेऊन या विषयाचा व वाचकांचा निरोप घेतोः—

" ...................... * ही मुख्य दिशा सगळ्या विचारशीलांनीं धरावी. आपणा दक्षिणी माणसांस दिल्लीस जावयाचें असल्यास मधल्या मुक्कामाच्या संबंधानें, माणसांचे मार्ग कदाचित् वेगळे वेगळे पडतील.

परंतु उत्तर दिशा कांहीं चुकावयाची नाहीं. ती सर्वांची एक रहावयाची आहे. हेंच धर्मप्रकरणांत मुख्य तत्व धरावें. ह्मणजे अदृष्टाकडे दृष्टी देऊन निरंतर चालावें. त्या संबंधाचा अनुभव, प्रत्येक माणसाचा पाहिला तर अल्प असावयाचा. परंतु, परमेश्वराच्या कृपेनें ज्यांस तें ज्ञान पुष्कळ प्राप्त झालें होतें, त्यांचे बोध लक्षांत ठेवून वागणें हें साधारण माणसांस साध्य आहे. गणितांत केरोपंतनानांचे मत ग्राह्य; पदार्थ–विज्ञान शास्त्रांत सर ऐझॅक न्यूटनचें मत ग्राह्य; त्याप्रमाणें धर्म, परलोक, ईश्वर इत्यादि महाअदृष्टांच्या संबंधानें तुकारामादि साधुसंतांचें मत ग्राह्य होय. नदीवर आलों आहों, तहान लागली आहे, अशा वेळेस या पाण्यांत विष तर नसेलना, त्यानें तहान भागेल किंवा नाहीं, अशा शंका घेऊन खोळंबून बसणें, हें शहाणपण नव्हे. तर आपणापेक्षां शहाणीं माणसें तें पाणी पिऊन तृषा शांत करून आनंदानें जात आहेत, असें आपण पहात आहोंत, तर त्याप्रमाणें आपण आपली तृषा भागविणें हेंच शहाणपण आहे. त्याप्रमाणें धर्मविषयीं समजावें आणि तदनुरूप वागावें. देव आहे असें समजण्यांत कांहीं हानि नाहीं; नाहीं असें समजण्यांत मात्र संशय, अविश्वास आणि श्रेष्ठापमान इतके पापप्रकार पदरीं घ्यावे लागतात. ते टाळणें ह्मणजे, कांटे आहेत किंवा कांटे नाहींत ह्याविषयीं खात्री नाहीं अशा अंधेऱ्या मार्गानें, जोडा घालून जाणें, हेंच समंजसपणास शोभतें, ह्याकरितां अदृष्टाच्या संबंधानें जो श्रम पडतो तो टाळावा. तो टाळावयाचा ह्मणजे एवढेंच कीं, त्याचें सत्य स्वरूप लक्षांत ठेवून तसें वागावयाचें: ”

---

* बालबोध आगष्ट १८९८ पु. १९ अंक ५ निबंध “ दृष्ट आणि अदृष्ट ” वरील निबंध समग्र वाचावा अशी वाचकांस शिफारस आहे:

---

☞ या प्रकरणाच्या ८ वे पृष्ठावरील इंग्रजी वाक्याच्या शेवटचे शब्द पुढीलप्रमाणें वाचावे. careful thought far. surpassing in mental effort, their own simple acquiescence

# हिंदुधर्मशास्त्र.

* धर्मशास्त्रं पुरस्कृत्य प्राड्विवाकमते स्थितः।
समाहितमतिः पश्येद् व्यवहारानदुक्रमात् ॥

नारदस्मृति.

चार वेद, दोन वेद किंवा एक वेद तरी शिकून व कडकडीत ब्रह्मचर्य पाळून मग गृहस्थाश्रम घ्यावा अशी आपल्यांतील ' शिष्ट ' ह्मणवूं पाहणाऱ्यांस शास्त्राज्ञा आहे. असाच रोमन लोकांतही परिपाठ असे. प्रत्येकजणास धर्मशास्त्रा ( Jurisprudence ) चें ज्ञान असल्याशिवाय ' नागरिक ' ही पदवी व तत्संबंधीं हक्क प्राप्त करून घेण्यास तो योग्य नाहीं असें समजत. सध्यांच्या युगांत वकीलांचें व कोर्टांचें इतकें स्तोम माजलें आहे कीं, उठल्या बसल्या त्यांच्याशीं गांठ असते; व ' कोडत नि सोडत ' याचा बराच प्रत्यय येत असल्यामुळें कलकत्त्यांतील ' अमृत बझारपत्रिके ' सारख्या प्रख्यात व वजनदार पत्रास वेळोवेळीं असे उद्गार काढण्याची पाळी येते कीं, दारूबाजी व रंडीबाजी या घोर व्यसनांप्रमाणें कज्जेबाजीही दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर असल्यामुळें रयतेची दैना न कळत वाढत चालली आहे. यास उपाय हाच कीं, नागरिकानें कायद्याचें साधारण ज्ञान संपादन करून आपल्या अज्ञ जातिबांधवांतील तंटे पंचामार्फत मिटविण्याची पूर्वींची रूढि कायम राखावी, ह्मणजे कोर्टांत होणारी दिरंगाई, खर्च व द्वेषाग्नि हे नाहींसे होऊन प्रजेच्या सुखांत भर पडेल. ह्याच उद्देशानें आपल्या दयाळू इंग्रज सरकारानें ' लवाद कोर्टें ' ठिकठिकाणीं स्थापित केलीं आहेत; पण त्यांकडे जाणें न जाणें पक्षकारांच्या खुषीवर आहे. तेवढें सरकारनें त्यांस भाग पाडावें ह्मणजे इष्ट हेतु साध्य होण्यास फारसा वेळ लागणार नाहीं. असो. आज मी आपल्या कर्तव्यास जागून अशा समाजऋणांतून अंशतः तरी मुक्त व्हावें ह्मणून प्रस्तुत विषय हातीं घेतला आहे.

---

* " धर्मशास्त्राला पुढें करून, प्राड्विवाक [ नामक आचार्य ] यांच्या मताप्रमाणें, बुद्धिमान् मनुष्यानें अनुक्रमानें व्यवहारांचें( मुकादमा ) परीक्षण करावें. " नारदस्मृति.

हिंदुधर्मशास्त्रासारखा कायद्याचा जबरदस्त विषय मी कां हातीं घ्यावा अशी माझ्या प्रिय वाचकांस जिज्ञासा उत्पन्न होणें साहजिक आहे. तेव्हां ती प्रथम तृप्त केली पाहिजे. दैवदुर्विपाकामुळें, जरी या लेखकास 'एल्एल्. बी.' परीक्षेंत यश आलें नाहीं, तरी त्याचा कायद्याचा अभ्यास आज सात वर्षें सतत चालू आहे; तेव्हां कायद्यांतील मर्म कळण्यास त्यास थोडी बहुत तरी सवड मिळाली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि पदवीधर कायदेपंडितांच्या नजरेखालून हा लेख गेल्यास वाचकांचें मन साशंक रहाणार नाहीं असें वाटून मित्रवर्य रा. गोविंद चिंतामण वाटवे बी. ए. हायकोर्ट प्लीडर (अलाहाबाद) यांकडून तेवढा कार्यभाग उरकवून गेल्या दोन महिन्यांतील माझ्या जिवावरच्या दुखण्यानंतरच्या फुरसतीचा फायदा ग्रंथमालाभक्तांत यथाशक्ति अत्यादरानें करून देण्याचें योजून ह्या मोठ्या विषयास हात घातला आहे.

रा. सा. मंडलिक, मिस्तर मेन, डॉक्टर शिरोमणि, मेसर्स वेस्ट व बूलर इत्यादि विद्वद्वर्यांचे हिंदुधर्मशास्त्रावर इंग्रेजींत मान्य ग्रंथ आहेत. त्यांच्या धर्तीवर लहान प्रमाणावर मराठींतही पण ग्रंथ झाले आहेत. पण ते साधारण सुशिक्षित वाचकांस पाल्हाळिक वाटतात. त्यांचा मथितार्थ यथामति या निबंधांत देण्याचें योजिलें आहे.

आतां आपण प्रस्तुत विषयाकडे वळूं. हिंदुधर्मशास्त्राचीं ठळक अंगें कोणतीं! तर तीं दहा आहेत:—

| | |
|---|---|
| (१) शास्त्राची उत्पत्ति. | (६) वांटणी. |
| (२) रूढि. | (७) वारसा. |
| (३) लग्न. | (८) स्त्रीधन. |
| (४) दत्तविधान. | (९) दानधर्म. |
| (५) अविभक्त कुटुंब. | (१०) बिनामी व्यवहार. |

(१) प्रोफेसर हॉलंड साहेबांनीं आपल्या 'धर्मशास्त्रां' (Jurisprudence) त, धर्मशास्त्राची उत्पत्ति पांच कारणांनीं होते असें ह्मटलें आहे. तीं कारणें हीं होत:—

( अ ) रूढि; ( ई ) नियमस्थापना;
( आ ) धर्म; ( उ ) न्यायपुरवणी.
( इ ) कोर्टाचे ठराव;

यांपैकीं पहिलें, दुसरें व पांचवें हीं आपल्या धर्मशास्त्राचीं प्रमुख कारणें आहेत. मनूनें असें ह्मटलें आहे कीं, राजानें आपल्या प्रजेंत पूर्वापार, अबाधित व वाजवी अशा कोणत्या चालीरीती आहेत त्यांची नीट चौकशी करून, तदनुसार नियमस्थापना करावी. यांत कायद्याचें धोरण हें आहे कीं, 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी.' दुसरें कारण ह्मणजे धर्म याचा धर्मशास्त्राशीं इतका निकट संबंध आहे कीं, 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' शिवाय आपल्यांतील कोणत्याहि कृत्यास सुरुवात होत नाहीं. चौथें कारण असें कीं, राजानें मंत्रिमंडळाचे साह्यानें प्रजेस नियम घालून द्यावेत व त्याप्रमाणें प्रजेनें चालावें; व ह्मणूनच 'राजानः प्रजा धर्मेण शिष्युः' असें शास्त्रवचनच झालें आहे. पांचवें कारण ह्मणजे न्यायपुरवणी. ही पाश्चात्य देशांत जशी धर्मशास्त्रानंतर प्रसिद्धीस आली, तशी ती आपल्याकडे वेदानंतर 'स्मृति' ह्मणून जे ग्रंथ झाले, त्यांत ती प्रगट होऊं लागली. स्मृतिकारांनीं जुन्या प्रघाताचा मार्ग राखण्याच्या मिषानें, देशकालवर्तमानाकडे लक्ष्य ठेवून न्यायाचे नवे प्रघात पाडले, व आपल्या धर्मशास्त्रास बरीच स्थितिस्थापकता आणून देऊन, त्यास तत्कालीन समाजस्थितीस अनुकूल करून ठेविलें. पण सध्यां सरकार विधर्मी असल्यामुळें, आपल्यांतील विद्वान् सुधारकांनीं धर्मशास्त्रांत अमूक सुधारणा अवश्य केल्या पाहिजेत, असे वर्षानुवर्ष ऊहापोह करून समाजापुढें आणिलें तरी त्याचा विशेषसा फायदा होत नाहीं. श्रीशंकराचार्यास तसें विदित करावें, तर ती संन्यासिमूर्ति आंग्लभाषानभिज्ञ असल्यामुळें, आपल्या शिष्यवृंदास कोणत्या नवीन नवीन अडचणींनीं गांजिलें आहे, त्यांचा प्राच्यपाश्चात्य ज्ञानदृष्टीनें व्यापक विचार करण्याचा तिचे अंगीं अधिकार नाहीं. बरें, स्वामी विवेकानंदासारख्यांस जरी तसा विचार करण्याचें सामर्थ्य आहे, तरी त्यास सामान्यजनसमूहावर पूर्वापार धर्मसंबंधीं बाबतींत सत्ता नसल्यामुळें, त्यांच्या खटपटीस यावें

तसें यश तात्काळ येत नाहीं. मिळून काय कीं, ‘ दांत आहेत तर चणे नाहींत व चणे आहेत तर दांत नाहींत ’ अशी सांप्रत आपल्या समाजाची स्थिति असल्यामुळें आपलें धर्मशास्त्रही तटस्थ भासत चाललें आहे.

असो, उरलेलें तिसरें कारण ह्मणजे ‘ कोर्टाचे ठराव ’ हें होत. हें गौण आहे असें वर ह्मटलें आहे. कारण, आपल्या धर्मशास्त्राच्या भरभराटींत सध्यां निजधामास जाऊं पाहणारी आपली सोयस्कर व स्वल्प पंचायतीची पद्धत सर्वत्र प्रचलित होती.

( २ ) हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या रूढी आहेत. तदनुसार शास्त्राधार असे जे ग्रंथ आहेत, ते भिन्न भिन्न आहेत. त्यांत प्रमुख असे दोन आहेत :—( १ ) याज्ञवल्क्य स्मृतीवरील विज्ञानेश्वराची ‘ मिताक्षरा ’ नामक टीका व ( २ ) जगन्नाथाचा ‘ दायभाग ’. पहिला ग्रंथ हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत चालतो. दुसरा ग्रंथ फक्त बंगल्यांत चालतो.

जंगम जिनगी ह्मणजे डागडागिर्णे, भांडींकुंडीं इत्यादि कोठेंही असलीं, तरी त्यांचा मालक जेथला असेल, तेथल्या कायद्याप्रमाणें त्यांची व्यवस्था होते, व स्थावर जिनगी ह्मणजे घरदार, शेतवाडी इत्यादि जेथें असेल, तेथल्या कायद्याप्रमाणें तिची व्यवस्था होते. हा इंग्रेजी कायद्याचा नियम आपल्या धर्मशास्त्रास लागू नाहीं. एका मुंबईकर हिंदु गृहस्थानें कलकत्त्यांत इस्टेट केली. तर तिची व्यवस्था मिताक्षरेप्रमाणेंच चालेल; पण सदरहु मुंबईकर जर दायभाग ग्रंथ मानील, तर त्याप्रमाणें त्याच्या जिनगीची व्यवस्था चालेल.

ज्यांनीं धर्मांतर केलें आहे, असे खोजे, बाल्ये इत्यादिकांच्या जिनगीवरील वारसा व वारसांचा क्रम यासंबंधीं नियम त्यांच्या पूर्वधर्मांतलेच लागू असतात. पण तशी रूढि नसेल, तर निराळी गोष्ट आहे, ह्मणजे त्या बाबतींतही त्यास नवीन धर्मांतले नियम लागू असतात.

( ३ ) लग्न—प्राचीनकाळीं लग्नाचे बाबतींत कांहींएक निर्बंध नसे. पण समाजाचें पाऊल जसजसें पुढें पडत चाललें, तसतसे ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस व पैशाच्य हे आठ प्रकार उलट क्रमानें उदयास आले. यांपैकीं पहिले चार प्रकार ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन उच्च वर्णांत व बाकीचे चार शूद्र वर्गांत प्रचलित असत.

सध्यां काय तो ‘ ब्राह्मविवाह ’ [ ह्मणजे कन्यादान ]च चालू आहे. कोठें कोठें गरिबीमुळें मुलीचे आईबाप किंवा पालक मुलीबद्दल पैसा [ शुल्क ] घेतात; पण तो राजरोस रीतीनें नव्हे, तर चोरून मारूनच घेतात.

ब्राह्मविवाह घडून येण्यास जे नियम पाळण्याची आवश्यकता अजून थोडीबहुत प्रत्येक धर्मशास्त्रांत दिसून येते, तो हा :—

पंचमात्सप्तमादूर्ध्वं मातृतः पितृतस्तथा ।

“ आईपासून पांच पिढ्यांच्या आंतला व बापाकडून सात पिढ्यांच्या आंतला असा वर असतां कामा नये. ” ह्मणजे तो वधूशीं ‘ सपिंड ’ असतां कामा नये. याचा भावार्थ इतकाच कीं, वधूवरें जितकीं दूरचीं असतील, तितका त्यांच्यांत आनुवंशिक रोग होण्याचा संभव कमी. याच धोरणानें आपल्या धर्मशास्त्रांत दुसरा एक नियम घालून दिला आहे. त्याप्रमाणें वधूवर एका ‘ गोत्रां ’ [ कुळां ] तले असूं नयेत; ह्मणजे ते ‘ सगोत्र ’ असूं नयेत. हे दोन्ही नियम उच्च वर्णांस लागू आहेत. या नियमाविरुद्ध कोठें कोठें चाली आहेत. उदाहरणार्थ मारवाडांत चुलत भावाबहिणींचीं लग्नें होतात. महाराष्ट्रांत सोडमुंजीचे वेळीं मामा आपल्या भाच्यास मुलगी देण्यास उभा राहून, त्यास काशीच्या वाटेवरून परतवितो. यावरून असें दिसतें कीं, आपल्यांत मामेबहीण चालत असे. देशस्थ, कर्नाटकी लोकांत मामेबहीण किंवा बहिणीची लेकदेखील चालते. मद्रास इलाख्यांत तर अद्याप मामेबहीण चालते.

सगोत्र मुलीशीं चुकून लग्न झालें, तर नवऱ्यानें तिला आईप्रमाणें पाळली पाहिजे. या शास्त्राज्ञेवर एकानें अशी शंका काढिली कीं, लग्न

जुळवून देणाऱ्या तिऱ्हाइतांच्या चुकीबद्दल किंवा कपटाबद्दल त्या बिचाऱ्या वधूचें पतिसुख कां नाहींसें व्हावें? बरें, तुमच्या ह्मणण्याप्रमाणें, तिला संसारसुख त्याबरोबर भोगितां येत नाहीं, तर तिला इतराबरोबर तें भोगूं देण्यास कोणती हरकत आहे? ह्मणजे, तिचा पुनर्विवाह कां होऊं नये? यावर वे. शा. सं. गोपाळाचार्य गजेंद्रगडकरासारख्या विद्वद्रत्नांनीं असा जबाब दिला कीं, धर्मशास्त्रासंबंधीं गैरसमज किंवा चूक अक्षम्य आहे; ती क्षम्य असती, तर समाजास धर्मशास्त्राचें बंधन नाममात्र राहिलें असतें. हिंदी दंडनीतीवर टीका लिहितांना मेनसाहेबांनींही असेच उद्गार काढिले आहेत. व साधारण धर्मशास्त्राचेंही असेंच सूत्र आहे.—

*Ignorentia legis non excusat.* ( Ignorance of Law is no excuse. )

" कायद्याचें अज्ञान ही सबब चालत नाहीं. "

मुलीचें लग्न योग्यकाळीं करून देण्याचा हक्क बापाचा आहे, व तो आपल्या समाजस्थितीकडे लक्ष दिलें ह्मणजे उजू आहे असें दिसून येईल. कारण, आपल्यांत लग्नाचे बाबतींत कोणकोणाचें कसकसें धोरण असतें तें नेमकें पुढील श्लोकांत दाखविलें आहे:—

रूपं वरयते कन्या माता वित्तं पिता श्रुतं ।
बांधवाः कुलमिच्छन्ति मिष्टान्नमितरे जनाः ॥

" मुलीला नवरा रूपवान् हवा असतो; आईचें लक्ष्य त्याच्या संपत्तीवर असतें; बापाला तो विद्वान् असावा असें वाटतें; नातेवाईकांना त्याचें कुळ पहावेंसें वाटतें; व इतर लोकांची नजर मिष्टान्नावर असते. "

वधूचें लग्न योग्य काळीं ह्मणजे ' अष्टवर्षा भवेत्कन्या ' या नियमाप्रमाणें व्हावें असें वर आलें आहे. व वरपक्षी योग्य लग्नकाळ ह्मणजे प्रस्तुत निबंधाच्या आरंभीं सुचविल्याप्रमाणें

वेदानधीत्य वेदौ वा वेदं वापि यथाक्रमं ।
अविप्लुतब्रह्मचर्यो गृहस्थाश्रममाविशेत् ॥

विशीपासून पंचविशीच्या आंतबाहेर असावा असें दिसतें. सध्यां वराचा लग्नकाळ बेतावर येत चालला आहे. तसाच शिक्षणप्रसार जारीनें सुरू होत असल्यामुळें, वधूच्या वयाची मर्यादाहि पुढें सरसावत आहे. बालविवाहाचे जागीं प्रौढविवाह शास्त्रीय पद्धतीवर स्थापित करून, तो सुरू करण्याकडे विद्यालंकृत समाजाचा ओढा आहे. व मुंबई येथील विश्वविद्यालयांत तर एका सद्गृहस्थानें अशा शर्तीवर एक शिष्यवेतन ठेविलें आहे कीं, तें मिळविणारा किंवा मिळविणारीण पदवीधर होईपर्यंत ब्रह्मचर्याश्रम पाळीत असली पाहिजे.

असो. पण बायको विचारी असेल, तर तिला आपल्या मुलीच्या लग्नसंबंधांत नवऱ्यास सल्ला देण्याची चाल आहे. व कविकुलगुरु कालिदासानें उमेच्या विवाहांत, हिमालयाचे तोंडून असें वदविलें आहे.

प्रायेणैवंविधे कार्ये पुरंध्रीणां प्रगल्भता ।

अलीकडील कोर्टाची धांव याहिपलीकडे गेली आहे. वेंकटाचार्लु वि० रंगाचार्लू या मुकदम्यांत मद्रास हायकोर्टानें न्यायपुरवणीच्या तत्त्वावर असा ठराव केला आहे कीं, मुलीचा बाप असतां, जर आई मुलीचें जन्माचें कल्याण व्हावें या हेतूनें तिला चांगला वर पाहील, तर तिला त्या वराशीं तिचें लग्न करूं देतां येतें; कारण अशा स्थितींत, जरी बापाच्या हक्काची पायमल्ली आईनें केली, तरी तशानें तिनें आपल्या मुलीचें अकल्याण केलें असें होत नाहीं.

आपल्या धर्मशास्त्राप्रमाणें लग्न हा सोळा संस्कारांतील प्रमुख व अभेद्य असा संस्कार आहे. तो नुसता 'धर्मेचार्थे च कामे च नातिचरामि' असा शपथविधि नाहीं. तर त्यामुळें जन्माचें साफल्य होतें; तें कसें तें पुढें येईलच. तसेंच एकदां लग्न लागलें ह्मणजे तें मग मोडतां येत नाहीं; ह्मणूनच, लग्नास पर्यायवाचक प्रचारांतला शब्दसमूह ह्मणजे 'जन्माच्या गांठी' असा आहे. आणखीही एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे कीं, ज्याचे तीळतांदूळ खाल्ले असतील, त्या वराकरतां वधू माळ घेऊन उभी असते ह्मणजे मागील जन्मांत जिचा लागाबांधा असतो,

तीच आपणास बायको मिळते; व चालू जन्मांत जो प्रेमळ नवरा आपणास प्राप्त झालेला आहे, तोच पुढील जन्मीं प्राप्त व्हावा ह्मणून बायका 'कोकिळाव्रतां' सारखीं व्रतें करीत असतात, व त्या 'Matches are made in heaven' (ब्रह्मदेवाच्या घरीं गांठी बांधल्या जातात) याचा सूक्ष्मदृष्टीनें विचार करीत असतात!

लग्नासारख्या प्रमुख संस्कारास स्थितिस्थापकता आणून त्यास साधारण कराराच्या तोडीस आणून बसविण्याची खटपट कोठें कोठें चालू आहे; व तिच्या जोरावर इतरांस मृगजलवत् भासणारें आपलें गृहसुख द्विगुणी करण्याचा प्रयत्न सफल होईल असें धोरण धरून घरोघर

'सा नित्यमंगलमयी गृहदेवता मे'

अशा आनंद–घंटा वाजतील ह्या कल्पनांचा प्रसार होत आहे!

नवराबायकोचा संबंध अभेद्य आहे व एका म्यानांत दोन सुऱ्या राहत नाहींत हेंही जरी उघड आहे, तरी स्त्री कन्याप्रसू असल्यास, पुत्रप्राप्तीसाठीं एक असतां दुसरी करितां येते. आतां ही जी फट शास्त्रानें ठेविली आहे, तिचा बरीच मंडळी दुरुपयोग करीत आहेत; पण शिक्षणप्रसाराबरोबर असला घोर प्रकार नष्ट होईल असें वाटतें.

दुसरें असें कीं, बायको जारिणी बनेल, तर नवऱ्यास तिला सोडून देतां येतें; पण जर ती शुद्धीवर येईल, तर त्यानें तिला अन्नवस्त्र द्यावें. उलटपक्षीं, जर नवरा बाटेल किंवा तो तिला विचारल्याशिवाय संन्यास घेईल, किंवा तो वेश्या घरांत ठेवील, किंवा तो क्षयरोग, रक्तपित्ति इत्यादि महाव्याधींनीं ग्रस्त असेल किंवा तो आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ असेल, किंवा तो नपुंसक असेल, किंवा तसेंच दुसरें एखादें कारण असेल, तर बायकोनें नवऱ्यास सोडलें तरी तें उजू आहे. पण शूद्रांत काडी मोडून देण्याची चाल आहे.

पुनर्विवाह उच्चवर्णांत प्रचलित नाहीं. तो शूद्रांत प्रचलित आहे. त्यास महाराष्ट्रांत 'पाट' ह्मणतात, गुजराथेंत 'नात्रा' ह्मणतात व उत्तर हिंदुस्थानांत 'घरीचा' ह्मणतात. लोकप्रिय अकबर बादशहा-

प्रमाणें उदार इंग्रेज सरकारनें हिंदु विधवांचा पुनर्विवाह ज्यांच्यांत संमत असेल, त्या लोकांत तो कायदेशीर आहे, व त्यापासून उत्पन्न होणारी प्रजा औरस आहे असें कायद्यानें ठरविलें आहे. सुधारलेल्या एतद्देशीय संस्थानांनींही यासंबंधीं चळवळ सुरू केली आहे. म्हैसूरांत व बडोद्यांत याविषयीं कायदे झळकत आहेत. पुण्यांत हिंदु विधवांचा पुनर्विवाह शास्त्रीय रीतीनें घडवून देणारी मंडळी निघाली आहे. दर वर्षी राष्ट्रीय सभेनंतर भरणाऱ्या सामाजिक परिषदेंत या विषयाचा खल सुरू आहे. व 'अबलोन्नतिलेखमालाकारा'सारख्या विद्वान् गृहस्थासहि असें वाटत आहे कीं, अक्षतयोनींचा पुनर्विवाह करणें हें सशास्त्र आहे.

बायकोवर नवऱ्याची पूर्ण सत्ता असते, एवढेंच नाहीं, तर ती त्याची अर्धांगी असते, तिला त्यानें, वाटेल तशी वांकवावी, असें जरी आहे, तरी त्यानें तिला अन्नवस्त्रालंकारादिकांनीं प्रसन्न ठेवावी अशी पूर्वापार समजूत आहे. मनूनें तर तशी शास्त्राज्ञांच करून टाकिली आहे. तो आपल्या प्रख्यात 'स्मृतीं'त ह्मणतो :—

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।

या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे बायको नवऱ्याच्या विश्वासास पात्र आहे. तिला नवऱ्याच्या नांवावर पैसे उसने काढण्याची मुभा आहे. मात्र अन्नवस्त्र, श्राद्धसंस्कार इत्यादि अवश्य कामाकरतांच ते काढितां येतात. ती अस्थानीं कर्ज करील तर त्याबद्दल तिची तीच जबाबदार असते व तसलें कर्ज तिला आपल्या पुंजीं ( स्त्रीधनां ) तून फेडावें लागतें. नवऱ्यास मात्र बायकोच्या स्त्रीधनावर मालकी सांगतां येत नाहीं; पण अडीअडचणींत तिनें त्यास त्यांतून मदत केली पाहिजे. पण नवऱ्यानें डोकें वर झालें कीं, त्यानें तिची फेड केली पाहिजे.

( ४ ) दत्तविधान—"पुत्रप्रयोजना दाराः" [ पुत्रप्राप्तीस्तव बायको असते. ] हा लग्न करण्याचा उद्देश आहे. तो सफल झाला ह्मणजे आपणास पुत्र झाला कीं आपल्या जन्माचें सार्थक होतें. कारण,

"पुन्नाम्नो नरकाद्यस्मात्त्रायते पितरं सुतः"

इत्यादि वचनांवरून असें निष्पन्न होतें कीं मनुष्यास 'पुत्' नामक नरकापासून रक्षण करणारा 'पुत्र' होय. पुत्र आपल्या पितृत्रयीस पिंडदानानें संतुष्ट ठेवतो; तो आपल्या वंशाची वृद्धी करतो; व आपल्या जिनगीचें रक्षण व वर्द्धन करतो. असा पुत्र--ठेवा प्राप्त न झाल्यास, त्या निपुत्रिकास आपल्या शास्त्रानें एक तोड सांगितली आहे. त्यानें मुलगा दत्तक घ्यावा. ज्यास दत्तक घ्यावयाचें, तो सगोत्र असून अगदीं जवळचा नातेवाईक असावा; पण जिच्याशीं लग्न करावयाचें, ती असगोत्र असून अगदीं दूरची असावी लागते. ज्यास दत्तक घ्यावयाचें, तो मुलगा शोभेल असा (लहान) असावा; व जीस बायको करावयाची, तीही वरास शोभेल अशी (लहान) असावी. आणखी, दत्तकमीमांसाकार नंदपंडित यांणीं असा एक निर्बंध घातला आहे कीं,

"यन्मातरि नियोगः संभवति तादृशः पुत्रः कार्यः"

"ज्या मुलाच्या आईशीं (दत्तक घेणाऱ्या) गृहस्थाला नियोग करतां येईल, तिचा मुलगा दत्तक घेण्यास योग्य असतो."

[रावसाहेब मंडलिक यांणीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, मनूनें देखील नियोगास जारकर्माच्या तोडीस आणून ठेविलें होतें; व तें लग्नासारख्या जगन्मान्य पवित्र संस्काराच्या पासंगास येत नव्हतें असें ह्मटलें आहे.]

ह्मणून, भाचा, मावसभाऊ किंवा आतेभाऊ यांस दत्तक घेतां येत नाहीं. हा नियोगासंबंधीं निर्बंध सार्वत्रिक नाहीं. अलाहाबाद हायकोर्टांतील न्यायमूर्ति बॉनर्जी यांचें नंदपंडितास अनुकूल असें मत असतांही, फुलबेंचनें त्याविरुद्ध ठराव दिला (भगवान्‌सिंग वि. भगवान्‌सिंग).

सवतीचा मुलगा असला, तर दत्तक घेण्याची गरज नाहीं; कारण, तोच दत्तकासारखा असतो. तसेंच, सख्ख्या भावांपैकीं एकास मुलगा असेल, तर इतर भावांस दत्तक घेण्याची गरज नाहीं; कारण, तो त्या भावांपैकीं प्रत्येकाचा मुलगा आहे असें धरतात. ह्मणून असें ह्मणतात कीं,

भ्रातॄणामेकजातानां यद्येकः पुत्रवान् भवेत् ।
सर्वे ते तेन पुत्रेण पुत्रिणो मनुरब्रवीत् ॥

आतां नवऱ्याचे मागें बायकोस मुलगा दत्तक घेणें असेल, किंवा तिला दुसऱ्यास मुलगा दत्तक देणें असेल, तर त्या कामीं तिला नवऱ्याची संमति पाहिजे. वसिष्ठानीं असें ह्मटलें आहे कीं,

" न स्त्री पुत्रं दद्यात्प्रतिगृह्णीयाद्वान्यत्रानुज्ञाद्भर्तुः । "

या वचनाचा निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळा अर्थ करण्याची चाल आहे. मिथिल देशांतील दत्तविधानांत, संमति देणारा पति हजर पाहिजे; यामुळें, तिकडे विधवेस दत्तक देतांहि येत नाहीं व घेतांहि येत नाहीं. काशी व बंगाल या प्रांतीं विधवेनें अगोदर संमति घेऊन ठेवलेली असली तर, चालते. मुंबईकडे तिनें नवऱ्याची संमति घेतली पाहिजे असें नाहीं; कारण, दत्तविधानासारख्या ज्या कृत्यांनीं नवऱ्याच्या मृतआत्म्यास शांति व उत्तम गति मिळेल, त्या करण्याकरतांच तिचे हातीं त्याची जिनगी आलेली असते. ( पण सुवासिनीस दत्तक घेणें झाल्यास, तिला मात्र आपल्या नवऱ्याचा सल्ला घ्यावा लागतो. ) मद्रासेकडे तिला तशी संमति न मिळेल, तर तिनें आपल्या नवऱ्याच्या सपिंडांची संमति घेतली ह्मणजे झालें. ( रामनाद येथील प्रख्यात मुकदमा. )

नवऱ्याचे मागें मोठ्या सवतीला मुलगा दत्तक घेणें असेल, तर तिला धाकटीचा विचार घ्यावा लागत नाहीं ( रखमाबाई वि० राधाबाई ). पण धाकटीला मात्र मोठीच्या विचाराशिवाय तसें करतां येत नाहीं. यासंबंधीं कलकत्ता हायकोर्टाचें विरुद्ध मत आहे. पण, प्रत्येकीला नवऱ्यानें दत्तक घेण्याचा अधिकार देऊन ठेवला असेल, तर सर्वजणींस पृथक् पृथक् दत्तक घेतां येतो.

अविभक्त कुंटुंबांत, विधवेस मुलगा दत्तक घेणें असेल, तर तिनें आपल्या नवऱ्याच्या भाऊबंदांच्या विचारानें तसें करावें; कारण, दत्तक न घेतल्यास, तिच्या नवऱ्याची जिनगी त्या भाऊबंदांस मिळते

व तिला त्यांजकडून काय तें अन्नवस्त्र मिळतें. [ त्रावणकोर येथील प्रख्यात मुकदमा. ]

विधवेनें नवऱ्याच्या सपिंडांच्या विचारानें दत्तविधान केलेलें असलें ह्मणजे तें योग्य उद्देशानें केलेलें आहे असें धरतात. ( गंटूर येथील प्रख्यात खटला. ) मेन साहेबांनीं आपल्या हिंदुधर्मशास्त्रांत असें ह्मटलें आहे कीं, लग्नाचे बाबतींत, पक्षकाराचा लग्न करण्याचा काय उद्देश आहे हें पहात बसण्याची जशी गरज नाहीं तशी दत्तविधानाचे बाबतींतही नाहीं.

मुलगा दत्तक घेतल्यानें ज्या तिऱ्हाइत इसमांचें नुकसान होण्यासारखें असेल, त्यांचा विचार दत्तक घेणाऱ्या विधवेनें घेतला पाहिजे. ( रूपचंद, वि० रखमाबाई. )

पंजाब, काश्मीर व तिरहूत या प्रांतीं दत्तक घेण्याचा जो प्रकार आहे, त्यास ' कृत्रिम ' ह्मणतात. या प्रकारांत, आईबापांनीं मुलगा कोणास दिलेला नसतो; तर त्यास आपला मुलगा ह्मणून कोणी मानतात, असा मुलगा विधवेनें घेतल्यास तो तिच्याच जिनगीचा वारस होतो; त्यास आपल्या नवीन बापाच्या जिनगीवर वारसा सांगतां येत नाहीं.

मद्रास इलाख्यांतील बल्लारी व तिचे आसपासचे प्रांतांत रड्डी लोकांत जांवयास दत्तक घेण्याचा प्रघात आहे. त्यास ' इलेतम ' ह्मणतात.

मुली दत्तक घेण्याची चाल प्राचीन काळीं असे व हल्लींही कांहीं ठिकाणीं आहे. विश्वयोषितांमध्यें मुली दत्तक घेतात. आईचा धंदा चालू ठेवण्याकरतांच जर असलें दत्तविधान केलेलें असेल, तर तें रद्द होय ( मथुरा, वि० येसू ). पण आईच्या जिनगीवर वारसा सांगण्याकरितां तें केलेलें असेल, तर तें रद्द नव्हे, ( तारानायकीण, वि० नाना ).

एखाद्याच्या जिनगीवरील हक्क बुडविण्याचे हेतूनें, त्यास न विचारतां कोणीं दत्तविधान केलें, तर तें सहा वर्षांत रद्द करवून घेतां येतें; पण

लग्न चुकीनें किंवा कपटानें सगोत्र मुलीशीं झालें, तर त्या बिचाऱ्या पोरीस कायदेशीर रीतीनें दाद मागतां येत नाहीं.

दत्तविधान शिरस्त्याप्रमाणें झालें नसेल, तर तें रद्द करवून त्या दत्तकाच्या हातांतील जिनगी बारा वर्षांचे आंत परत घेतां येते.

पार्वतीबाई, वि० राम; या मुकदम्यांत मद्रास हायकोर्टानें असा निवाडा दिला कीं, जरी वादीनें प्रतिवादीस दत्तक घेऊन त्याच्या जिनगीची अठरा महिने व्यवस्था पाहिली आहे, तरी तेवढ्यानें तिला त्याचें दत्तविधान रद्द ठरवून घेण्यास तोंड नाहीं असें नाहीं. कारण, दरम्यानचा अठरा महिन्यांचा काळ फार थोडा आहे.

दत्तकाशीं पटत नाहीं एवढ्यावरून विधवेस त्याचें दत्तविधान रद्द करून टाकतां येत नाहीं.

मुलगा दत्तक घेतल्यावर, दत्तक घेणाऱ्या गृहस्थास औरस मुलगा झाला तर औरस व दत्तक.

| | औ० | द० |
|---|---|---|
| बंगाल्यांत | $\frac{2}{3}$ | $\frac{1}{3}$ |
| काशींत | $\frac{3}{4}$ | $\frac{1}{4}$ |
| मुंबई व मद्रास येथें | $\frac{4}{5}$ | $\frac{1}{5}$ |


असे वांटेकरी होतात.

आतां, दत्तविधानासारख्या उपयुक्त संस्थेच्या सांप्रत स्थितीकडे वळूं. दत्तक कसा निघेल; तो मोठा झाल्यावर त्यास शिंगें फुटतील कीं काय; तो कोणाच्या नादीं लागून, आपल्यावर उलटून सर्वाचें वाटोळें करील कीं काय; तो छंदीफंदी निघून, आपल्या कुळाचा नांवलौकिक वाढविण्याऐवजीं, त्यास बट्टा लावील कीं काय; असे हजार तऱ्हेचे हजार विचार मनांत येऊन, पुष्कळ दूरदर्शी लोकांना असें वाटत असतें कीं, आपलें सर्वस्व एखाद्या मुलाच्या हातीं देण्याऐवजीं, तें एखाद्या देशहिताचे कामाकडे लावलेलें पुरवलें.

(९) अविभक्त कुटुंब—कलकत्ता हायकोर्टाचे माजी चीफ जस्टिस सर कोमर पेथरॅम यांनीं विलायतेंत नुकतेंच असें बोलून दाखविलें कीं, आजपर्यंत हिंदु लोक पृथ्वीच्या पाठीवर जे दिसत आहेत, त्याचें कारण म्हटलें म्हणजे त्यांच्यांतील एकत्र राहण्याची चाल हें होय. कारण ह्या चालींत अर्थशास्त्रांतील 'संभूय समुत्थानम्' (cooperation) हें तत्व व्यक्त होतें. पण या सोयस्कर चालीस घातक अशा कांहीं समजुती आहेत. त्यांतील प्रमुख समजूत मनूनें अशी दिली आहे 'पृथग्विवर्धते धर्मः' (वेगळें राहिल्यानें धर्म वाढतो). दुसरी वेडगळ अहंकाराची समजूत आहे. तीमुळें कोणतीच संस्था चिरकालिक होणें संभवत नाहीं.

बहवो यत्र नेतारः सर्वे पंडितमानिनः ।
सर्वे महत्वमिच्छन्ति तद्वृंदमवसीदति ॥

'ज्या संस्थेंत पुष्कळ पुढारी असतात, सर्वच डौली असतात, सर्वच मोठेपणाची इच्छा करतात, त्या संस्थेचा नाश होतो.'



वर दिलेल्या आकृतींतील पहिल्या धाकट्या चौकांत ज्यांचीं नांवें दिलीं आहेत, ते वडिलोपार्जित अविभक्त जिनगीचे बरोबरीचे हिस्सेदार असतात. मधल्या व बाहेरच्या चौकांत ज्यांचीं नांवें आहेत, ते त्या अविभक्त जिनगींतून अन्नवस्त्राचेच अधिकारी आहेत. आतां, 'आई' च्या पोटीं 'आजी' येते; म्हणजे 'आई' जशी अन्नवस्त्राची अधिकारीण आहे तशी आजी आहे. तद्वत् 'भावजई' च्या पोटीं 'चुलती' येते. इत्यादि.

हिस्सेदारांस पुढील हक्क असतातः—

(१) अविभक्त जिनगीचा हिशेब पाहणें.

(२) अविभक्त जिनगीवर आपल्या कर्जाचा बोजा लादणें.

(३) अविभक्त जिनगीचा समाइक उपभोग घेणें.

(४) अविभक्त जिनगीची वांटणी मागणें.

हिस्सेदार जननानें, दत्तविधानानें किंवा लग्नानें होतात; व मरणानें दत्तविधानानें किंवा लग्नानें नाहींसे होतात. उ० जननानें 'औरस पुत्र' होतो. दत्तविधानानें 'दत्तक पुत्र' होतो. लग्नानें पति किंवा पत्नी होते. उलट, तोच औरस मेला कीं, त्याचा हिस्सा लुप्त होतो. तसेंच औरसास दुसऱ्याचे मांडीवर दिल्यानें त्याचा मूळ घरांतील संबंध सुटतो. व कन्या, लग्न झाल्यावर, कांहीं विशेष प्रसंगीं दायाद होत नाहीं.

अविभक्त कुटुंब हें बऱ्याच अंशीं व्यापारी पेढीसारखें असतें. (सोमेश्वर, वि. सामळभाई). तरी, त्या दोहोंत पुढें दिल्याप्रमाणें भेद आहे.

| अविभक्त कुटुंब. | पेढी. |
|---|---|
| १. प्रत्येक इसमास कुटुंबाची व्यवस्था पहावी लागत नाहीं. तर कर्त्या पुरुषाकडे ती व्यवस्था असते. | १. प्रत्येक पातीदारास पेढीची व्यवस्था पहावी लागते. |

| | |
|---|---|
| २. प्रत्येक इसमास कुटुंबास होणारा नफातोटा सारखा सोसावा लागत नाहीं; फक्त हिस्सेदारांना सारखा सोसावा लागतो. | २. पेढीस होणारें नफानुकसान प्रत्येक पातीदारास सारखें सोसावें लागतें. |
| ३. प्रत्येक इसमास अन्नवस्त्र मागण्याचा हक्क असतो. | ३. प्रत्येक पातीदारास बरोबरीचा हिस्सामागण्यास हक्क असतो. |
| ४. कुटुंबांतील एखादा इसम नाहींसा झाल्यानें त्याच्या व्यवस्थेस कांहीं बाध येत नाहीं. | ४. पेढींतील एखादा पातीदार नाहींसा झाल्यानें, ती मोडते. |
| ५. कुटुंबांतील परस्परांचें नातें संस्कारानें उत्पन्न झालेलें असतें. | ५. पेढींतील पातीदारांचें नातें करारानें उत्पन्न झालेलें असतें. |

मिताक्षरेंत ' जन्मनैव स्वत्वम् ' [ जन्मल्यानेंच मालकी येते ]. या नियमानुसार, मुलगा जन्मापासून व दत्तक दत्तविधानापासून वडिलोपार्जित अविभक्त जिनगीवर बापाच्या बरोबरीचा वारस असतो. तसेच, नातू व पणतू हे जन्मतः तशा जिनगीवर आज्याच्या व पणज्याच्या बरोबरीचे वारस असतात; परंतु दायभागाप्रमाणें, बाप हा आपले हयातींत वडिलोपार्जित जिनगीचा पूर्ण मालक असतो.

दुसरी गोष्ट अशी कीं, मिताक्षरेप्रमाणें चालणाऱ्या अविभक्त कुटुंबांत एक भाऊ निपुत्रिक होऊन मरण पावला तर त्याची जिनगी त्याच्या विधवेस न मिळतां, त्याच्या मागें राहिलेल्या भावास मिळते. पण दायभागाप्रमाणें ती त्याचे विधवेस मिळते.

आतां, बापाचें नैतिक व कायदेशीर कर्ज मुलानें कां फेडावें तें आपण पाहूं. ऋण फेडल्याशिवाय जे मरण पावतात, ते अधोगतीस जातात. त्यास तेथून सोडवून स्वर्गस्थ करणें यास उपाय ह्मणजे त्यांचें कर्ज फेडणें हा होय, व बापाचे पश्चात् त्यांची जिनगी मुलास जी मिळते, ती केवळ त्याचे आत्म्यास श्राद्धादि क्रियांनीं स्वर्गसुख मिळवून देण्याकरतांच

मिळालेली असते. ह्मणून बापाचे पश्चात् मुलानें त्याचें कर्ज फेडलें पाहिजे, व सध्यांच्या इंग्रेजी कायद्याप्रमाणें बापाच्या जेवढ्या जायदादी असतील, तेवढ्याच कर्जाबद्दल मुलगा जबाबदार धरला जातो. ( गिरिधारीलाल, वि० कंटूलाल ).

बापाच्या हयातींत, सावकारानें त्यावर डिक्री मिळविली; तर तिच्या बजावणींत वडिलोपार्जित जिनगींतील मुलाचा वांटाही वाटेल तर घ्यावा. ( दीनदयाळ, वि० जगदीप नारायण ).

खंडूभाई गुलाबभाई, वि. बळवंतराव खंडूभाई देसाई; या अलीकडील महत्वाचे मुकदम्यांत मुंबई हायकोर्टांतील सर्व न्यायाधीशांचें एकमत होऊन, न्यायमूर्ति रानडे यांनीं जो ठराव वाचून दाखविला, त्यांत असें आहे कीं, अविभक्त कुटुंबांत मुलास आपल्या अविभक्त वांट्यांची विक्री किंवा गहाण, इतर हक्कदारांचा विचार घेतल्याशिवाय, करून देतां येतें. सदरहू मुकदम्यांत, बळवंतरावानें विलायतेंत ब्यारिस्टरीचा अभ्यास करण्यास जाण्याचे हेतूनें आपले वडील खंडूभाई यांजवळून त्यांच्या स्वकष्टार्जित धनांतून कर्ज घेतलें व आपल्या इतर भावांना न कळवितां आपला अविभक्त वांटा वडिलांकडे गहाण लावून दिला. त्यानंतर त्या भावांनीं आपल्या वडिलांबरोबर वांटणी करण्याचा विचार केला. त्यांत हायकोर्टानें बळवंतरावानें केलेला व्यवहार उजू आहे असें ठरविलेलें वर आलेंच आहे. या निकालाचे समर्थनार्थ कोर्टानें ‘ मुत्तुस्वामी, वि० सुब्रह्मण्यम् ’ या मुकदम्यांतील मद्रास हायकोर्टाचें मत पसंत केलें.

पण वायव्य प्रांतांत व बंगाल्यांत मात्र असें चालत नाहीं. तेथें ‘ दीनदयाळ, वि० जगदीप नारायण ’ यांत ठरल्याप्रमाणें रूढि आहे.

बापास स्थावर जिनगीची विक्री, गहाण, खंडचिठ्ठी किंवा बक्षीसपत्र करावयाचें असेल, तर त्यास त्या बाबतींत आपल्या मुलाची संमति व सही घ्यावी लागते ( भाईशेट, वि० शंकर ). पण जंगम जिनगीच्या विल्हेवाटींत तशी भानगड नसते. कारण त्यांत असें धरलें जातें कीं, ती विल्हेवाट त्यानें कुटुंबाच्या हिताकरतांच केलेली असावी. तशीच स्वक-

ष्टार्जित जिनगीच्या विल्हेवाटींतही भानगड नसते. ( पुरुषोत्तम शेणवी, वि० वासुदेव शेणवी ); कारण, तशा जिनगीचा ज्याचा तो पूर्ण मालक असतो.

आतां स्वकष्टार्जित धन ( जिनगी ) कशास ह्मणतात तें आपण पाहूं. याज्ञवल्क्यस्मृतींत, स्वकष्टार्जित धनाविषयीं असें ह्मटलें आहे :—

पितृद्रव्याविरोधेन यदन्यत्स्वयमर्जितं ।
मैत्रमौद्वाहिकं चैव दायादानां न तद्भवेत् ॥

( १ ) पितृद्रव्या ( वडिलोपार्जित धना )स हात न लावतां जी आपल्या निढळत्या घामानें मिळविलेली असते ती. ( २ ) जी मित्रापासून मिळालेली असते ती. ( ३ ) जी लग्नांत मिळालेली असते ती; अशी जिनगी दायादां ( हिस्सेदारां )ना घेतां येत नाहीं.

' विद्याधन ' हें एका प्रकारचें स्वकष्टार्जित धन आहे. तेव्हां त्यावर ज्याची त्यास पूर्ण मालकी आहे. आईबापांनीं नुसतें लिहणें-वाचणें करून दिलें; पण पुढें मुलानें तें वाढवून, आपल्या करामतीवर एखादा धंदा उभारून त्यावर पैसा कमाविला, तर तें त्याचें ' विद्याधन ' होय. अत एव, त्यावर त्याचीच पूर्ण मालकी होय.

बापाचें स्वकष्टार्जित धन त्याच्यामागें मुलास मिळालें ह्मणजे तें ' वडिलोपार्जित धन ' होतें, व त्यांतून मुलांना आपल्या विधवा भावजयीच्या अन्नवस्त्राची सोय केली पाहिजे. ( जानकी, वि० नंदराम; अ० ).

जरी बापापासून कांहीं वडिलोपार्जित धन मिळालें नाहीं, तरी मुलांनीं आपल्या आईचें पालनपोषण केलें पाहिजे. ( सुब्रह्मण्यम्; वि० सुवाका, म० ) यावरून असें उघड दिसतें कीं, ज्या स्त्रीस मुलगा आहे, तीस पतिनिधनानंतर सर्वस्वी दुसऱ्याचे तोंडाकडे पहात बसावयाला नको. तिचा आशांकुर अजिबात तुटलेला नसतो. तिला वाटत असतें कीं, ' असतील बाळ, तर फेडतील काळ! '

बायकोचें वांकडें पाऊल पडेल, तर नवऱ्यानें तिला घरांतून घालवून द्यावें असें मागें आलेंच आहे. पण तीच जर वाटेवर येईल, तर त्यानें

किंवा तिच्या आईबापांनीं किंवा भाऊबंदांनीं, तिला घांसभर अन्न व नेसायास धडोत्रीं दिलीं पाहिजेत. [ वालू, वि० गंगा ; मुं० ].

अन्नवस्त्राची बाकी थकेल, तर विधवेनें भाऊबंदांना कायदेशीर नोटीस देऊन १२ वर्षांच्या आंत त्यांवर फिर्याद ठोकून, ती रकम वसूल करून घ्यावी. मुंबई, मद्रास व कलकत्ता या इलाख्यांचे राजधान्यांतून सॉलिसिटरमार्फत नोटीस द्यावी लागते, व बाहेरगांवीं साध्या वकिलामार्फत दिलेली चालते.

ज्या जिनगींतून विधवेचें अन्नवस्त्र द्यावयाचें असतें, ती त्या विधवेस बुडविण्याचे उद्देशानें, भाऊबंदांनीं विकली व तें कपट खरेदीदारास माहीत असलें तर, त्या विधवेस त्या खरेदीदाराजवळ अन्नवस्त्र मागतां येतें. कारण, तिचें अन्नवस्त्र ह्मणजे त्या जिनगीवरील मोघम जडजोखीमासारखें असतें. [ लक्ष्मण, वि० सत्यभामाबाई ].

ज्या घराचे उत्पन्नांतून विधवेचें अन्नवस्त्र दिलें जातें, तें भाऊबंदांनीं विकलें, तर खरेदीदारास तिला त्या तिच्या राहत्या घरांतून घालवून देतां येत नाहीं. तसें करणें असेल तर भाऊबंदांनीं समजुतीनें त्या खरेदीखतावर तिची सही घ्यावी.

( ६ ) वांटणी---अविभक्त कुटुंबांत बाप हा कर्तापुरुष असतो, व मुलगे साधारणतः त्याच्या आज्ञेंत असतात. 'आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया' ही कालिदासोक्ति थोडीबहुत प्रत्येक घरीं प्रत्ययास येते. त्यामुळें असें कुटुंब एखाद्या राजसत्ताक राज्याप्रमाणें असतें. त्यांत बाप हा राजा व [ समजूतदार ] मुलगे हे प्रधान होत ; पण तेंच बाप वारल्यावर त्या कुटुंबरूपी राज्याचें रूपांतर होतें. त्याचें प्रजासत्ताक राज्य बनतें. बापामागें, वडील मुलगा कर्तासवरता झालेला असल्यामुळें, तो त्यांतील अध्यक्ष होतो व इतर धाकटे भाऊ हे त्यास जरी सल्लामसलत देणारे असतात, तरी ते त्यास बापाइतके वचकत नाहींत. ते त्यास आपल्यांतीलच एक असें लेखतात.

पण ‘ कलौ कृत्या गृहे गृहे ’ असा जेथें प्रकार असतो, तेथें मुलास बायको मिळाली कीं, ती आपला प्रभाव त्यास दाखवूं लागते. ‘ नवीना मीनाक्षी व्यथयति मुनीनामपि मनः ’ मग तीपुढें त्याचा तो काय पाड! ती वांकवील, तसा तो वांकतो. तिला, त्याच्याशिवाय, घरांतलें इतर कोणीही नकोसें होतें. ‘ बंधून् दारयतीति दाराः ’ [ भाऊबंदांत दुही माजविते ती बायको. ] हें अक्षरशः खरें होऊं लागतें व आपल्यांतील एकत्र राहण्याच्या चालींत जी कांहीं गोडी आहे, ती सारी नाहींशी होते. असें झालें ह्मणजे वांटणीवर पाळी येते.

पूर्वीं आईबाप असत, तोंपर्यंत तरी असला अनिष्ट प्रसंग येत नसे. पण आतां तर धडधडीत आईबाप असतां, तसें करण्याचा मुलास हक्क आहे असें सर्वत्र ठरलें आहे. [ आप्पाजी. वि० रामचंद्र मु० ]. आईस मात्र वांटणी करा असें ह्मणतां येत नाहीं. मुलांनीं होऊन वांटणी केली, तर आईस एक वांटा मिळतो.

एखादा भाऊ अज्ञान असेल, तर त्याचा वांटा काढून पंचाचे हवालीं करावा लागतो.


वांटणी झाल्यावर, एखादा भाऊ होईल, तर त्याकरितां वांटणी फिरून केली जाईल. पण बापानें हिस्सा ठेऊन घेतला असेल तर वांटणी पुन्हा करण्याचें कारण नाहीं.

कुटुंबांतील कर्ता पुरुष जिनगीची धुळधाण करीत असेल किंवा ती कपटानें आपल्या घरांत घालीत असेल किंवा इतर कारणामुळें अज्ञान मुलाचें नुकसान होत असेल, व वांटणीमुळें त्याचा फायदा होण्याचा रंग असेल, तर वांटणीची फिर्याद करावी. ( दामोदर, वि०उत्तमराम; महादेव, वि० लक्ष्मण, मुं०. )

वांटणी झाल्यावर, जेवणखाण जरी एकत्र होत असलें तरी हरकत नाहीं; पैशाचा हिशेब वेगवेगळा होत असला ह्मणजे पुरे. तसें नसेल तर भाऊभाऊ एकत्र आहेत असें धरतात. जसजसें नातें दूरचें असतें, तसतशी ही एकत्रपणाविषयींची समजूत कमी कमी होत जाते.

वांटणी झाली, तरी भाऊभाऊ पुन्हा एकत्र होण्याचा संभव असतो. याच कारणास्तव अगदीं कांटेतोल न्याय झाला नसला ह्मणजे, पंच आपल्या पक्षकारांची अशी समजूत घालीत असतात कीं, ‘ ताटांत सांडलें काय आणि वाटींत सांडलें काय—एकूण एकच ! ’

( ७ ) वारसा—जिनगीवरील मालकी, विक्री व बक्षीस या मुख्य ३ प्रकारांपैकीं कोणत्याहि एका प्रकारानें वारसा प्राप्त होते. विक्री व बक्षीस याविषयीं मागें आलेंच आहे. आतां, वारसाविषयीं विचार करूं. मिताक्षरेप्रमाणें चालणाऱ्या प्रांतांत वारसांचा क्रम पुढील नकाशांत दिल्याप्रमाणें आहे :—




मिताक्षरेप्रमाणें जो जवळचा असतो—ह्मणजे ज्याचें नातें किंवा रक्तसंबंध जवळचा असतो—तो दूरच्यास वारसाचे बाबतींत मागें हटवितो. उदाहरणार्थ, ‘ अ ’ या गृहस्थास मरतेसमयीं ‘ आ ’ हा भाऊ व ‘ इ ’ हा मुलगा असे दोन वारस आहेत. तर वर दिलेल्या नकाशाप्रमाणें ‘ अ ’ची जिनगी ‘ इ ’ स मिळेल. तसेंच ‘ क ’ या निपुत्रिक गृहस्थामागें

'ख' ही त्याची बायको व 'ग' ही त्याची आई आहे. आतां सदरहू नकाशाप्रमाणें 'क'ची जिनगी त्याची बायको 'ख' हीस मिळेल.

गुजराथमध्यें व्यवहारमयूख नामक ग्रंथ मान्य आहे. त्याप्रमाणें आईनंतर बहिणी वारसदार होतात.

बंगाल प्रांतीं दायभाग ग्रंथ चालतो. त्याअन्वयें, जो मृतास अधिक पिंड देण्यास अधिकारी असतो, त्यास त्याची जिनगी मिळते व पुरुषास स्त्रीपेक्षां अधिक पिंड मृतास देण्याचा अधिकार असतो. उदाहरण :— 'क' या मृत गृहस्थामागें त्याचे कायते 'ख' व 'ग' हे आईबाप आहेत. आतां बंगालच्या धर्मशास्त्राप्रमाणें 'क'ची जिनगी 'ग'स मिळेल.

( ८ ) स्त्रीधन—ह्मणजे स्त्रीस प्राप्त झालेली किंवा तिनें निढळत्या घामानें मिळविलेली जिनगी. स्त्रीधनाची व्याख्या याज्ञवल्क्यस्मृतींत अशी दिली आहे—

पितृमातृपतिभ्रातृदत्तमध्यग्न्युपागतं
आधिवेदनिकाद्यं च स्त्रीधनं परिकीर्तितम् ॥

" बापानें, आईनें, नवऱ्यानें किंवा भावानें दिलेली; विवाहहोमाजवळ असतांना मिळालेली; दुसरी सवत करतांना ( नवऱ्यापासून ) प्राप्त झालेली; इत्यादि जिनगीस 'स्त्रीधन' ह्मणतात. "

यावर मिताक्षराकार विज्ञानेश्वर ह्मणतात कीं 'आद्यं' या पदानें स्त्रीस वारसानें मिळालेल्या जिनगीचाहि बोध होतो. पण तसें शक्य नाहीं. कारण, वारसानें मिळालेल्या जिनगीवर स्त्रीची कायती तहाहयात मालकी असते. विशेष प्रसंगीं तिला ती विकतां येते. आतां, नवऱ्याचे घरीं, किंवा बापाचे घरीं, किंवा नवऱ्यापासून किंवा बापापासून कोंवारपणीं लग्न झाल्यावर प्राप्त झालेल्या जिनगीस " सौदायिक स्त्रीधन " ह्मणतात. या अर्थाचा याज्ञवल्क्याचा श्लोक असा आहे.

ऊढया कन्यया वापि पत्युःपितृगृहेपि वा ।
भर्तुःसकाशात्पित्रोर्वा लब्धं सौदायिकं स्मृतम् ॥

'सौदायिक स्थावर स्त्रीधन' नवऱ्यापासून बायकोस मिळालेलें असेल, तर त्यास विचारल्याशिवाय तिला त्याची विल्हेवाट करतां येत नाहीं. इतरांपासून प्राप्त झालेल्या स्त्रीधनावर तिची पूर्ण सत्ता असते. तसेंच, मैत्रिणीपासून मिळालेल्या धनावर व स्वताच्या कलाकौशल्याच्या कामानें मिळविलेल्या ( विद्या ) धनावर तिची पूर्ण सत्ता असते.

आतां, स्त्रीधन कोणाकोणा वारसास कोणकोणत्या क्रमानें मिळतें तें पाहूं. डॉक्टर शिरोमणि एम्. ए., एल्एल्. डी. ( कलकत्ता ) यांनीं हिंदुधर्मशास्त्रावरील आपल्या जगन्मान्य ग्रंथांत असा वारसक्रम दिला आहे:—

जिची ती अथवा 'मयत'

|

( १ ) अविवाहित मुलगी.

|

( २ ) गरीब विवाहित मुलगी.

|

( ३ ) श्रीमंत विवाहित मुलगी.

|

( ४ ) मुलीचा मुलगा ( दौहितृ ).

|

( ५ ) मुलीचा नातू.

|

( ६ ) स्वताचा मुलगा ( औरस किंवा दत्तक ).

|

( ७ ) सवतीची अविवाहित मुलगी.

|

( ८ ) ( लग्न पहिल्या चार ब्राह्मादि शिष्ट प्रकारांपैकीं कोणत्या हि एका प्रकारानें झालेलें असेल तर ) नवरा. नाहींतर ( इतर चारांपैकीं कोणत्याहि एकानें झालेलें असेल, तर ) बाप.

बंगालकडे, या क्रमांत कांहीं फेरफार आहेत. ते स्थलावकाश नसल्यामुळें, येथें देतां येत नाहींत.

आपल्यांत स्त्रीधन हा विषय जसा आपल्या दूरदर्शीपणाचा द्योतक आहे, तसा इतर सुशिक्षित लोकांतहि तो आहे. इंग्रज लोकांत मुलीकडील आप्त तिच्या जन्माची सोय, तिचें लग्न होण्यापूर्वींच करून ठेवतात. त्यास ते 'ठरावपत्र' ( Marriage Settlement ) ह्मणतात. त्याप्रमाणें त्या धनाची व्यवस्था पाहणें हें नवऱ्याचें काम असतें. ह्मणजे नवरा हा त्या धनाचा पंच असतो. हें एक प्रकारचें इंग्रज लोकांतलें स्त्रीधन होय. दुसरा प्रकार ह्मणजे विवाहित स्त्रीच्या अंगावरील ऐवज (Paraphernalia) हा होय. व तिसरा प्रकार असा असतो कीं, लग्नानंतर नवरा बायकोस चोळी बांगडी व इतर अशाच हातखर्चाकारितां दर वर्षास एक रकम ठरवून देतो, या स्त्रीधनास इंग्रेज लोक Pin-money ह्मणतात.

मुसलमान लोकांत साहेब लोकांप्रमाणेंच गर्भाधान लग्नाबरोबर होतें; व तेव्हांपासून बायकोस आपल्या माहेरच्या कुलशीलाप्रमाणें अमूक एक रकम मागतां येते. तिला ते 'महर्' ह्मणतात. महंमदी धर्मशास्त्राप्रमाणें प्रत्येकास वाटेल तर एकदम चार बायका करतां येतात. या बहुपत्नीकरणाच्या चालीस प्रतिबंध व्हावा या उद्देशानेंच कीं काय बायकोस नवऱ्याजवळून 'महर्' मागण्याचा हक्क आहे.

( ९ ) दानधर्म---इंग्रेज लोकांत, मठांस देणग्या, अनाथगृहें, रुग्णालयें, देवालयें, रात्रींच्या शाळा इत्यादींत पैसे खर्च करण्याचा परिपाठ आहे, तरी ज्यास असा धर्म करणें असेल, व पुतणे, भाऊ, भाचे असे जवळचे नातेवाईक असतील, त्यास आपल्या मृत्यूपूर्वीं एक वर्ष अगोदर तसें मृत्युपत्र करून, मृत्युतिथीचे अगोदर सहा महिने तें रजिस्टर करून घेतलें पाहिजे. पण न्यायपुरवणींत या बाबतींमध्यें इतकी सवलत आहे कीं, मृत्युपत्रचालकाचें नांव मृत्युपत्रांत कळविलेलें नसेल, तर कोर्टच तें काम करतें. दुसरी अशी गोष्ट आहे कीं, ज्या दानधर्माकरतां मृत्युपत्र-

कर्ता पंचां ( मृत्युपत्रचालकां ) चे हातीं पैसे देऊन ठेवितो, तो होऊन त्या रकमेपैकीं कांहीं उरेल, तर तें तशाच प्रकारच्या दुसऱ्या दानधर्माकडे लावलें जातें.

वरील तिन्ही नियम हिंदुधर्मशास्त्रास व मुसलमानी धर्मशास्त्रास सारखेच लागू आहेत.

मुंबईतील नामांकित वकील कै० आपटे यांस जवळचे नातलग ह्मणजे पुतणे असतांना 'आनंदाश्रमा' कडे आपली जिनगी लावून देतांना सदरहू पहिल्या नियमांत दिल्याप्रमाणें व्यवस्था करून ठेवावी लागली.

मुंबईतील बाबुलनाथाचे देवळाची व्यवस्था पंचांकडे असून, त्यांच्यांतील घोंटाळा मोडण्याकरितां हायकोर्टाचे ॲडव्होकेट-जनरल ( मुख्य सरकारी वकील ) यांस त्यांवर फिर्याद ठोकावी लागली. हेंच जर बाबुलनाथाचें देऊळ बाहेरगांवीं असतें, तर तसलें काम तेथील कलेक्टरास करावें लागतें.

अखेरच्या बाजीराव पेशव्यानें रमण्यांत दक्षिणा वांटण्याची जी रक्कम सांगून ठेविली होती; तींतून विद्वान् ब्राह्मणांस दरवर्षास सनदेप्रमाणें दक्षिणा वांटून, उरलेली बाकी आपले न्यायी इंग्रेज सरकार महाराष्ट्रांतील विद्याभिवृद्ध्यर्थ 'दक्षिणा प्राईझ् कमिटी' व 'दक्षिणा फेलोज्' नांवांच्या संस्थांस देत आहे.

( १७ ) बिनामी व्यवहार---बिनामी व्यवहार ही एका प्रकारची मोघम ठेव ( Implied Trust ) च होय. या व्यवहारांत ज्याचे पैसे असतात, तो मागें राहून, कांहीं इष्ट हेतूस्तव दुसऱ्याचें नांव पुढें करतो.

बिनामी व्यवहार करण्याचा साधारण उद्देश असा असतो कीं, आपले पैसे लोकांचे नजरेस येऊं नयेत; त्यावर सावकाराची धाड पडूं नये व कोर्टाचें शुष्ककाष्ठ पाठीस लागूं नये.

बिनामी व्यवहार सावकारास बुडविण्याचे हेतूनें केलेला असेल, तर तो हिंदी दंडनीतीप्रमाणें गुन्हा होय.

ह्या व्यवहारांत, ज्याच्या खिशांतले पैसे असतात तो मालक व ज्याच्या नांवानें ते ठेवलेले असतात तो त्याचा पंच असतो; अशी सर्व साधारण समजूत असते.

येथवर आपलें हिंदुधर्मशास्त्र कसें आहे याचा ठोकळ मानानें विचार झाला. आपल्यांत रूढीचें प्राबल्य कसें आहे; समाजास गरज वाटल्यास त्यास तिला हळू हळू कसें मागें हटवितां येते व स्वतास किती स्थितिस्थापकता आणतां येते; आपले लग्नविचार कसकसे पालटत चालले आहेत व त्यामुळें गृहसुखाची कल्पना कशी फिरत चालली आहे; आपली कुटुंबव्यवस्था अर्थशास्त्रदृष्ट्या किती फायदेशीर आहे व सांप्रतच्या कलिमाहात्म्यानें तिची कशी धुळधाण उडत आहे; इत्यादि गोष्टींचा विचार 'नागरिक' ह्मणविणाऱ्या प्रत्येक महाराष्ट्रीयानें करावा; हा या लहानशा निबंधाचा उद्देश आहे. तद्वत् एखाद्याची जरी समजूत होईल तरी माझे श्रम सफळ झाले असें मी समजेन.

**लग्नः**—वधू एकाच जातीची, गुणी, असपिण्ड व असगोत्र असावी; अशाविषयीं मनूनें असा उल्लेख केला आहे.

गुरुणानुमतः स्नात्वा समावृत्तो यथाविधि ।
उद्वहेत द्विजो भार्यां सवर्णां लक्षणान्विताम् ॥
असपिण्डा च या मातुरसगोत्रा च या पितुः ।
सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्मणि मैथुने ॥

मनुस्मृतिः ३–४–५.

वधू वराच्या आईबापाशीं सपिण्ड किंवा सगोत्र असतां कामा नये; मनूचा नियम याज्ञवल्क्यस्मृतींतील नियमाशीं जुळत नाहीं. त्यांत असें ह्मटलें आहे कीं, मुलगी वराच्या आईच्या सहा पिढ्यांतली नव्हे, तर चार पिढ्यांतली असूं नये. मनू, कुलूक, व बृहत पराशर यांनीं प्रवराची गोष्ट काढिलेली नाहीं. गौतम व वसिष्ठ यांनीं गोत्राचाहि निर्देश केलेला

नाहीं. यावरून, हें उघड होतें कीं, ऋषीमध्यें असा मतभेद असला कीं, रूढीस धरून चालणेंच ठीक असतें; कारण, चतुर्विंशतिमतानें असें ह्मटलें कीं—

यस्मिन्देशे य आचारः पारंपर्यक्रमागतः ।
वर्णानां किल सर्वेषां स सदाचार उच्यते ॥

" ज्या देशांत जो आचार परंपरेनें चालू असतो, तो सर्व जातींत सदाचार गणला जातो. " अशा दृष्टीनें पाहिलें असतां, सध्यां वधू वराच्या गोत्रांतील नसली ह्मणजे आटोपलें.

रूढीचें प्राबल्य दर्शविणारें आणखी एक असें उदाहरण आहे कीं, बदलवाण किंवा समोरासमोर नवरीस देणें हें शास्त्रसंमत नाहीं, तरी अशी चाल आहे. पहा नारदानें ' प्रत्युद्वाह ' [ बदलवाण ] याविषयीं असें ह्मटलें आहे—

प्रत्युद्वाहो नैव कार्यो नैकस्मिन्दुहितृद्वयम् ।
न चैकजन्ययोः पुंसोरेकजन्ये तु कन्यके ॥

प्रत्युद्वाह कधींही करूं नये, दोन मुली एका गृहस्थास देऊं नयेत; तसेंच एका घरांतील **भावाबहिणींचीं** लग्नें दुसऱ्या घरांतील **बहीणभावंडांशीं** करूं नयेत. असें असूनही याच्या उलट प्रकार सध्यां रूढीचे बळावर शिष्ट मानला जातो.

तसेंच धर्मशास्त्रांत असें सांगितलें आहे कीं,

क्लीबोऽथ पतितस्तज्जः पंगुरुन्मत्तको जडः ।
अन्धोऽचिकित्सरोगाद्या भर्तव्याः स्युर्निरंशकाः ॥

याज्ञवल्क्य.

ह्मणजे नपुंसक, भ्रष्ट व त्याचा मुलगा, पांगळा, मस्त, मंद, अंधळा, महारोगी यांना वारसा सांगतां येत नाहीं, ( ह्मणून ) यास अन्नवस्त्र मागण्याचा हक्क आहे. या मंडळींना पूर्वी लग्न करतां येत नसे. पण वरील याज्ञवल्क्यस्मृतींतील ' तज्जः ' सारख्या पदावरून, त्यांनादेखील लग्न करण्यास हरकत नाहीं. कारण, जे मंत्र वरानें ह्मटले पाहिजेत, ते उपाध्यानें ह्मटलेले चालतात असा प्रघात पडला आहे.

उच्चवर्णांत उपनयन अवश्य आहे, कारण अमुक एका मुदतींत तें न झालें, तर मुक्तीकरितां 'व्रात्यस्तोम' नांवाचा यज्ञ करावा लागतो. पण लग्नाची तशी गोष्ट नाहीं. तें करणें न करणें ज्याच्या त्याच्या खुषी-वर आहे एवढेंच नाहीं, तर नैष्ठिक ब्रह्मचर्य ह्मणजे मरेपर्यंत ब्रह्मचारी राहणें हें इष्ट असें भागवत पुराणांत चकचकित सांगितलें आहे. (स्कंध ११, अध्याय ९ पहा.)

दत्तविधान—लग्न हा 'काम्य' विधी आहे असें वर आलें आहे. तद्वत् दत्तविधानही 'काम्य'च आहे; ह्मणजे मुलगा दत्तक घेण्याची इच्छा असेल तर घ्यावा, नाहीं तर तो घेतलाच पाहिजे अशी धर्मशास्त्राची सक्ति नाहीं; पण तशीच जर सक्ति असती, तर नवऱ्यास आपल्या बायकोस दत्तक घेऊं नकोस असें ह्मणतां आलें असतें. पण बयाबाई, वि० बाळा ऊर्फ व्यंकटेश, या मुकदम्यांत मुंबई हायकोर्टानें असा ठराव केला आहे कीं, नवऱ्यास तसें करतां येत नाहीं. हें जरी सारें खरें आहे, तरी मुलगा दत्तक घेतल्यानें मुक्ति मिळते; ह्मणून दत्तविधानास हरकत करणें हें धर्मविरुद्ध अतएव वेडगळपणाचें आचरण आहे.

आतां दत्तक कोणी घ्यावा यासंबंधीं मूळ निबंधांत आलेंच आहे, तरी त्यांत ब्रह्मचाऱ्याच्या तशा अधिकाराविषयीं आलें नाहीं. ब्रह्मचाऱ्यालाही तसा अधिकार आहे. कारण, निपुत्रिक गृहस्थास आपल्या अंत्यविधीस व पिंडदानास जशी दत्तकाची गरज लागते, तशी ब्रह्मचाऱ्यासही लागते. तद्वत् संन्याशासही अधिकार आहे.

दत्तविधानाच्या स्वरूपाकडे पाहिलें असतां, एखाद्या अज्ञान मुलाचेही मांडीवर मुलगा देण्यास हरकत नाहीं. कारण, जरी दत्तविधानानें ऐहिक फायदा होतो, तरी तेवढ्यावरून, तो दिवाणी करार आहे असें धरतां येत नाहीं. तो लग्नासारखा विधी आहे व त्यापासून ऐहिक व पारमार्थिक फायदे होतात.

वडील भावानें धाकट्या भावास वाटेल तर दत्तक घ्यावें, व विज्ञाने-श्वराचे मतें, तो स्वयंदत्त किंवा कृत्रिम पुत्रहि होऊं शकतो.

पण वडील मुलास दत्तक देतां येतें काय? मनु, विज्ञानेश्वर इत्यादिकांच्या मताप्रमाणें त्यास दत्तक देतां येत नाहीं. कारण, ते असें शास्त्रवचन सांगतात कीं, ' न ज्येष्ठं पुत्रं दद्यात् ' पण व्यवहारमयूखाचा कर्ता नीलकंठ यास हें ह्मणणें पसंत नाहीं. तसेंच, ज्यास एकुलता एक मुलगा आहे, त्यानें तो दुसऱ्याचे मांडीवर द्यावा काय? शौनकानें ' देऊं नये ' असें ह्मटलें आहे. यासंबंधीं त्याचें असें ह्मणणें आहे:—

नैकपुत्रेण कर्तव्यं पुत्रदानं कदाचन ।
बहुपुत्रेण कर्तव्यं पुत्रदानं प्रयत्नतः ॥

पण कै० रा० सा० मंडलिकांच्या मतें या वचनांत कांहीं तथ्यांश नाहीं. त्यांनीं आपली भिस्त कुबेर, नंदपंडित, नीलकंठ, विज्ञानेश्वर व जगन्नाथ या टीकाकारांवर ठेविलेली आहे. कुबेर व नंदपंडित यांच्या दृष्टीनें एकुलता एक मुलगा “ द्व्यामुष्यायण ” (दोन्ही बापांचा एकत्र मुलगा) ह्मणून त्याच्या चुलत्याच्या मांडीवर देतां येतो. कारण अशानें मुलगा देणाऱ्याचा कुलक्षय होण्याची भीति नसते. नीलकंठ, विज्ञानेश्वर व जगन्नाथ यांच्या मतें सदरहू निषेध केवळ दत्तविधान करणाऱ्यास आहे. खुद्द दत्तविधानास नाहीं. ह्मणजे असलें दत्तविधान घडलें, तर तें अशास्त्र नाहीं.

आतां दत्तविधानांत कोणते विधी अवश्य आहेत ते पाहूं. लग्नांत ज्याप्रमाणें, सप्तपदी व विवाहहोम होणें अवश्य आहे, त्याप्रमाणें दत्तविधानांत दत्तकहोम होणें अवश्य नाहीं, फक्त दान व प्रतिग्रह हीं झालीं ह्मणजे उरकलें.

वांटणी—पुढील जिनगी अविभाज्य आहे:—

( १ ) धर्मादायार्थ लावून दिलेली जिनगी. जसें तळीं, विहिरी, धर्मशाळा इत्यादि.

( २ ) जहागिरी—शौर्याबद्दल बक्षिसी ह्मणून मिळविलेली. ( ध्वजाहृत. )

( ३ ) पेन्शनें—इमानेंइतबारें केलेल्या चाकरीबद्दल चालू असणारी रक्कम.

( ४ ) अंगावर असलेले डागडागिने, कपडे इत्यादि.

( ५ ) विद्याधन.

( ६ ) वतनवृत्ति.

( ७ ) पाणी घेण्याचा हक्क, जाण्यायेण्याचा हक्क इ. (Easements)

( ८ ) जी जिनगी स्वभावतःच वांटणी करण्यासारखी नसते ती; जसें, भांडींकुंडीं, गाडीघोडा, स्त्रिया, ( गुलाम किंवा बापानें ठेवलेल्या विश्वयोषिता ).

( ९ ) वैवाहिक किंवा वधूबरोबर मिळालेली जिनगी.

(१०) सोडविलेल्या वंशपरंपरागत जिनगीचा चवथा हिस्सा.

(११) पूर्वींच्या वांटणींत भाऊबंदापासून प्राप्त झालेला ऐवज.

स्त्रीधन व अन्नवस्त्र——विधवेस आपल्या नवऱ्यानें दिलेल्या स्त्रीधनाचे उत्पन्नांतून किंवा त्यानें दिलेल्या स्वकष्टार्जितधनाचे उत्पन्नांतून आपला चरितार्थ यथास्थित चालवितां येत नसेल, तर तिला त्याचे वडिलोपार्जित धनाचे उत्पन्नांतून अन्नवस्त्र मागण्याचा हक्क असतो.

ज्या विधवेस सरकाराकडून पेन्शन मिळत असेल, तिला आपल्या नवऱ्याचे भाऊबंदाजवळ अन्नवस्त्र मागण्याचा हक्क नाहीं.

# हिंदुधर्माचें मनुस्मृत्युक्त स्वरूप.

## प्रस्तावना.

प्रथमतः मनु हा कोण होता हें सांगून नंतर त्यानें सांगितलेल्या तत्वांचा विचार करूं. मनु हा हिरण्यगर्भाचा मुलगा. हा सर्व सृष्टींत आदि होय. ह्यानेंच मरीचि, अत्रि इत्यादि दहा प्रजापतींस उत्पन्न केलें. ह्या वाराहकल्पाचे ठिकाणीं कोणी एकाकाळीं ईश्वराचे मनांत सृष्टि उत्पन्न करण्याचें आलें. त्यानें आपल्या इच्छेनें आपले दोन भाग एक स्त्री व दुसरा पुरुष असे केले. त्या दोन भागांमधील जी स्त्री ती शतरूपा व जो पुरुष तो धर्मशास्त्राचा कर्ता स्वायंभुव मनु होय. शतरूपेपासून मनूस प्रियव्रत व उत्तानपाद असे दोन मुलगे झाले. आणि आकूति, प्रसूति आणि देवहूति अशा तीन कन्या झाल्या. प्रियव्रत महान् तपस्वी राजा होऊन गेला. ह्यानें ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें अनेक वर्षें राज्य केलें. ह्याच्या कुळांत भगवद्भक्त, कारुणिक आणि जीवन्मुक्त असे ऋषभ, भरतादि बलवान राजे होऊन गेले. उत्तानपाद राजापासून ध्रुव, अंग, पृथुप्रभृति कीर्तिमान आणि दुसऱ्यावर अनुग्रह करण्यास तत्पर असे राजे झाले.

यज्ञावतार विष्णुप्रभृति संतति आकूतीला झाली. देवहूतीपासून सांख्यशास्त्र निर्माणकर्ता कपिल महामुनि उत्पन्न झाला. आणि देवहूतीपासूनच मरीचि, अत्रि, आंगिरस इत्यादि सृष्टि उत्पन्न करणारे प्रजापती झाले. आणि प्रसूति दक्षास दिली. ह्याप्रमाणें सर्व जगाला व्यापणाऱ्या राजवंशाला कारण असा हा मनु ब्रह्मावर्त क्षेत्राचे ठिकाणीं बर्हिष्मती नगरीमध्यें मन्वंतर पालटेपावेतों राहून पृथ्वीचें पालन करून मोठमोठे यज्ञ करून आनंदांत राहिला. योगसिद्धीमध्यें तो फार

निष्णात होता. ह्याप्रमाणें ईशध्यानांत आनंदानें दिवस काढीत असतां त्यास भृगुप्रभृति ऋषींनीं धर्मतत्वें विचारिलीं. तेव्हां मनूनें तीं त्या ऋषींस सांगण्यास मोठ्या आनंदानें प्रारंभ केला. त्या तत्वांचा उपदेश मनूनें संहितारूपानें दुसऱ्या ऋषींस कथन केला. या मनुस्मृतीमध्यें सृष्टीच्या उत्पत्तीपासून सर्व वर्ण व अनुलोमप्रतिलोमादि संकरजाती यांचा त्यांच्या संपन्न अवस्थेंतील आणि दारिद्य अवस्थेंतील सामान्य व विशेष असा वेदप्रणीत धर्म सांगितला आहे. राजानें न्यायासनावर बसल्यावर कसें वागावें यासंबंधानें मनुस्मृतींत लिहिलें आहे. मनुस्मृतीचें वेदामध्येंसुद्धां वर्णन आहे. छांदोग्य ब्राह्मणामध्यें ह्मटलें आहे कीं, "जें मनु बोलला तें औषध आहे. कारण त्यापासून दुसऱ्याचें कल्याण होतें." मनूला विपरीत अशी स्मृति प्रमाणास योग्य नाहीं असें बृहस्पतीनें आपल्या स्मृतींत लिहिलें आहे. व्यासांनीं असें ह्मटलें आहे कीं, पुराण, मानवधर्मशास्त्र, अंगासहित वेद व वैद्यक यांस कारणें लावूं नयेत.

# हिंदुधर्माचें मनुस्मृत्युक्त स्वरूप.

## भाग पहिला.

## सृष्टीची उत्पत्ति.

भृगुप्रभृति ऋषींनीं मनूची अर्घ्यपाद्यादि पूजा केल्यावर, सर्व वर्णांनीं आणि अनुलोमप्रतिलोमादि संकरजातींनीं कसें वागावें ह्मणजे त्यांचे स्वार्थ परमार्थ साधतील असा धर्म आह्मांस सांगावा अशी त्याची प्रार्थना केली. ती विज्ञप्ति मनूनें आनंदानें मान्य करून धर्म सांगण्यास आरंभ केला.

तो ह्मणाला—जेव्हां ईश्वराचे मनांत सृष्टि उत्पन्न करण्याचें आलें, त्यावेळीं तो सर्वशक्तिमान्, तेजस्वी, स्वयंभू ईश्वर आपणच प्रकट झाला. जो मनानेंच जाणण्यास योग्य, जो सर्व चराचर भूतांना व्यापून असणारा, जो अचिंत्य सनातन आणि अप्रमेय असा आहे, तो सर्वज्ञ प्रभु सृष्टि उत्पन्न करण्याकरितां प्रकट झाला. त्यानें प्रथमतः उदक उत्पन्न केलें व त्या उदकांत एक बीज निर्माण केलें. त्यानें त्या बीजापासून सुवर्णासारखें दैदीप्यमान असें एक अंडें निर्माण केलें. त्या अंड्यांत सर्वांचा पितामह ब्रह्मदेव स्वतः उत्पन्न झाला. ब्रह्मदेवानें त्या अंड्यांत एक वर्ष वास करून तें अंडें दुभागलें. आणि त्या शकलापासून, भूमि, स्वर्ग, महाभूतें, इंद्रियें, मन, अहंकार इत्यादि उत्पन्न केलें. त्या शकलांपासूनच अग्नि, वायु, रवि, नक्षत्र, वृक्ष, इत्यादि निर्माण झालें. अग्नि, वायु, रवीपासून ऋक्, यजु, आणि साम असे वेद निघाले. नंतर सिंहव्याघ्रादि हिंसा करणारे व हरिण, ससा इत्यादि हिंसा न करणारे पशू उत्पन्न झाले. ब्रह्मदेवानें तप करून ब्राह्मणादि वर्ण उत्पन्न करण्याकरितां आपला देह द्विधा करून एका भागापासून पुरुष व दुसऱ्या भागा-

पासून स्त्री असें दंपत्य निर्माण केलें. त्या दंपत्यापासून विराट पुरुष उत्पन्न झाला. नंतर तपश्चर्या करून विराट पुरुषानें मजला निर्माण केलें. मी तप करून मरीचिप्रभृति दहा प्रजापती केले. त्यांनीं सात मनु उत्पन्न केले. त्यापासून यक्ष, राक्षस, पिशाच, गंधर्व, अप्सरा, दैत्य, नाग, सर्प, गरुड, पितर, विद्युत, मेघ, केतु, किन्नर, मासे, पशु, पक्षी, मनुष्य, कृमि कीटक, स्थावर, जंगम, ओषधी, फल, पुष्प, तृण, इत्यादि उत्पन्न झालें.

## प्रलय.

अशा तऱ्हेनें सर्व जगाची उत्पत्ति करून प्रलयाचे वेळीं ही सृष्टि ईश्वर आपणाशींच लीन करितो. जेव्हां तो ईश्वर जागतो, तेव्हां सर्व जग चेष्टायुक्त असतें. जेव्हां तो निजतो, तेव्हां जग प्रलयरूपाला पावतें. ह्याप्रमाणें कृत, त्रेत, द्वापार आणि कलि अशी चौकडी फिरतां फिरतां कितीएक वर्षांनीं हें जग त्या परम्यात्म्याचे ठिकाणीं लीन होतें. असा महाप्रलय झाल्यावर तो ईश्वर पुनरपि सृष्टि उत्पन्न करितो. कृतयुगांत तप, त्रेतायुगांत ज्ञान, द्वापारांत यज्ञ आणि कलींत दान असे युगांच्या कालमानानें आणि मनुष्यांच्या आयुष्याचे धोरणानें धर्म सांगितले आहेत.

## वर्णधर्म.

**ब्राह्मणांचे धर्म**—वेदाध्ययन, अध्यापन; स्वतः यज्ञ करण, आचार्यत्व स्वीकारून दुसऱ्याकरितां यज्ञ करणें; दान देणें व दुसऱ्यानें दिलेल्या दानाचा प्रतिग्रह करणें. असे सहा ब्राह्मणांचे मुख्य धर्म होत.

**क्षत्रियधर्म**—प्रजापालन, दान करणें, याग करणें; वेदपठण, विषयांचे ठिकाणीं अप्रसक्ति असणें हे क्षात्रधर्म होत.

**वैश्यधर्म**—पशूंचें रक्षण, वेदाभ्यास, याग, दान देणें, व्यापार करणें व शेतकी हे वैश्यधर्म होत.

**शूद्रधर्म** ह्मणजे वर्णत्रयांची सेवा होय.

हें धर्मशास्त्र ब्रह्मदेवानें मनूस आणि मनूनें भृगु, मरीचिप्रभृतींस आणि भृगूनें मनूच्या आज्ञेवरून इतर ऋषींस सांगितलें.

ह्या मानव धर्मशास्त्राचे अध्ययनापासून मनुष्यांचें कल्याण होतें. आयुष्य वाढतें. सदसज्ज्ञानानें आचार सुधारून कीर्ति पसरते. बुद्धि प्रगल्भ होते. ह्याकरितां सर्वाधिकाऱ्यांनीं मनुस्मृतीचें पठण करावें.

## धर्माची व्याख्या व त्याचें सामान्य स्वरूप.

वेदशास्त्रसंपन्न, रागलोभ इत्यादि विकार ज्यांचे गेले आहेत, असे सदसद्विचार करणारे ह्मणजे ज्यांचें आचरण शुद्ध आहे अशा विद्वानांनीं घालून दिलेल्या मार्गास धर्म ह्मणावें. धर्माचीं प्रमाणें वेद, स्मृति, साधूंचा आचार आणि आपली तुष्टि ( मनाचा संतोष ) हीं आहेत.

वर्णांचा आणि संकरजातींचा ज्या देशामध्यें परंपरेनें आलेला जो सशास्त्र आचार त्यास सदाचार असें ह्मणावें.

जो मनुष्य कुतर्क काढून वेदशास्त्रांची निंदा करितो तो नास्तिक होय. नास्तिकास सर्वांनीं बहिष्कार घालावा ह्मणजे त्याच्याशीं अन्नोदकसंबंध ठेवूं नये. वेदाचा अभ्यास, होम करणें, पंचमहायज्ञ हीं आपल्या शरीरानें ब्रह्मानंदानुभव घेण्यास योग्य साधनें आहेत. सोळा संस्कारानें शुक्रसंबंधीं आणि गर्भसंबंधीं दोष नाहींसे होतात. ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद यांपासून ईश्वरानें प्रणव आणि त्रिपदा सावित्री हीं काढिलीं आहेत. संध्याकालीं जो ब्राह्मण त्रिपदा सावित्रीचा जप करितो, तो वेदपुण्यानें युक्त होतो. जो ब्राह्मण, क्षत्रिय अथवा वैश्य जप करणार नाहीं, तो शूद्र होतो. जो ब्राह्मण अनलसपणें तीन वर्षें जप करितो तो ब्रह्मपदाला जातो. ( कलियुगामध्यें मनुष्यांचें आयुष्य फार कमी, त्यांतून अनाचारानें तें दिवसेंदिवस कमी होत आहे. आतां पूर्वींसारखें लोहपिष्ट भक्षण करून हजारों वर्षें तप व्हावयाचें नाहीं. ह्मणून कलियुगांत जपावांचून तप सांगितलें नाहीं. ) संपूर्ण यागास जपाच्या सोळाव्या हिशाचेंदेखील माहात्म्य नाहीं, असें गायत्री जपाचें माहात्म्य आहे. ज्याप्रमाणें सारथी घोड्यांना ताब्यांत ठेवितो, त्याप्रमाणें आपण आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेवावीं. श्रोत्र, त्वक्, चक्षु, जिह्वा, नासिका, पायु, उपस्थ, हस्त, पाद, वाक् अशीं दहा इंद्रियें आहेत. पहिलीं

पांच इंद्रियें यांस ज्ञानेंद्रियें आणि दुसरीं पांच इंद्रियें यांस कर्मेंद्रियें असें ह्मणावें. व मन हें अकरावें इंद्रिय आहे आणि मनाला जो जिंकितो तो सर्व जगाला जिंकील. प्रात:कालीं सूर्य दिसेपावेतों आणि सायंकालीं सूर्य मावळल्यापासून नक्षत्रदर्शनापर्यंत सावित्रीजप करावा. जो संध्या करित नाहीं त्यास ब्राह्मणांनीं बहिष्कार घालावा. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास असे चार आश्रम आहेत. ब्रह्मचर्य आश्रमामध्यें उपनयन झाल्यावर गुरूच्या येथें राहून वेदशास्त्रांचा अभ्यास करावयाचा. नंतर विवाह करून अध्ययन, अध्यापन नानाप्रकारचे याग केल्यावर पुत्रोत्पादनार्थ भार्येचे ठिकाणीं रत होऊन प्रपंच करावा. नंतर संसाराचा भार आपले वडील मुलावर टाकून इंद्रियदमन आणि वेदांतशास्त्राचा अभ्यास घरीं राहूनच करावा. आणि शेवटीं सर्वसंगपरित्याग ह्मणजे घर सोडून अरण्यामध्यें जाऊन ब्रह्मचिंतन करून आत्मज्ञान मिळवावें, असें थोडक्यांत चार आश्रमांचें वर्णन झालें. उपनिषदादि गूढ विद्येचा उपदेश श्रद्धालु आणि सदाचारी अशा शिष्यास करावा ह्मणजे त्यापासून फल होतें; आणि त्या शिष्याचे मनांत तो उपदेश चांगला ठसतो आणि दुराचारी व नास्तिक अशा शिष्याला केलेल्या उपदेशापासून फल प्राप्त होत नाहीं.

विधिनिषेध जाणून धर्मशास्त्राप्रमाणें वागणारा ब्राह्मण जरी नुसती गायत्री जाणणारा असला, तरी तो पूज्य आहे. जो धर्मशास्त्राप्रमाणें वागत नाहीं व जो कांदा, लसूण वगैरे निषिद्ध पदार्थांचें भक्षण करतो, तो जरी तीन वेद जाणणारा असला तरी तो निंदेस पात्र होतो. ज्या मनुष्यानें आपले कान वेदमंत्रांनीं पावन केले, ह्मणजे ज्यानें आपणांस वेद शिकविला तो आपणास मातापितरांप्रमाणें पूज्य आहे. त्याचा आपण केव्हांहि द्रोह करूं नये. उपाध्यायापेक्षां आचार्य, आचार्यापेक्षां पिता आणि पित्यापेक्षां माता योग्यतेनें मोठी आहे. जो अज्ञानी त्यालाच लहान ह्मणावें. कारण लहानपणा हा वयावर नाहीं. जो वेद देतो त्याला बाप ह्मणावें. कारण उपनयन हें ब्राह्मण, क्षत्रिय

आणि वैश्य यांचा दुसरा जन्म होय. ज्याप्रमाणें कातड्याचा हत्ती आणि लांकडाचा वगैरे हरीण जसे नामधारी, कारण त्यांपासून कांहीं उपयोग अथवा उपद्रव होत नाहीं, त्याप्रमाणें जो ब्राह्मण अविद्वान् आहे तो नुसता नांवाचा ब्राह्मण होय. माता, पिता व गुरु यांची सेवा देवाप्रमाणें करावी. कारण ते आपणांस तीन वेदांप्रमाणें पूज्य आहेत.

## ब्रह्मचर्याश्रम.

उपनयन झाल्यावर ब्राह्मणानें गुरुगृहीं राहून वेदाचा अभ्यास करावा. प्रातःकाळीं स्नानसंध्यादि विधी आटपल्यावर भिक्षा मागून आणावी. नंतर गुरूची आज्ञा घेऊन यथाविधि भोजन करावें. दिवसां निद्रा घेऊं नये. शुचिर्भूतपणानें वागावें. अढळ ब्रह्मचर्यानें असावें ह्मणजे, कायिक, वाचिक आणि मानसिक कोणत्याहि. प्रकारानें स्त्रीसंगाविषयीं दुष्ट कामना धरूं नये. जो मनुष्य विधिप्रमाणें ब्रह्मचर्यानें मरेपर्यंत वागतो, त्यास मोक्षप्राप्ती होते. जन्मभर ब्रह्मचर्यानें वागणें फार बिकट असल्यामुळें वेदांचें अध्ययन झाल्यावर शास्त्रें व नाना कला यांचा अभ्यास करून गुरूच्या आज्ञेनें ब्रह्मचर्याची समाप्ति करून समावर्तन ( सोडमुंज ) करावें. ( अभ्यासक्रम वगैरे पुढें तिसऱ्या भागांत येईल. )

ह्याप्रमाणें तीन, दोन अथवा एक वेद शिकून गुरूचे आज्ञेनें गृहस्थाश्रम स्वीकारावा.

## गृहस्थाश्रम.

ह्या आश्रमांत चांगल्या कुलांत उत्पन्न झालेल्या व सुशील अशा स्त्रीशीं विवाह करावा. यथान्याय उपजीविकेचें साधन मिळवून फावलेल्या वेळांत वेदाध्ययन व अध्यापन करावें. आणि यज्ञयागादिक कर्में यथाशक्ति करावींत. ब्रह्मयज्ञ, पितृयज्ञ ( तर्पण ), देवयज्ञ ( होम ) भूतयज्ञ ( भूतबलि ), मनुष्ययज्ञ ह्मणजे अतिथीचें पूजन ह्यांस पंचमहायज्ञ ह्मणतात. अग्नीमध्यें यथाविधि घातलेली आहुति सूर्यास पोंचते.

सूर्यापासून वेळच्यावेळीं वृष्टि होते. वृष्टीपासून अन्न उत्पन्न होतें आणि अन्नापासून प्रजा वाढते. पंचमहायज्ञादि वेदोदित कर्म अनलस करावें. त्यायोगें मनुष्य मरणानंतर उत्तम लोकाला जातो. पहांटेस दोन तास रात्रीं उठून धर्म व अर्थ यांचा विचार करावा आणि वेदतत्त्वांचें चिंतन करावें. सूर्यास्त व सूर्योदय ह्यांच्या संध्याकालीं ब्राह्मणानें पुष्कळ सावित्रीजप केल्यानें त्याचें आयुष्य, कीर्ति व बुद्धि वाढते. ह्मणून संध्याकालीं नेहमीं जप करावा. अमावास्या, अष्टमी, चतुर्दशी या दिवशीं वेद ह्मणूं नये, भार्या ऋतुमती असतांनाहि अमावास्या, चतुर्दशी, अष्टमी आणि पौर्णिमा या दिवशीं ब्रह्मचर्यानें वागावें. जे नेहमीं शुचिर्भूत असून, जपहोमादि क्रिया आस्थेनें आणि विधिपूर्वक करतात, त्यांस दैविक पीडा, शारीरिक व्याधि न होतां राजापासून किंवा चोर, लुटारू वगैरे दुष्ट लोकांपासून कोणत्याही प्रकारचा उपद्रव होत नाहीं. वेदाभ्यासानें, शुद्धीपणानें वागण्यानें आणि यथाशास्त्र तप केल्यानें मनुष्यांस पूर्वजन्मीची आठवण होते. पूर्वजाति स्मरून पुनरपि वेदांताचा अभ्यास केल्यावर मनुष्यांस ब्रह्मानंदाचा लाभ होतो. अधार्मिक आणि पापी प्रथम किती जरी विद्वान् झाले अथवा श्रीमंत झाले, तरी ते लवकरच अधर्मानें वागल्यामुळें दरिद्री होतात. दारिद्र्यामुळें कार्याकार्यविचार नाहींसा होऊन मनुष्य मूढ होतो. आपल्यास शास्त्र माहित नसल्यास आपला बाप, आजा आणि पणजा वगैरे पूर्वज ज्या मार्गानें गेले, त्या मार्गानें आपण जावें. कोणालाही पीडा न करितां मनुष्यानें धर्म आणि अर्थ यांचा संचय करावा. हिंसा न करणें, खरें बोलणें, ब्रह्मचर्यानें राहणें, कोणताही कलंक नसणें आणि चोरी न करणें यांस यम ह्मणावें. अक्रोध, गुरुशुश्रूषा, आहार, लाघव, आणि अप्रमाद यांस नियम ह्मणावें. नियमापेक्षां यम फार महत्वाचे आहेत. ज्याप्रमाणें मुंग्या वारुळ करतात, त्याप्रमाणें आपण सावधानपणानें धर्माचें अर्जन करावें. आपण मेल्यावर परलोकीं मदत करण्याला आपला बाप, आई, भाऊ, बायको, इष्टमित्र हीं येत नाहींत.

तर परलोकचा साहाय्यकारी एकटा धर्मच आहे. प्राणी जन्मास येतो व तो एकटाच मरतो. आणि मानसिक व शारीरिक दुःखेंही तो एकटा भोगतो. स्वर्गादि पारलौकिक आणि राज्यादि ऐहिक सुखेंसुद्धां तोच घेतो. प्राणी मेल्यावर त्याचें शरीर लांकडाप्रमाणें अथवा मातीचे ढेंकळाप्रमाणें स्मशानांत टाकून भाऊबंद आणि आप्तइष्ट घरीं परत येतात. एकटा धर्मच त्याबरोबर जातो. ह्मणून आपल्या मदतीस धर्म हळूहळू मिळवावा. धर्माचे मदतीनें पाप नाहींसें होतें. गृहस्थाला तीन ऋणें द्यावीं लागतात. यथासांग वेदाध्ययनानें ऋषींचें ऋण फिटतें; पुत्रोत्पादनानें पितरांचें ऋणांतून तोमोकळा होतो; आणि यज्ञानें देवांचें ऋण नाहींसें होतें.

## वानप्रस्थाश्रम.

मुलगा प्रपंच करण्यास योग्य झाल्यावर त्याचे अंगावर गृहभार टाकून आपण घरामध्यें एकीकडे अथवा अरण्यामध्यें जाऊन रहावें. इंद्रियांच्या भोगेच्छा दिवसेंदिवस कमी केल्या पाहिजेत. म्हणजे मन शांत होऊन ईशचरणीं लीन होतें. ह्या आश्रमांत हळूहळू ममतापाश टाकून निरिच्छ होऊन ब्रह्मचिंतनांत निमग्न व्हावें. कारण मृत्यूचे दिवस समीप येत असतात. वेदाचा अभ्यास न केल्यानें, सदाचार टाकल्यानें, आळसानें निषिद्ध अन्न भक्षण केल्यानें मनुष्यांस मृत्यु येतो. ( पूर्वीचे ऋषि सदाचारानें वागत, वेदवेदांतांत निमग्न असत व निषिद्ध पदार्थ भक्षण करीत नव्हते, ह्मणून त्यांस लवकर मृत्यु येत नसे. परंतु आतां वेदाचें अध्ययन बुडालें. भक्ष्याभक्ष्यविचार मुळींच उरला नाहीं, ह्मणून लोक अकालीं मरूं लागले आहेत. ) लसूण, गाजर, कांदा, छत्र आणि विष्ठा वगैरे अमेध्य पदार्थांपासून झालेले पदार्थ खाण्याला निषिद्ध आहेत. ब्रह्मदेवानें स्थावर आणि जंगम पदार्थ प्राण्यांच्या अन्नाकरितां उत्पन्न केले आहेत. मृगादि चर प्राण्यांचें तृणादि अचर पदार्थ हें अन्न होय. व्याघ्रादि दाढा असलेल्या प्राण्यांचें हरिणादि दंष्ट्राविरहित

पशू हें अन्न आहे. हात असलेल्या प्राण्यांचें भक्ष्य हात नसलेले प्राणी; आणि शूरांचें अन्न भीरू हें आहे. यज्ञामध्यें मांसभक्षणाला आणि सुरापानाला दोष नाहीं; परंतु सुरा कलियुगांत यज्ञांतदेखील निषिद्ध धरली आहे. परंतु मांसभक्षणापासून, सुरापानापासून आणि विषयापासून परावृत्त असणें फार पुण्यकारक आहे. विद्वान् क्षांतीनें शुद्धि पावतात, वाईट आणि निंद्यकर्म करणारे दानानें शुद्ध होतात, ज्यांचीं पापें प्रकट झालीं नाहींत असे लोक जप करून शुद्ध होतात, आणि वेद जाणणारे तपानें पावन होतात. वानप्रस्थ आश्रमाचे वेळीं त्या त्या काळीं पिकलेलीं अथवा आपोआप वाळलेलीं पानें आणावीं आणि तीं भक्षण करावीं. गोड फळ भक्षणाकरितां आणि उष्ण निवारण्याकरितां प्रयत्नशून्य असलें पाहिजे. घरदार, बायकोमुलें यांचें ममत्व टाकलें पाहिजे. देवऋण, पितृऋण व ऋषिऋण फेडून मन मोक्षमार्गास लावावें. ह्यावेळीं मनुष्यानें जितेंद्रिय असलें पाहिजे. जितेंद्रिय कोणास ह्मणावें तें सांगतों. जो मनुष्य आपली कटु भाषणानें केलेली निंदा व गौरवानें केलेली स्तुति ऐकून, शालजोडीचा वगैरे सुखस्पर्श आणि घोंगडीचा वगैरे दुःसह स्पर्श सहन करून, सुरूप आणि कुरूप पाहून, गोड आणि कडू खाऊन, सुवासिक आणि दुर्गंधयुक्त पदार्थ यांचा वास घेऊन, हर्ष आणि विषाद मानीत नाहीं तो मनुष्य जितेंद्रिय होय. जो मनुष्यजितेंद्रिय आणि निरिच्छ झाला तो मोक्ष मार्गास लागण्यास योग्य होतो.

## संन्यास.

सर्वसंगपरित्याग करून यथाविधि संन्यास स्वीकारावा. ब्रह्मचिंतनाखेरीज दुसरा निदिध्यास असूं नये. ज्याचें भिक्षापात्र ह्मणजे मातीचें खापर, ज्याला रहावयाला घर ह्मणजे झाडाचें मूळ, ज्याचें वस्त्र शीतउष्ण निवारण्याकरितां ओबडधोबड कंथा, आणि सर्वत्र ब्रह्मबुद्धि असल्याकारणानें ज्याला शत्रुमित्र नाहींत, ह्मणजे जो निरिच्छ, निर्विकार आणि निर्मम आहे,

त्याला मुक्त ह्मणावें. जो मरण आणि जीवन ह्यांची किंमत सारखीच समजतो, ह्मणजे सुखोपभोगार्थ जगावें आणि दुःख सहन होत नाहीं ह्मणून मरावें अशी जो इच्छा करीत नाहीं, आणि आपल्या मरणकालाची जो निर्भयपणें प्रतीक्षा करितो त्यासच मुक्त ह्मणावें. नीट पाहून भूमीवर पाय ठेवावा, वस्त्रानें गाळून जल प्यावें, खरें असेल तेवढेंच मनानें योग्यायोग्य सारासार विचार करून बोलावें. आपली कोणी निंदा केली तर आपण त्याची उलट निंदा करूं नये. कोणाशीं वैर करूं नये. योगाचा अभ्यास करावा. निरपेक्ष असावें. विषयासक्त असूं नये. आपल्या देहाच्याच साहाय्यानें मोक्षसुखार्थ आपण जगांत वागावें. प्राणरक्षणापुरती एकदां भिक्षा मागून भोजन करावें. अल्प आणि निःसत्व अन्न खावें, ह्मणजे विषयाकडे मनाची प्रवृत्ति होत नाहीं. भिक्षादिकांचा लाभ झाला नाहीं तर खेद पावूं नये, आणि लाभ झाला तर हर्ष मानूं नये. प्राणरक्षणापुरतीच अन्नाची अपेक्षा करावी. दंडकमंडलूचे ठिकाणीं चांगल्यावर प्रीति आणि वाईटावर क्रोध करूं नये. इंद्रियांच्या निग्रहानें, रागद्वेषाच्या अभावानें, प्राण्याची हिंसा न केल्याकारणानें हा देह मोक्षास योग्य होतो. अधर्मानें मनुष्यास दुःख होतें. ब्रह्मसाक्षात्काराला जनक व मोक्षलक्षण जें सुख त्याचें आपण नेहमीं चिंतन करावें. सर्व भूतांचे ठिकाणीं ह्मणजे सर्व वस्तुमात्रावर ब्रह्मबुद्धीनें असावें. भगवीं वस्त्रें, दंडकमंडलू इत्यादि चिन्हें संन्यासधर्माचें लक्षण नव्हे. चिन्हांवरून धर्म जाणावयाचा नाहीं. विहित कर्म केल्यानें धर्माचें अर्जन होतें. प्राणायाम करणें मोठें तप होय. ज्याप्रमाणें अग्नीमध्यें सुवर्णादि धातूंचा दोष नाहींसा होतो, त्याप्रमाणें प्राणायामानें शारीरिक दोष नाहींसे होतात. परब्रह्माचे ठिकाणीं मन लावलें असतां पाप नाहींसें होतें. विषयापासून इंद्रियांचें आकर्षण केल्याकारणानें विषयांचा संपर्क कमी होतो. परमात्मरूपी जो ईश्वर तोच मी आहें, इत्यादि ध्यान केल्यानें, क्रोध, लोभ, मोह इत्यादि अनीश्वर गुणांचा ऱ्हास होतो. ज्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला, तो संपूर्ण कर्मापासून मुक्त होतो, ह्मणजे

तो जननमरणाच्या फेऱ्यांतून चुकतो. ज्याला ब्रह्मसाक्षात्कार होत नाहीं, तो जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडतो.

## सामान्य धर्मतत्त्वांचा विचार.

अहिंसेनें, इंद्रियांच्या निग्रहानें, वेदविहित कर्में केल्यानें, उग्र तप आचरणानें मनुष्य ह्या लोकांतच ह्याच शरीरांत असतां ब्रह्मपदाला जातो. आतां आपलें देहस्वरूप कसें आहे तें पाहूंया. अस्थिरूपी स्थाणूनें युक्त, स्नायुरूपी दोऱ्यांनीं बांधलेलें, रक्तमांसांनीं अनुलिप्त, कातड्यानें आच्छादित आणि मूत्रपूरीषानें भरलेलें असें अमंगल आपलें शरीर आहे. त्याचप्रमाणें तें जराशोकांनीं युक्त, क्षुधा तृषा यांनीं आतुर, नानाविध रोगांचें स्थानच असून घटकाभरसुद्धां त्याचा भरंवसा नाहीं असें हें मूत्रपूरीषानें अमंगल व क्षणभंगुर शरीर असतां प्राणी त्यावर निरतिशय प्रेम करतो. सर्व प्राण्यांत श्रेष्ठ आणि ज्ञानवान् असून मनुष्य त्यावर किती लोभ करतो? ह्या शरीराकरितां तो सर्वस्वाचादेखील त्याग करतो. तो ह्या शरीराला आत्मा समजून आत्म्याचे अविनाशी गुण शरीरावर मानतो आणि शरीरावरील नाश पावणारे गुण आत्म्यावर मानतो. मी काळा, मी गोरा, मी ज्ञानी, मी मूर्ख इत्यादि अहंभावानें तो शरीर आणि आत्मा एकच समजतो. परंतु वेदार्थाचा विचार केल्यावर आपणास आत्मा व देह भिन्न आहेत असें ज्ञान होतें. तरी तें ज्ञान दृढ न राहतां विषयाकडे मन वळतें. क्रोध, मोह, लोभ इत्यादि विकार चित्ताचें स्थैर्य करूं देत नाहींत. ह्याकरितां परमार्थबुद्धीनें केलेल्या वेदोदित विहित कर्मांपासून मानसिक विकारांचा पगडा कमी होऊन चित्तशुद्धि होते आणि यथाविधि गुरूपासून ज्ञानमार्गाचा उपदेश झाल्यावर स्वात्मानुभव होतो. नंतर तो ज्ञानी जगांत बालोन्मत्तपिशाचवत् हिंडत असतो. ब्रह्मोपासकाचा देह नदीतटावरील वृक्षाप्रमाणें पडतो, ह्मणजे नदीचे कांठावरील वृक्ष जसे नदीच्या वेगानें पडतात, त्याप्रमाणें ब्रह्मोपासकाचा देह पूर्वकर्मार्जित भोग भोगल्यावर खालीं एकदम त्याला न कळत पडतो. अथवा ज्याप्रमाणें वृक्षावरील पक्षी स्वेच्छेनें वृक्ष सोडून जातो, तसा ज्ञानी-

लोकांचा आत्मा देह सोडून जातो. ( भीष्माचें उदाहरण सर्वांस माहीत आहेच. ) आपलें पुण्य आपली सेवा करणाऱ्या लोकांवर ठेऊन आणि आपलें दुष्कृत आपला उपहास करणाऱ्या व त्रास देणाऱ्या लोकांवर टाकून ध्यानयोगानें ब्रह्मज्ञानी सनातन ब्रह्मपदाला जातो. ब्रह्मज्ञानी झाला आपपरभाव नसल्याकारणानें त्याला शत्रु, मित्र कोठले? अशी शंका आल्यास त्याचें समाधान एवढेंच कीं, साधूंचा छल करणारे त्यांचे शत्रु आणि सेवा करणारे त्यांचे मित्र होत. छल करणाऱ्यांचें नुकसान करावें असें त्याचें गनांत नसतें; परंतु कोणी अग्नीला स्पर्श केला असतां अग्नीचे इच्छेवांचूनदेखील स्पर्श करणाऱ्याचा हात भाजतो, त्याप्रमाणें छल करणारा आपलें नुकसान करून घेतो. अशा-प्रकारें ब्रह्मज्ञान्याच्या पापपुण्याचा विनियोग झाल्यावर तो मोक्षास जातो ह्मणजे त्याचा जन्म नाहींसा होतो. सर्व प्राण्यांना देह आप-आपल्या पुण्यपापापासून झालेल्या कर्माप्रमाणें मिळालेला असतो. आणि हा कर्मापासून उत्पन्न झालेला देह त्याच्या पापपुण्याचा वर सांगि-तल्याप्रमाणें विनियोग झाल्यावर नाहींसा होतो व तो ज्ञानी मोक्षास जातो. जेव्हां मनुष्य सर्व विषय दोषी आहेत असें समजतो आणि विषयाविषयीं निरभिलाष होतो, त्यावेळीं तो ह्या लोकीं सुख भोगून देह-पातानंतर मोक्ष मिळवितो. धृति ह्मणजे संतोष, क्षमा ह्मणजे अपकार केला असतां उपकाराचें आचरण. दम ह्मणजे विकाराला कारण असे विषय पुढें आले असतां विकार न पावणें आणि शीतातपसहि-ष्णुता. अस्तेय ह्मणजे अन्यायानें धनापहार न करणें. शौच ह्मणजे यथाशास्त्र मृत्तिकादिकांनीं देहाचें शोधन. इंद्रियनिग्रह ह्मणजे विषया-पासून इंद्रियांचें आकर्षण. धी ह्मणजे शास्त्रादि तत्वज्ञान. सत्य ह्मणजे खरें बोलणें. अक्रोध ह्मणजे क्रोधाला कारण असतांनादेखील न रागावणें. इत्यादि गुण मोक्षाची इच्छा करणाऱ्या मनुष्यास असले पाहिजेत.

वेद जाणणाऱ्या ब्राह्मणांस यथाशक्ति दान करावें. जें धन यज्ञ, धर्मशाळा, पूल, तळीं इत्यादि सत्कार्यास लागतें, तें देवांना पावतें.

अधर्मानें खर्चलेलें धन दैत्यांना जातें, व त्यापासून पाप उत्पन्न होतें. ब्राह्मणांची वाणी हेंच त्यांचें शस्त्र होय. अज्ञानपणानें केलेलें पाप वेदाभ्यासानें जातें, अथवा गायत्रीजपानें जातें, आणि जें मुद्दाम व मोहानें केलेलें आहे तें पाप प्रायश्चित्तावांचून जात नाहीं. पूर्वींच्या वाईट आचरणानें इहलोकीं मनुष्याला वाईट रूप प्राप्त होतें. सुरा प्यालेला ब्राह्मण कडकडीत तापलेली सुरा (दारू) पिऊन मेल्याशिवाय शुद्ध होत नाहीं. ब्राह्मण दारू प्याला तर पाहिजे तें वाईट काम करील, घाणीमध्यें लोळत पडेल, आणि वेद वगैरे पाहिजे तेथें ह्मणेल, व तो मदानें वेडा होऊन जाईल, कार्याकार्य त्याचे लक्षांत यावयाचें नाहीं, ह्मणून ब्राह्मणांस दारू पिण्याचा निषेध आहे. बालहत्या करणारा, स्त्रीवध करणारा, उपकार करणाऱ्या मनुष्यास मारणारा, या तिघांनीं प्रायश्चित्त घेतलें तरी त्यांच्याशीं संबंध ठेवूं नये. मीं अमुक पाप केलें असें लोकांस सांगण्यानें मी किती पापी आहें असें मनांत येऊन, फार वाईट वाटून पश्चात्ताप झाल्याकारणानें, वेदाध्ययन केल्यानें किंवा यथाविधि प्रायश्चित्त घेतल्यानें मनुष्य पापापासून मुक्त होतो. मनुष्यास खरें वाईट वाटलें पाहिजे आणि पश्चात्तापानें त्याचें हृदय पोळलें पाहिजे ह्मणजे तो शुद्ध होईल. जसजसें पाप करणाऱ्याचें मन वाईट कामापासून निवृत्त होतें, तसतसा तो पापापासून मुक्त होतो. मन, वाणी आणि शरीर यांच्यायोगानें वेदशास्त्रविहित कर्म करावें ह्मणजे पुण्य मिळून स्वर्गादिक उत्तम लोक प्राप्त होतात. देव आणि मनुष्य यांना सर्व सुख तपानें मिळतें. याकरितां तप करावें. संयतात्मे ऋषी तपानेंच सर्व जगांतील स्थावरजंगम पदार्थांचें कार्य आणि त्रैलोक्यांतील सर्व गोष्टी बसल्या ठिकाणावरून जाणत. जें जें जगांमध्यें दुर्लभ, दुःसाध्य आणि दुष्कर आहे तें तें सर्व तपानें मिळतें. तपाचें केवढें माहात्म्य आहे बरें? कारण ब्रह्मदेव तपानेंच सर्व सृष्टि निर्माण करण्यास योग्य झाला. मनूनें हें धर्मशास्त्र तपानेंच निर्माण केलें. ऋषींनीं जी वेदपारंगतता मिळविली तिला तपच कारण होय. आतां सत्व, रज, तम इत्यादि गुण आणि ब्रह्माविषयीं थोडेसें लिहून हा भाग पुरा करूं.

मन, वाणी, आणि शरीर यांपासून उत्पन्न झालेल्या कर्मापासूनच आपणास चांगलें अथवा वाईट फल प्राप्त होतें. मनुष्यास जी उत्तम, मध्यम आणि अधम स्थिति आणि गति प्राप्त होते, तीस कारण त्याचें बरें वाईट कर्म होय. दुसऱ्याचें द्रव्य आपण अपहार कसें करावें असें आपण सतत चिंतन करणें, दुसऱ्याचें नुकसान करण्याची इच्छा करणें, देह हाच आत्मा समजणें, आणि परलोकावर भरंवसा न ठेवणें यांस मानसिक दोष ह्मणतात. कठोर बोलणें, दुसऱ्याची निंदा करणें, असत्य बोलणें आणि असंबद्धप्रलाप करणें हे चार वाणीचे दोष आहेत. अन्यायानें दुसऱ्याचे पैसे उपटणें, हिंसा करणें, दुसऱ्याची स्त्री उपभोगणें हे शारीरिक दोष होत. मनुष्यानें ह्या शारीरिक, (शारीर) मानसिक दोषांपासून दूर रहावें. कारण हे दोष आपल्याकडून घडल्यास पाप उत्पन्न होतें आणि पापापासून नरक भोगावा लागतो. ह्या लोकावर पाहिजे तें कृत्य करून ज्यायोगानें आपणास सुख होईल तसें वागावें; पाप, पुण्य, नरक, स्वर्ग इत्यादि गोष्टी खोट्या आहेत; कारण मनुष्य मेला ह्मणजे त्याचें शरीर येथेंच विसर्जन होतें, मग नरक व स्वर्ग भोगावयास शरीर कोठें आहे? असा जर कोणी प्रश्न केला, तर त्याचा खुलासा असा आहे कीं, शरीरांतील सुखदुःखाचा उपभोग घेणारा आत्मा अविनाशी आहे. त्यास परलोकीं आपल्या कर्माप्रमाणें यमयातना अथवा स्वर्गसुख भोगण्यास दुसरा पंचमहाभूतांचा जरादिव्यतिरिक्त असा देह उत्पन्न होतो. जो मनुष्य भूलोकीं पाप कमी करतो आणि पुण्य अधिक मिळवितो त्यास स्वर्गसुख मिळतें. खऱ्या ज्ञानास सत्वगुण असें ह्मणावें. अज्ञानास तमोगुण आणि मद, मोह व मत्सर यांस रजोगुण ह्मणावें. आत्म्याचे ठिकाणीं प्रीतियुक्त, प्रशांत, दुःख ज्यापासून गेलें आहे असें जें कांहीं प्रकाशरूप भासेल त्यास सत्व ह्मणावें. दुःखानें युक्त ह्मणूनच सत्वशुद्धात्मक प्रीतिविरहित आणि प्राण्यास विषयसेवेची वासना उत्पन्न करणारें आणि ज्ञानाचे प्रतिपक्षी यास रजोगुण असें ह्मणावें; आणि जें मोहयुक्त, अव्यक्त, विषयलंपट, दुर्ज्ञात त्यास तम ह्मणावें. वेदाभ्यास,

तप, ज्ञान, शौच, इंद्रियनिग्रह, धर्म, श्रद्धा आणि आत्माध्यास हें सात्विक गुणाचें लक्षण होय. स्वर्गादि फलार्थ, काम्यकर्मानुष्ठान, लहानशा कार्यार्थदेखील प्रयत्न, निषिद्धकर्माचरण, अतिशय विषयोपभोगाची वासना हें रजोगुणाचें लक्षण होय. लोभ, निद्रा ( अति ), धैर्य नसणें, क्रूरता, नास्तिकपणा, परलोक न मानणें, आचारलोप आणि प्रमाद हें तमोगुणाचें लक्षण आहे. कामप्रधानता तमाचें लक्षण, अर्थप्रधानता रजोगुणाचें, आणि धर्मप्रधानता हें सत्वगुणाचें लक्षण होय. इंद्रियें विषयांचे ठिकाणीं रत केल्यानें, निषिद्ध आचरण केल्यानें, प्रायश्चित्तादि धर्माचें अनुष्ठान न केल्यानें मनुष्य वाईट गतीला जातो. ज्या ज्या भावानें आपण कर्म करतों, तसें तसें या शरीराच्या योगानें आपल्यास फल प्राप्त होतें.

•

वेदाभ्यास, तप, ज्ञान, इंद्रियांचा संयम, अहिंसा, गुरुसेवा हें प्रकृष्ट कल्याणाचें साधन होय. प्रवृत्ति आणि निवृत्तिरूपी दोन प्रकारचें वैदिक कर्म आहे. इह आणि परलोकीं, जें काम्यकर्म त्यास प्रवृतिमार्ग ह्मणतात. भूमीवर राज्यादिसुख मिळावें अथवा मरणानंतर स्वर्गसुख मिळावें ह्मणून जें जपतप करावें, तो प्रवृत्तिमार्ग होय. निष्काम आणि ज्ञानपूर्वक कर्माला निवृत्तिमार्ग ह्मणतात. कोणतीही विशेष कामना मनांत न आणतां ज्ञान मिळण्यास अंतःकरणाची शुद्धि होण्याकरितां जें वेदोदित कर्म करणें त्यास निवृत्तिमार्ग ह्मणावा. प्रवृत्तिमार्गाचें अवलंबन केलें तर स्वर्गादिक प्राप्त होऊन मनुष्य देवाच्या योग्यतेला जातो. आणि निवृत्तिमार्गाचें अवलंबन केलें तर तो मोक्षास जातो. स्थावर जंगम पदार्थांचे ठिकाणीं पंचमहाभूतात्मक मीच आत्मरूपानें आहे, आणि सर्वभूतें परमाणुरूपानें आपल्या ठिकाणीं ह्मणजे परमात्म्याचे ठिकाणीं आहेत असें समजून सर्व कर्में ब्रह्मार्पणन्यायानें करणारा मनुष्य स्वतेजानें शोभणारें स्वराट्रूपी ब्रह्म त्याला प्राप्त होतो, ह्मणजे मोक्षास जातो.

शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पांच विषय आणि सत्व, रज आणि तम हे गुण वेदांपासून उत्पन्न झाले. जो वेदशास्त्र अर्थतः जाणतो व त्याप्रमाणें कर्म करतो तो ह्या लोकींच ब्रह्मत्वाला जातो.

प्रत्यक्ष, अनुमान आणि शास्त्र हीं तीन तत्वज्ञांची प्रमाणें आहेत. जगांतील सर्व गोष्टी आत्मस्वरूपानें मानाव्या ह्मणजे अधर्म होणार नाहीं. कारण आपले मनांतून आपपरभाव नाहींसा होऊन शत्रुमित्र, प्रिय-अप्रिय, सुखदुःख हीं समभावानें सारखींच भासतात. सर्व देवता आत्मस्वरूपीच आहेत. संपूर्ण चराचर आत्म्याचे ठिकाणींच आहेत. सर्वांच्या कर्मयोगाला आत्माच कारण आहे. ब्रह्मादिस्तंबपर्यंत चेतन आणि अचेतन जे जे पदार्थ आहेत त्यांचा शास्ता आत्माच आहे. अग्नीचे ठिकाणीं असलेल्या उष्णपणाला हाच कारण. आदित्यादि ग्रहांच्या भ्रमणाला तोच नियामक आणि सर्व कर्मांचे फलाला जनक परमात्माच होय. त्याच्या भयानें अग्नि आणि सूर्य तपतात. इंद्र, वायु आणि मृत्यु ज्याच्या भयानें धांवतात अशा परमात्म्याचें रूप, अशब्द, अस्पर्श, अरूप, अव्यय, अचिंत्य, अतर्क्य असें श्रुतीनें केलें आहे. ज्याचे ठिकाणीं गुण नसून जो सत्व, रज, तम या तीन गुणाला कारण, जो बाह्येंद्रियांनीं जाणण्यास अयोग्य, ज्याला काळा गोरा वगैरे रूप नाहीं असा, आणि जो वर्तमान, भूत आणि भविष्य या तीनही काळीं असणारा अशा परमात्म्याचें वर्णन श्रुतीदेखील करूं शकणार नाहींत. तथापि तो उपासनाभेदानें शुद्ध सुवर्णासारखा आहे.

ज्याप्रमाणें स्वप्नांतील गोष्टी बाह्येंद्रियें शांत असतांना मनानें जाणल्या जातात, त्याप्रमाणें हा परमात्मा बाह्येंद्रियोपरम असतांना मनानेंच ग्राह्य होय. याज्ञिक ह्याला अग्नि ह्मणतात, सृष्टि उत्पन्न केली ह्मणून ह्यास प्रजापति ह्मणतात, ऐश्वर्यादि गुणांनीं युक्त असल्यावर ह्यास इंद्र ह्मणतात, सर्व जगाला जगण्याला वायुरूपानें कारण आहे ह्मणून ह्यास प्राण ह्मणतात, आणि त्या परमात्म्याची सगुण रूपानें उपासना

करितात; आणि दुसरे ह्याची अपगतप्रपंचात्मक सर्वदानंद स्वरूप निर्गुण निर्विकार अशी उपासना करितात. हा परमात्मा जीवांना त्यांच्या पूर्वजन्मार्जित कर्माप्रमाणें पंचमहाभूतात्मक शरीरें देऊन त्यांची उत्पत्ति, स्थिति आणि लय करून रथचक्राप्रमाणें मोक्ष होईपर्यंत त्यांना नाना जन्म देतो. ह्याप्रमाणें सर्व भूतांचे ठिकाणीं जो आत्मस्वरूपानें आपल्यास पाहतो, तो समतेला प्राप्त होऊन ब्रह्मसाक्षात्कारानें जें उत्तम आणि अक्षय स्थान त्याला जातो ह्मणजे मुक्त होतो.

भाग २ रा.

# राजधर्म.

मनुष्यांमध्यें जर कोणी नियंता नसता, तर समाजबंधनें दृढ राहिलीं नसतीं. कारण बलवान असेल तो दुर्बलांस अन्यायानें वागवील, त्यांचें द्रव्य हरण करील, त्यांच्यावर जुलूम करील; एकंदरींत त्यांनीं मिळविलेल्या गोष्टींचा तो अपहार करील. आपल्या श्रमांचें फल आपणांस मिळत नाहीं, ह्मणून दुर्बलही फारसा उद्योग करणार नाहींत. तेही कसाबसा निर्वाह करून दिवस काढतील. ह्याप्रमाणें समाजशृंखला सुटत जाऊन मनुष्यांचें पशूसारखें आचरण होईल व त्यांस सुख मिळणार नाहीं. ईश्वरानें ज्या चराचर वस्तू उत्पन्न केल्या आहेत, त्यांचा योग्य अनुभव घेऊन आपलें आयुष्य सुखानें व समाधानानें काढावें हें मनुष्यांचें इहलोकींचें कर्तव्य आहे.

हें कर्तव्य बजावण्याकरितां प्रत्येक मनुष्य यथाशक्ति झटत असतो. परंतु सर्व मनुष्यें एकाच दिशेनें जर प्रयत्न करूं लागलीं, तर सर्वांस सर्व गोष्टींचा अनुभव मिळणार नाहीं. याकरितां श्रमविभागाचें तत्व निर्माण झालें. समाजांत एका तुकडीनें शेतकी, दुसरीनें व्यापार, तिसरीनें सेवा अशा प्रकारें व्यवस्था करण्यांत आली. व ही व्यवस्था सरळपणानें चालावी आणि सर्वांनीं आपआपले व्यवहार न्यायानें करावे, ह्मणून राजा अथवा राज्यव्यवस्था चालविणारी मंडळी निर्माण झाली.

इतिहासावरून पाहिलें असतां आपल्या भरतखंडांत सर्व राज्यव्यवस्था मुख्यतः एका व्यक्तीवर अवलंबून असे.

तेव्हां तीस अनुलक्षूनच सर्व राज्य चालविण्याचे धर्म सांगितले आहेत. मनूनें एकव्यक्तिनिष्ठ सर्व राज्यकारभार मनांत आणून राजनीति सांगितली आहे. परंतु हल्लीं जगांत तीन प्रकारची राज्यव्यवस्था चालू आहे. कांहीं देशांत एका व्यक्तीवर राज्यकारभाराचें ओझें असतें. सर्व जबाबदारी एका व्यक्तीवर असते ह्मणजे एका व्यक्तीचे गुणदोषावर सर्व राज्याचें कल्याण अगर नुकसान असतें. त्या व्यक्तीला राजा, बादशहा अगर दुसरें कांहीं तरी नांव देतात. कांहीं देशांत राजघराण्यांतील पुरूष आणि लोकनियुक्त विशिष्ट समुदाय ह्या दोघांच्या विचारावर राज्यकारभार चालत असतो. कांहीं देशांत लोक स्वतः राज्य चालवितात ह्मणजे लोकनियुक्त सभा असते व त्या सभेच्या मार्फत राज्यकारभार चालतो. परंतु एकंदरींत विचार करून पाहतां सर्व राज्यव्यवस्थेंतील राज्य चालविण्याच्या नियमांचें धोरण बहुतकरून सारखेंच असतें. ह्याकरितां मनूच्या राजनीतीचीं तत्वें सामान्येंकरून सर्व पद्धतीस लागू पडतील. कारण सर्व राज्यपद्धतींत पहिली राज्यव्यवस्था मनूचीच होय. ह्मणून मनूनें सांगितलेल्या नीतीचा सारांश पुढें सांगूं.

**मनूनें ह्मटलें आहे कीं—** अराजक असल्यामुळें ह्मणजे सर्व लोकांस नियामक अशी एखादी शक्ति नसल्यामुळें लोकांमध्यें बलवानापासून अधिक भय उत्पन्न होऊन जिकडेतिकडे घोंटाळा उडेल. ह्मणून चराचराच्या पालनाकरितां ईश्वरानें राजास उत्पन्न केलें. राजाचें महत्व फार मोठें आहे. याकरितां त्याच्याशीं आपण प्रामाणिकपणानें आणि लीनतेनें वागावें. कारण राजा रागावला असतां आपलें फार नुकसान होतें. अग्नि ज्याला स्पर्श करितो त्यालाच जाळतो, परंतु राजाचा क्रोधरूपी अग्नि एकट्याचेंच नुकसान न करितां त्याच्या सर्व कुळाचा नाश करितो. यावरून विनाकारण राजाचे विरुद्ध वागून त्याचा द्वेष संपादन केल्यास फार नुकसान होतें. राजाची आपण एखादी कामगिरी बजावली अगर त्याचें कांहीं हित साधलें आणि तो जर प्रसन्न झाला, तर तो

आपल्यास पाहिजे तें देईल अथवा आपल्याबरोबरीचा राजा करील. ह्मणजे राजा जर रागावला तर रावाचा रंक करील, आणि प्रसन्न झाला तर रंकाचा राव करील. राजा इतका तेजोमय आहे कीं, ज्याच्या प्रसादानें लक्ष्मी, पराक्रमानें विजय आणि क्रोधानें मृत्यु प्राप्त होतो. राजानें प्रजेचें योग्य पालन करावें आणि सर्व प्राण्यांचें रक्षण करावें ह्मणून ईश्वरानें धर्मस्वरूप आणि ब्रह्मतेजोमय दंड उत्पन्न केला. आपण कर दिला नाहीं तर, अथवा आपण राजाचा हुकूम अमान्य केला तर, अथवा अन्यायानें दुसऱ्याच्या जीविताचा नाश केला, अथवा दुसऱ्याच्या वित्ताचा अपहार केला तर राजा आपणास शिक्षा करील ही भीति मोठी असते. कारण राजास शासन करण्याचा अधिकार फार महत्वाचा मिळाला आहे, व तो असणें फार अवश्यक आहे. शासन करण्याचा अधिकार नसता तर राजास कोणी जुमानलें नसतें. दंड (शिक्षा करण्याची शक्ति) सर्व प्रजांचें रक्षण करतो. प्रजा अन्यायानें वागल्यास दंडच त्यास शासन करतो. आपआपला व्यवसाय करून लोक निजले असतां दंड त्यांचें दुष्ट लोकांपासून आणि चोरांपासून रक्षण करतो. कारण सरकारच्या हुकुमानें दंडधारी रक्षक प्रजेच्या पालनाकरितां रात्रीं फिरत असतात. त्या कारणांनीं विद्वान् दंडालाच धर्म ह्मणतात. तो दंड राजानें अपराधाच्या प्रमाणास अनुसरून न्यायानें धरल्यास प्रजेंत शांतता राहते आणि ती खूष असते. आणि राजा जर अन्यायानें शासन करील, तर प्रजा नाखूष होतील. राज्यांत घोंटाळा माजेल आणि शेवटीं बंड होऊन राज्याचा नाश होईल. जर राजा अनलसपणानें अपराध्यास वेळेवर योग्य शासन करणार नाहीं, तर बलवान दुर्बलांचा छळ करतील. संपूर्ण लोक दंडाच्या (शिक्षेच्या) भयानें दुसऱ्याची हानि करीत नाहींत. कारण दुसऱ्याचें नुकसान करूं नये ही स्वाभाविक इच्छा असणारे लोक विरळा. ह्मणून दंडाच्याच भयानें सर्व लोक आपला व्यवहार सुरळीतपणानें करतात, आणि आपल्या स्थावरजंगम मालाचा उपभोग घेतात व आपल्या वित्ताचें आणि जीवित्वाचें रक्षण होतें. दंड योग्य रीतीनें चालविला नाहीं, तर संपूर्ण वर्ण नाहींसे होतील, ह्मणजे

वर्णसंकर होईल. सर्व नियम नाहींसे होतील. चौर्यसाहसादिकानें सर्वत्र अनर्थ उडेल. राजानें जर दंड न्यायानें धरला, तर त्याचे हातून प्रजापालनरूपी सत्कार्य घडेल, त्याचे हातून लोकांवर अनेक उपकार होतील, आपलें धर्मकार्य योग्य रीतीनें चालेल. प्रजा संतुष्ट असल्याकारणानें वेळेवर सरकारी कर देईल, व्यापार वाढेल आणि राजाचा कोशसंचयही अधिक होईल. आणि त्यास स्त्री, पुत्र, राज्य, संपत्ति, ऐश्वर्य, यांपासून सर्व ऐहिक सुख मिळेल. असे त्याचे धर्म, अर्थ, काम हे तीनही पुरुषार्थ साधतील. दुष्ट लोकांपासून गरीब लोकांचें पालन केल्यानें [ जें त्याचें खरें कर्तव्य आहे ] त्यास पुण्य लागतें आणि परलोकींही सुख लागतें. न्यायानें काम चालल्यामुळें, बंड वगैरे होत नाहीं, राज्यांत शांतता राहते. या कारणानें दुसरे देश जिंकून आपल्या देशाची संपत्ति वाढवितां येते. दंड जर अन्यायानें धरिला तर, अमात्य अथवा प्रजा राजाचे विरुद्ध कारस्थानें करून त्याचा नाश करितात. याकरितां राग लोभ सोडून, खरेपणानें, राजनीतीच्या नियमानें, तत्वविचारानें आणि चांगल्या लोकांचें साहाय्य घेऊन राजानें दंड धारण करावा. राजानें राज्यलक्ष्मीचे-योगानें आणि ऐश्वर्यानें मत्त होऊं नये. विनयशील असावें. राजा शुद्ध आचरणाचा आणि शुद्ध मनाचा असला ह्मणजे प्रजेवर त्याचा दरारा असतो. शुद्ध वर्तनाचा, बोलल्याप्रमाणें वागणारा, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, याप्रमाणें राज्यव्यवस्था चालविणारा राजा असला ह्मणजे, त्याचा अधिकार अनियंत्रित व अबाधित चालतो. विद्वान् ब्राह्मण आणि वृद्ध ह्यांच्याशीं राजानें विनीत असावें, ह्मणजे विनयानें ते तुष्ट होऊन, त्याचें आशीर्वादपूर्वक कल्याण चिंतितील. विनयशील राजा केव्हांही नाश पावत नाहीं.

राजानें आपलीं इंद्रियें ताब्यांत ठेवावीं, आणि विषयोपभोगाची लालसा केव्हांही फार वाढवूं नये. ह्मणजे विषयांचा उपभोग करावा, पण त्यामध्यें गर्क होऊं नये. कारण विषयांमध्यें गर्क झालेल्या राजास प्रजेचीं गाऱ्हाणीं आणि त्यांच्या गरजा कळत नाहींत. वाईट आणि

छांदिष्ट लोकांची संगत लागून आलस्य आणि चैन वाढते, आणि त्यायोगें तो राजा प्रजापालनास असमर्थ होतो. जितेंद्रिय राजा प्रजेस योग्य मार्गानें वर्तविण्यास समर्थ होतो. सोंगट्या, फांसे वगैरे अक्षक्रीडा, शिकार, दिवसास निद्रा, विनाकारण दुसऱ्यांच्या दोषांचें आविष्करण, विषयसुखाची अनावर इच्छा, मद्यपानानें अथवा ऐश्वर्यानें आलेला मद, नाचणें, गाणें, व्यर्थ भटकणें, ह्यांस देहाचा सुखेच्छागण ह्मणावा. वर सांगितलेल्या गणांतील गोष्टींनीं आपल्यास तात्कालिक सुख वाटतें व आपल्या मनाची तिकडे प्रवृत्ति होते. राजास क्रोध आला असतां त्याचेकडून, दुष्टपणा, साहस, द्रोह, ईर्षा, दुसऱ्याचें कल्याण झालेलें न सहन होणें, द्रव्यहरण करणें, कडक वाणीनें निर्भर्त्सना करणें, आणि अन्यायानें शिक्षेचा अंमल करणें, इत्यादि गोष्टी घडतात. ह्यांस क्रोधापासून उत्पन्न झालेला गण असें ह्मटलें आहे. वर सांगितलेल्या गोष्टीस लोभ कारण आहे. दुसऱ्याची एखादी उतम वस्तु पाहिली ह्मणजे आपलें मन तिजवर बसतें, आपल्याजवळ ती वस्तु असावी अशी इच्छा उत्पन्न होते. इच्छेप्रमाणें ती वस्तु न मिळाल्यास क्रोध येतो. ह्मणून लोभ हा क्रोधापासून उत्पन्न झालेल्या व कामापासून उत्पन्न झालेल्या दोनही गणांस कारण आहे. ह्मणून राजानें आधीं लोभ जिंकावा. वर सांगितलेल्या विषयांपासून राजा परावृत्त न होतां त्यांचे ठिकाणीं जर आसक्त होईल, तर त्यास व्यसन (संकट) प्राप्त होईल. कारण राज्यांत चाललेल्या दुष्ट लोकांच्या उलाढाली त्यास नाहींशा करतां येणार नाहींत, व शत्रूंचीं दुष्ट कारस्थानें त्यास समजणार नाहींत. यामुळें त्यास योग्य तजविजी करतां येणार नाहींत. ह्मणून राज्यांत घोटाळा माजेल किंवा शत्रूपासून व्यसन प्राप्त होईल. व्यसन मृत्यूपेक्षां फार वाईट आहे. कारण संकट प्राप्त झालें असतां मनुष्य खालीं खालीं जातो. त्यास नानाप्रकारें त्रास होतो. ह्मणून थोर लोकांस संकटापेक्षां मरण आलेलें बरें वाटतें. कारण संकटांतून मुक्त असतां ह्मणजे चांगल्या स्थितींत असतां त्यांस मरण आल्यास ते स्वर्गास जातील. कारण त्यांचे हातून पुष्कळ सत्कार्यें घेडलीं असतात. परंतु त्यांस संकट प्राप्त झाल्यास त्यांचे-

करून अनाचार घडतात, पापें होतात, इहलोकीं दुःख भोगावें लागून परलोकींहि वाईट गति मिळते. ह्याकरितां संकट न येईल अशा आचरणानें राजानें वागावें. येथपर्यंत राजाचें स्वतःचें सामान्य आचरण सांगितलें. आतां त्याचे नोकर कसले असावे ह्यासंबंधीं विचार करूं.

राजानें आपल्या मदतीकारितां पिढिजाद, द्रोहादि दुष्ट गुणांनीं रहित, शूर, सारासारविचार करणारे, युद्धकलानिपुण, कुलीन, देवतादिकांची पूजा करणारे, धार्मिक असे सात किंवा आठ मंत्री नेमावे. मंत्री, पिढीजादे असले ह्मणजे त्यांना राजाचा पूर्वापार संबंध ठाऊक असतो. ते आपल्या नोकरीबद्दल फार काळजी करतात. आणि राजाची सेवा एकनिष्ठपणें करून राज्यव्यवस्था चांगली राखतात. कारण नोकरी पिढीजादी असल्यामुळें ती आपल्या मुलांनाहि मिळणार, आणि ती जर वाईट कृत्यानें हरवली तर आपल्या मुलांचें नुकसान होईल अशी त्यांस भीति असते.

पिढीजादा नोकर सरकारी कामें मोठ्या धडाडीनें करून आपल्या जीविताकडे न पाहतां राजसेवेस तत्पर असतो. कारण त्यास खात्री असते कीं, कदाचित् राजकार्यार्थ आपली प्राणहानि झाल्यास, राजा कृतज्ञ असल्यामुळें आपल्या बायकामुलांचें संगोपन करील. ह्या गोष्टीमुळें अशा नोकरांची राजनिष्ठा मोठी असते. शूर असले ह्मणजे राजा वगैरे राजधानींत नसल्यास मंत्रीच दुसऱ्याची अपेक्षा न करितां शत्रूशीं सामना करून त्याचा पराभव करतात. मंत्री धार्मिक असले ह्मणजे प्रजेचा विश्वास त्यांच्यावर असतो. दक्षता, कुलीनतादि गुण मंत्र्यास अतिशय आवश्यक आहेत. (इंग्लिशांचें कॅबिनेट ह्याच तत्वावर आहे असें ह्मटलें तरी चालेल, अथवा शिवाजीनें नेमलेले आठ प्रधान ह्याच तत्वावर होते आणि ह्मणूनच त्यांची राज्यव्यवस्था सुरेख चालली होती. ) या आठ मंत्र्यांबरोबर सैन्याची, जमाखर्चाची व राज्याच्या बंदोबस्ताची राजानें मसलत करावी. धार्मिक, खरें बोलणारे, लांच न खाणारे असे पुरुष राष्ट्राच्या संरक्षणार्थ नेमावे. यांस अमात्य ह्मणावें. अवांतर

जे नोकर ठेवावयाचे ते उद्योगी, शहाणे, दक्ष असावेत. ह्मणजे कामें वेळेवर बिनबोभाट होऊन राज्यव्यवस्था उत्तम राहते आणि लोकांत बेबंदशाई माजत नाहीं. कुलीन, शूर, दक्ष, शुचि, पैसा न खाणारे, असे मंत्री खजिन्यावर नेमावे ह्मणजे कोशसंचय होतो. पाकशालेवर अथवा खासगीकडे पापभीरु असे लोक नेमावे. कारण राजा घरांत बहुधा एकटाच हिंडतो आणि शस्त्रविरहित असतो. याकरितां वाड्यांत दुष्ट नोकर असल्यास विश्वासघात होऊन शत्रूकडून कांहीं दुष्ट कारस्थान करण्यांत आल्यास प्राणहानि होण्याचा संभव आहे; ह्मणून पापभीरु नोकर ठेवावे ह्मणजे त्याजपासून राजास भीति उत्पन्न होणार नाहीं. सर्व शास्त्रें जाणणारा, आकारावरून आणि चेष्टेवरूनच इंगित समजणारा, दक्ष, शुचि, प्रीतिमान्, स्मरणाचा धड, देशकालज्ञ, सदृढ, वक्ता, अनेक भाषा जाणणारा, असा मनुष्य दूत नेमावा. ह्मणजे दुसऱ्या राष्ट्रांतील प्रधानांस फोडण्यास, शत्रूच्या देशांतील छिद्रें पाहण्यास, शत्रूच्या राज्यांत अनुकूल व प्रतिकूल कोण आहे हें पाहण्यास, आपल्या राज्यांतील चोर वगैरे दुष्ट लोकांस पकडण्यास, आपल्या राज्यांत आलेल्या शत्रूंच्या हेरांस धरण्यास आणि त्यांचीं कारस्थानें बाहेर काढण्यास, वर निर्दिष्ट केलेल्या गुणांनीं युक्त असे दूत असले पाहिजेत. कारण दूत हेच राजाचे डोळे असें मनूनें ह्मटलें आहे. दूतांकडून ह्या बारीक बातम्या काढल्यास लोक आपल्यावर अनुरक्त आहेत किंवा प्रतिकूल आहेत हें समजतें आणि त्यायोगें राजा आपलें वर्तन सुधारतो. भारतादिग्रंथ वाचले ह्मणजे दूतांचीं कारस्थानें आणि खटपटी किती महत्वाच्या आहेत हें समजेल. दुर्ग किंवा किल्ल्यावरील एक शिपाई शत्रूंच्या शंभरांबरोबर लढतो. दुर्गावरील शंभर योद्धे शत्रूंच्या दहा हजार सैन्याबरोबर टक्कर देतात. ह्मणून राज्यांत किल्ले असावेत ह्मणजे शत्रूपासून आपलें रक्षण होतें. धनधान्यादि वस्तू निर्भयपणें त्यांत ठेवितां येतात. राजानें यज्ञयागादि क्रिया नेहमीं कराव्या ह्मणजे ब्राह्मण आणि देव संतुष्ट असतात आणि राजाचें कल्याण चिंतन करतात. दानधर्म करून अनाथांस मदत करावी ह्मणजे प्रजा

संतुष्ट असते. राजानें असें वर्तन करावें कीं जेणेंकरून प्रजेस सुख होईल. कारण प्रजेचें जें सुख तें राजाचें सुख होय. राजा प्रजेचें पालन करीत असतां, त्याच्या बरोबरीच्यानें, त्याहून श्रेष्ठ अथवा त्याच्यापेक्षां कमी मनुष्यानें त्यास युद्धास बोलावल्यास त्यानें रणापासून परतून जाऊं नये. युद्धामध्यें माघार न घेणें, प्रजेचें पालन आणि ब्राह्मणांची शुश्रूषा ह्या गोष्टी राजास श्रेयस्कर होत. आपण वाहनारूढ असतां आणि शत्रु वाहननष्ट झाल्यामुळें भूमीवर असतां, त्यास मारूं नये. नपुंसक, शरण आलेला, असावध, शस्त्ररहित असलेला, दुसऱ्याबरोबर बोलण्यांत गाफील अथवा दुसऱ्याबरोबर युद्ध करण्यांत गुंग झालेला शत्रू असला ह्मणजे त्यास मारूं नये. जे देश आपले ताब्यांत नाहींत ते जिंकण्याची राजानें इच्छा करावी आणि नवीं नवीं राष्ट्रें जिंकून आपला राज्यविस्तार करावा.

जे देश आपले ताब्यांत आहेत त्यांचें प्रयत्नानें रक्षण करावें. त्यांत शत्रूंचा शिरकाव होऊं देऊं नये. मिळविलेल्या राष्ट्रांत व्यापारवृद्धि करून शांतता राखावी. तेथील शूर व हुषार लोकांस चाकरीस ठेवून त्यांस आपलेंसें करावें व दुष्टांचा मोड करून पुंडावा कमी करावा.

रक्षिलेल्या धनाचें वाणिज्यानें वगैरे वर्धन करावें. व्यापारी लोकांना पैसे उसने देऊन त्यांस उत्तेजन द्यावें आणि व्यापार वाढवावा. अशा तऱ्हेनें वाढलेल्या खजिन्याचा पूल, तळीं, धर्मशाळा, किल्ले वगैरे बांधण्याकडे विनियोग करावा. नेहमीं सैन्याची जय्यत तयारी असावी. शस्त्रास्त्रांचे प्रयोग चालू ठेवावेत ह्मणजे राष्ट्रांतील पौरुष कायम राहतें. सैन्यावर राजानें आपली नजर ठेवावी. त्यांचे पगाराचे पैसे वेळेवर द्यावेत. सैनिक लोकांना स्वस्थ राहूं देऊं नये. त्यांची चांगली व्यवस्था राखावी. त्यांतील मुख्य लोकांचे योग्य मानमरातब ठेवावेत. कारण शूर लोक फार कडवे असतात. ते राजाचे जिवास जीव देऊन त्याचें संरक्षण करतील. आणि ते जर उलटले तर राजाचा तत्काल नाश करतील. सैनिकांकडून योग्य काम करून घ्यावें आणि त्यांस योग्य

बक्षीस द्यावें. ह्मणजे ते झटून काम करतील. राजानें मायेनें वागावें ह्मणजे राजाचे मनांत काय आहे हें सर्वांस कळूं नये. परंतु राजानें आपल्या प्रधानाशीं कपटानें वागूं नये. राजाचें कपट शत्रूंस कळूं नये, परंतु शत्रूंचें कपट मात्र त्यास कळावें. राजानें आपले हेतू गुप्त ठेवून शत्रूंचीं छिद्रें बाहेर काढावीं. आपल्या प्रजेशीं निष्कपटानें वागावें; परंतु शत्रूंचीं कपटें दूतांकडून पाहत असावें. राजाचें छिद्र ( कमीपणा ) दुसऱ्यास कळूं नये; परंतु राजानें दुसऱ्याचें छिद्र मात्र जाणत असावें. कूर्माप्रमाणें आपलें राष्ट्ररूपी अंग राखावें. बकाप्रमाणें द्रव्य चिंतन करावें. ह्मणजे बगळा जसा डोळे मिटून नदीच्याकडेस बसतो आणि मासा आला कीं लागलेंच त्याजवर झडप घालतो, त्याप्रमाणें राजानें आपले हेतू मनांत ठेवून दुसऱ्यास समजूं देऊं नयेत; आणि प्रसंग आला कीं तो न दवडतां आपला इष्ट हेतु साधावा. प्रसंगीं मागेंपुढें न पाहतां सिंहाप्रमाणें शत्रूवर हल्ला करावा आणि पराक्रम गाजवावा. ज्याप्रमाणें लांडगा गाफिल मेंढ्यावर हल्ला करतो आणि त्यास मारतो, त्याप्रमाणें राजानें शत्रू किल्ल्यामध्यें असतांनादेखील गाफिल आहे अशी संधि राखून त्यास मारावें. आणि ससा जसा पारध्यापासून पळून आपल्या झुडपांतील बिळांत लपून बसतो, त्याप्रमाणें राजानें शत्रूबरोबर आपला टिकाव लागत नाहीं असें पाहून पराक्रमी शत्रूपासून आपल्या गुप्त किल्ल्यांत पळून जावें. ह्याप्रमाणें देश जिंकीत असतां जे आपल्यास आड येतील त्यांस सामादिकांनीं वश करावे. साम आणि दंड यांची विद्वान् प्रशंसा करतात. ज्याप्रमाणें शेतकरी एकदम उगवलेलें धान्य आणि तृण, यांपैकीं तृण काढून धान्य राखतो, त्याप्रमाणें समाजापैकीं दुष्ट लोकांचा संहार आणि चांगल्या लोकांचें रक्षण करावें. नाहींतर तृण असलें ह्मणजे धान्यास अवकाश सांपडत नाहीं आणि तें काढलें असतां धान्यास अवधी मिळून तें तरारून वाढतें, तसें दुष्ट लोकांचा संहार केल्यावर चांगल्या लोकांची वृद्धि होऊन राष्ट्रांत गुण वाढतात.

जो राजा अन्यायानें पैसा घेऊन प्रजेस त्रास देतो, त्याचे मुलगे, त्याचें जीवित्व, त्याचे भाऊबंद, इष्टमित्र, यांचा प्रजा रागानें वध करते. आहारादि बंद केल्यानें जसे प्राण्यांचे प्राण क्षीण होतात, तसेंच राष्ट्राला पीडा दिली ह्मणजे राजाचे प्राण क्षीण होतात. जसे जळू, वत्स आणि भ्रमर थोडेंथोडें रक्त, दूध आणि मध पितात, त्याप्रमाणें राजानें वार्षिक कर प्रजेपासून घ्यावे. एकदम कराचें ओझें प्रजेवर घालूं नये. हळू हळू प्रजेचीं ऐपत पाहून कर वाढवावा. प्रसंगाप्रमाणें राजानें तीक्ष्ण अथवा मृदु व्हावें. जर राजा नेहमीं कडकपणानें वागेल, तर प्रजा त्याला भिऊन आपलीं दुःखें सांगणार नाहीं. तो जर सर्वदा मऊपणानें वागेल, तर प्रजा आणि अमात्य वैगेरे नोकर लोक त्याचा हुकूम मानणार नाहींत. आणि राजाची किंमत कमी होऊन प्रधानांचें तेज वाढेल आणि कदाचित् राज्याला धोका येईल. याकरितां राजानें प्रसंगावर नजर देऊन अन्यायाचे वेळीं प्रजेस शासन करण्यासाठीं कडकपणानें वागावें आणि प्रजेनें एखादें उत्तम कार्य बजाविल्यास थोडें शिथिलपणानें वागावें, ह्मणजे तो राजा लोकांस मान्य होतो. राजा जेव्हां काम पहावयास असमर्थ असेल, तेव्हां त्यानें धर्मज्ञ, प्राज्ञ, कुलीन आणि इंद्रियदमनशील अशा मुख्य अमात्यास आपल्या जागीं नेमावें. ज्या देशांतील प्रजाजन दुःखानें आक्रोश करतात आणि चोरांनीं लुटले जातात, त्या देशांतील राजा जिवंत असून मेल्याप्रमाणें होय. राजानें जे नोकर लांच खाऊन प्रजेस फार त्रास देतात, अशा नोकरांपासून प्रजेचें रक्षण करावें. ह्मणजे अशा लोकांस राज्यांतून घालवून द्यावें. प्रजेपासून अन्यायानें फाजील कर घेणें, दुष्ट लोकांपासून त्यांचें रक्षण न करणें, कडक नियम करून प्रजेचा छळ करणें, ह्यांपासून प्रजा फार त्रस्त होऊन प्रजेचा क्रोधरूपी अपूर्व अग्नि उत्पन्न होऊन तो राजाचें कुल, लक्ष्मी आणि प्राण ह्यांस जाळल्यावांचून कधींही शांत होत नाहीं.

आतां राजाचें सामान्य आचरण सांगून न्याय कसा करावा तें सांगूं.

राजानें प्रातःकालीं उठून स्नानसंध्या वगैरे करून सभेमध्यें यावें आणि लोकांचे अर्ज ऐकून त्यांचा न्यायानें योग्य निकाल द्यावा. नंतर अमात्याबरोबर राज्यव्यवस्थेसंबंधीं मसलती कराव्या. ज्या राजाच्या मसलती प्रजेला समजत नाहींत, तो राजा सर्व पृथ्वीचें राज्य करण्यास योग्य होईल. ज्या राजाच्या मसलती गुप्त राहतील, त्याच्याजवळ जरी फार खजिना नसला तरी तो सर्व पृथ्वीचें राज्य करील. संधि, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव आणि संश्रय यांस सहा गुण ह्मणावे. जेव्हां आपलें सैन्य आनंदित, उल्हासी आणि सामना देण्यास तयार आहे, आणि शत्रूचें सैन्य उलट स्थितींत आहे, त्यावेळीं राजानें शत्रूवर हल्ला करावा ह्मणजे बहुधा जय मिळतो. नाहींतर पराभव होतो.

सैन्य जर तयार असेल तर युद्ध कडाक्यानें होईल. ह्मणून राजानें सैन्याची तयारी पाहवी आणि सैनिक जर लढाईस उत्सुक झाले आहेत असें आढळून आलें, तर जयश्रीनें आपल्यास माळ घातली असें खास समजावें.

जेव्हां हत्ती घोडे वगैरे बलानें राजा परिक्षीण असेल, तेव्हां सामदामानें शत्रूंचें परिसांत्वन करावें. ज्यायोगानें शत्रू, मित्र आणि उदासीन अतिशय होणार नाहींत, त्याप्रकारें राजानें सामदानादि प्रयत्नांनीं वागावें. समकालीन पुष्कळ राजांशीं युद्ध करूं नये. एकाचा पराभव केल्यावर त्यास पादाक्रांत करून दुसऱ्यावर हल्ला करावा, ह्मणजे एकाच वेळीं पुष्कळ शत्रू होणार नाहींत. आरंभिलेल्या कार्याचे गुणदोष लवकर पहावे. ह्मणजे त्यापुढें तें कार्य चालू ठेवण्यास अगर तें बंद करण्यास बरें पडेल. भविष्यकाळीं घडणाऱ्या कार्याचे गुणदोष आधीं पहावे, आणि फलाचा ऊहापोह करून नंतर त्या कार्याचा क्रम ठरवावा. घडलेल्या कार्याचे गुणदोष पाहिले असतां नफानुकसान समजतें व त्याप्रमाणें पुढें आपलें वर्तन सुधारतां येतें. ज्याप्रमाणें शत्रू, मित्र आणि उदासीन ह्यांपासून बाधा होणार नाहीं, त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवावें हा साधारण नय होय. ज्यावेळीं शत्रूंचे देश जिंकण्याकरितां

राजा निघतो, त्यावेळीं राजधानीमध्यें हुषार अमात्य आणि शूर सैनिक ठेवावे ह्मणजे राष्ट्राचें चांगलें रक्षण होतें.

शत्रूंच्या सैन्यांतील लोक दानभेदांनें फोडावे. आणि शत्रूच्या राष्ट्रांत निपुण बातमीदार पाठवून तेथील बातमी काढावी. मैदानांत रथ आणि घोडा यांवरून युद्ध करावें. रानांत आणि डोंगरावर धनुष्यानें युद्ध करावें, आणि पटांगणांत तलवारीनें लढावें. ज्या गोष्टी दैवावर अवलंबून आहेत, त्या सोडून बाकीच्याकरितां आपण खटपट करावी. विद्वान्, कुलीन, शूर, दक्ष, दाता, कृतज्ञ, धैर्यशाली आणि स्वधर्मानें वागणारा शत्रू असल्यास तो अजिंक्य आहे. दुष्काळ, शत्रूचा वेढा वगैरे आपत्तींकरितां द्रव्याचें रक्षण करावें. द्रव्य खर्चून बायकोचें रक्षण करावें आणि पाहिजे ते उपाय करून आपलें रक्षण करावें. कारण आपल्यास सर्वांपेक्षां आत्मा प्रिय आहे.

आतांपर्यंत साधारण राजनीति संपली. आतां साक्षीदार, खटल्याचा निकाल वगैरेसंबंधानें थोडेसें लिहूं.

प्रथम सभेंत ( कोर्टांत ) जाण्याचा प्रसंग आणूं नये, आणि एकदां कचेरीची पायरी चढल्यावर खरें असेल तें बोलावें. आणि जो मनुष्य न्यायाधीशांनीं विचारलें असतां ठाऊक असून बोलत नाहीं अथवा खोटें बोलतो त्यास पाप लागतें. आपला खरा मित्र ह्मणजे धर्म होय. कारण ह्या लोकीं आणि परलोकीं आपल्याबरोबर तोच येतो. बाकीचे स्त्रीपुत्रादि येथें रहावयाचे आहेत. ह्मणून आपण स्त्रीपुत्रावर प्रेम करून खोटें बोलूं नये.

न्यायाधीशानें बाह्य चिन्हांवरून वादी, प्रतिवादी, फिर्यादी आणि साक्षीदार यांचें हृद्गत जाणावें. आणि त्यांच्या, बोलण्यावरून आकारावरून, डोळ्यांवरून आणि त्यांचे चेष्टेवरून त्यांचें इंगित जाणावें. जे मनुष्य आपआपलीं कर्मे योग्य रीतीनें करतात, ते जरी दूरच्या प्रदेशांत असले तरी ते सर्व लोकांस प्रिय होतात. बायकामुलें असलेले,

जेथला खटला असेल त्या ठिकाणचेच राहणारे कुलीन आणि खरें बोलणारे असे लोक साक्षीदार असावेत.

कुटुंबवत्सल असल्यामुळें आपण खोटें बोलल्यास लोक आपलें नुकसान करतील आणि राजा आपल्यास शिक्षा करील अशी साक्षीदारास भीति असते. ह्मणून ते खरे बोलतात. साक्षीदार, वादीप्रतिवादी यांचे घरांजवळ राहणारे असले ह्मणजे त्यांस वादीप्रतिवादीची वर्तणूक आणि स्वभाव माहीत असतो, आणि त्यामुळें खरें निघण्याचा संभव अधिक असतो. आप्त, स्नेही, शत्रू, व्याधीनें पीडिलेले, असे लोक साक्षीदार असूं नयेत. आपले आप्त व मित्र असल्यास ते आपल्यासारखें बोलतील. कारण असे लोक जगांत फार थोडे आहेत कीं जे आपल्या मित्राचें नुकसान होत असतां आणि त्याचे उलट पक्षाचा फायदा होत असतां खरें असेल तेवढें बोलतील. बरें, साक्षीदार हे वादीप्रतिवादी यांचे शत्रू असल्यास ते बहुधा प्रतिकूलच बोलतील आणि खरें समजणार नाहीं. व्याधीनें पीडिलेला मनुष्य आपल्या देहास कंटाळलेला असतो, आणि त्याचें मन दुःखित असल्यामुळें तो पाहिजे तें बोलण्याचा संभव आहे; आणि त्यायोगें खरी हकीगत बाहेर येणार नाहीं. ही साक्षीदाराची निवड जमिनीच्या देवघेवीच्या वगैरे खटल्यांत सांगितली आहे. ह्मणजे हल्लींच्या कायद्याप्रमाणें मुलकी आणि दिवाणी कामांत होय. आणि मारामारीचे वगैरे फौजदारी खटल्यांत जे प्रत्यक्ष पाहिलेले आणि समजणारे साक्षीदार मिळतील, मग ते कोणीही असोत, ते दिल्यास चालतील.

साक्षीदारानें जें पाहिलें असेल आणि ऐकिलें असेल तेंच सांगावें. ह्मणजे धर्म आणि अर्थ ह्यांपासून त्याचा नाश होत नाहीं. खरें बोलण्यानें धर्म वाढतो ह्मणून साक्षीदारानें सत्य बोलावें. स्वर्गलोक, पृथ्वी, पाणी, हृदय, चंद्र, सूर्य, अग्नि, वायु, यम, रात्र आणि संध्याकाळ व धर्म हे सर्व प्राण्यांचें सर्व कृत्य जाणतात. हें कर्म आपण एकांतांत केलें, मजला कोणी पाहिलें नाहीं असें मनांत आणून जर कोणी

पाहिजे तें कृत्य करील, तर त्यानें लक्षांत ठेवावें कीं, आपलें सर्व कर्म कोणी जरी पाहिलें नाहीं, तरी वर सांगितलेल्या देवता आपलीं सर्व कर्में पाहतात आणि त्या देवाजवळ आपल्याविरुद्ध अथवा अनुकूल साक्ष देतात. त्याप्रमाणें आपल्यास नरक अथवा स्वर्गसुख भोगावयास मिळेल हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें. जें जें कृत्य आपण करतों त्याचें फल भोगल्यावांचून सुटत नाहीं, असें मनांत आणून लहानशा ऐहिक सुखाकडे लक्ष्य न देतां आपण खरें बोलावें. खोटें बोलल्यापासून जर मनुष्याचा जीव वांचत असला, तर खोटें बोलावें. तें खोटें बोलणें खऱ्या बोलण्याहून अधिक श्रेयस्कर आहे. उदाहरणार्थ एक मनुष्य धांवत येऊन एका गुप्त ठिकाणीं लपला आहे. आणि इतक्यांत त्याचा शत्रू हातांत तलवार घेऊन त्याला ठार मारण्याचे उद्देशानें त्याचे पाठोपाठ आला; परंतु त्यास तो लपलेला कोठें दिसेना. आतां त्यानें जर आपणास पुसलें कीं, तुह्मीं इकडून अमुक तऱ्हेचा अथवा अमुक पोषाक घातलेला मनुष्य पाहिला काय? तर आपण ठाऊक नाहीं, असें उत्तर देऊन खोटें बोलावें, अथवा खरें बोलण्याचा निश्चय करून त्या मनुष्याचा जीव घेण्यास तयार व्हावें?

"लपलेल्या मनुष्यानें मारणाऱ्या मनुष्याचा कांहीं मोठा अपराध केला असल्याचें जर आपणास माहीत नसेल व मारणारा मनुष्य न्यायी, खरें बोलणारा अथवा नीच आणि दुष्ट आहे हेंही आपणास माहीत नाहीं, तर आपण आपल्यास ठाऊक नाहीं असें बोलावें. ह्या खोटें बोलण्यापासून पाप लागत नाहीं. परंतु अमुक मनुष्यानें अपराध केला आहे आणि त्यास मिळत आहे ही शिक्षा योग्य आहे असें जर आपणास माहीत आहे, तर आपण खोटें बोलूं नये. शिक्षा करण्यास अयोग्य ह्मणजे अनपराधी यास दंड करणारा राजा व अपराध्यास शिक्षा न करितां सोडणारा राजा असला ह्मणजे त्याचा दुर्लौकिक होतो आणि तो राजा मरणानंतर नरकांत जातो.

राजानें व्यापारी लोक खोट्या तराजूनें अथवा मापानें मोजून लोकांस फसवितात कीं काय हें नेहमीं पहावें. सीमावाद वगैरे कचेरींत खऱ्या प्रकारानें तुटत नसल्यास आपण त्या जागेस जाऊन तेथील लोकांस विचारून न्याय करावा. अशा प्रसंगीं रानांतील लाकूड तोडणारे, शिकारी, भिल्ल वगैरे नेहमीं रानांत फिरणारे लोक साक्षीदार असावे. कारण त्यांस बहुधा वादाच्या खऱ्या गोष्टी ठाऊक असतात. ज्या तऱ्हेनें प्रजेस खरा न्याय मिळेल तशी तजवीज राजानें ठेवावी. कोणी एखाद्यानें दुसऱ्याचे पैसे उपटल्यास राजानें मालकास त्याचे पैसे परत आणून द्यावे. विवाहादि क्रिया अबाधित चालवून आणि प्रजेचें रक्षण करून आपलें बल राजानें वाढवावें. ह्याकरितां राजानें जितक्रोध आणि जितें-द्रिय असावें. यमाप्रमाणें प्रिय, अप्रिय पाहूं नये. योग्य आणि न्याय अनुसरून असेल तेंच करावें. यम जसा प्राणहरण करावयाचे वेळीं विद्वान्, मूढ, श्रीमंत, दरिद्री, राजा, रंक, इत्यादि भेद करीत नाहीं, आयुष्य संपलें ह्मणजे मग तो कोणी कां असेना त्यास तो नेतो आणि त्याच्या कर्माप्रमाणें त्यास फल देतो; त्याप्रमाणें राजानें न्याय देण्याचे वेळीं आपपरभाव मनांत आणूं नये. अपराधाचे वेळीं पुत्रादि आपल्या प्रिय माणसांस शिक्षा न करितां सोडून देणें आणि आपल्या अप्रिय मनुष्यांस कडक शिक्षा करणें इत्यादि गोष्टी वर्ज्य कराव्या. क्रोध लोभानें जो राजा प्रजेच्या खटल्याचे निकाल अन्यायानें करतो, त्याचे देशावर प्रजा रागावल्या कारणानें लवकर शत्रू येऊन त्या राजाचा पराभव करतो. जो राजा दुष्ट लोकां-पासून प्रजेचें आणि साधु लोकांचें रक्षण करतो, तोच पूज्य होय. पुण्य-शील लोक तप करून जें पुण्य करतात, त्यांतला सहावा भाग त्यांचें रक्षण केल्यामुळें राजास मिळतो. जो राजा न्यायाच्या मर्यादा सोडतो, जो नास्तिक, परलोकावर भरंवसा न ठेवणारा असतो, तो शेवटीं वाईट स्थितीला जाऊन मरणानंतर नरकास जातो. चोरांचें जर शासन केलें नाहीं, तर त्या चोरांचें पाप राजास लागतें. शिष्यानें जर स्नान-संध्या केली नाहीं, तर गुरु दोषी. भार्या व्यभिचारिणी आहे असें माहीत

असूनही तिकडे जर नवरा दुर्लक्ष्य करितो, तर त्याजबद्दल नवरा दोषी आहे.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या सर्व वर्णांनीं व संकरजातींनीं आपला धर्म बुडूं लागला असतां, आपल्या रक्षणाकरितां, स्त्रिया वगैरे अनाथांवर जुलूम चालू असतां आणि राजा किंवा त्यासारखा कोणी नियंता नसल्यामुळें बंडाळी झाली असतां, सर्वांनीं शस्त्र धरून अन्यायी लोकांचें पारिपत्य करावें, त्यापासून दोष लागत नाहीं. आपल्या अंगावर जर कोणी आपला वध करण्याकारितां चालून आला, तर आपण त्याचा वध करावा, त्यामध्यें दोष नाहीं. कारण, रागानें रागास मारिलें. जो दुसऱ्याच्या बायकोशीं गमन करतो त्यास कडक शिक्षा करावी, कारण त्यापासून वर्णसंकर होऊन अधर्म वाढतो. चारही वर्णांनीं आप-आपल्या बायकांचें रक्षण करावें.

परदेशांतून माल किती आला आणि आपल्या देशांतून बाहेर माल किती गेला, हें पाहून व नफानुकसान काय झालें, हें पाहून ज्यायोगें व्यापारी लोकांस पीडा होणार नाहीं आणि गिऱ्हाइकांस महाग मिळणार नाहीं त्या मानानें पदार्थांची किंमत ठेवावी.

प्रतिदिवशीं राजानें आपला खजिना तपासावा आणि आपला जमा-खर्च पहावा. हयगय करूं नये. पैसे खाऊन सरकारी काम करणारा, नाना वेषधारी, शत्रूंचे दूत, वेश्या, शिल्पी, कारागीर, चिकित्सक (वैद्य), गारोडी, ज्योतिषी वगैरे लोक प्रजा लुटतात, यांना देशकंटक ह्मणावें. ह्यांच्यापासून राजानें प्रजेचें रक्षण करावें. पूर्वींचे चोरी करणारे व सरकारी शिक्षा भोगलेले लोक ह्यांस चोर वगैरे दुष्ट लोकांस पकडण्यास ठेवावे. कारण त्यांना चोरांच्या कृती ठाऊक असतात, व त्यांचीं लपण्याचीं ठिकाणें, चोरवाटा वगैरे त्यांस माहीत असतात. दूतांकडून राजानें आपली व शत्रूची शक्ति पहावी. आरंभलेलीं कार्यें पुनः पुनः दमादमानें आरंभावीं, ह्मणजे शेवटीं जयश्री राजास माळ घालते. कृत, त्रेत, द्वापार आणि कलि ह्या सर्व युगांस राजाचें

वर्तन कारण आहे. कारण राजालाच युग ह्मटलें आहे. अज्ञानानें आणि आळसानें राजा निरुद्योगी झाला, तर त्याला कलि ह्मणावें. नफा, नुकसान कळूनही जेव्हां राजा आपला फायदा साधण्यास प्रयत्न करीत नाहीं, तेव्हां त्यास द्वापार ह्मणावें. जेव्हां कर्मानुष्ठानास लागतो तेव्हां त्यास त्रेता ह्मणावें आणि जेव्हां यथाशास्त्र कर्में करतो, तेव्हां त्यास कृत-युग ह्मणावें. यावरून 'राजा कालस्य कारणम्' असें ह्मटलें आहे तें बरोबर आहे. राजाच्या वर्तनाप्रमाणें राजास आणि प्रजेस सुखदुःख भोगावें लागतें. जसा सर्व जगाला व्यापून वायु राहतो, त्याप्रमाणें सर्व राष्ट्रांतून राजानें दूत ठेवावे. ज्याप्रमाणें पौर्णिमेच्या चंद्रास पाहून सर्वांस आनंद होतो, तसें आपलें सुवर्तन ठेऊन राजानें प्रजेस आनंदजनक व्हावें. जसें सर्व भूतांना पृथ्वी धारण करते, तसें राजानें सर्व चरांचरांचें पालन करावें. चंद्र, सूर्य, अग्नि, वायु, इंद्र, यम, कुबेर आणि वरुण ह्या अष्टलोकपाळांचा अंशभूत राजाचा देह असतो. ह्याप्रमाणें राजानें प्रजेचें आणि प्रजेनें राजाचें असें एकमेकांचें कल्याण चिंतन करावें ह्मणजे दोघांसही सुख होतें.

---

## भाग ३ रा.

# सामान्य धर्म (कर्तव्य).

हे धर्म मनूनें त्या त्या आश्रमाचे वेळींच सांगितले आहेत; परंतु आतां यथाशास्त्र आश्रमव्यवस्था बहुतेक नष्ट झाल्यामुळें, ते ते धर्म त्या त्या आश्रमांत पाळण्यांत येत नाहींत. आणि हे नियम सर्व जातींच्या लोकांना आणि सर्व मतांच्या समाजाला मान्य होण्यासारखे आणि उपयोगी पडण्यासारखे असल्यामुळें निरनिराळ्या अध्यायांतून घेऊन ह्या भागांत एकत्र केले आहेत.

मनुष्य जेव्हां अध्ययन करीत असतो ह्मणजे जेव्हां त्याच्यावर संसाराचा भार नसून लहान वय असल्यामुळें नवें ज्ञान मिळविणें आणि त्याजबद्दल उद्योग करणें हेंच त्याचें कर्तव्य असतें, त्यावेळीं त्यास कोणाची पर्वा नसते. ज्ञान देणारा गुरु आणि अन्न देऊन पोषण करणारे मातापितर ह्यांशिवाय त्याचा फारसा दुसऱ्याशीं संबंध नसतो. विद्यार्थी मनुष्याला राजा व रंक दोघे सारखे असतात. कारण दोघांशींही त्याला कांहीं कर्तव्य नसतें. असे विद्यार्जनाचे दिवस मोठे मौजेचे आणि आनंदाचे असतात. विद्या संपादल्यावर आपण विवाह करून उपजीविकेचें साधन मिळविण्याकडे लागतों. आणि नंतर आपणास अनेक नवीन काळज्या उत्पन्न होतात. पुष्कळ लोकांशीं आपला नवीन संबंध जडतो. यामुळें बरें किंवा वाईट ह्मणून घेण्याचे हेच दिवस असतात. समाजाशीं आपला निकट संबंध अनेक प्रकारें वारंवार जमतो, याकरितां यावेळीं आपण फार सावधगिरीनें वागलें पाहिजे. व लोकांकडून बरें ह्मणून घेतलें पाहिजे. लोकांशीं कसें वागावें ह्याकरितां आपण मोठमोठ्या लोकांचें वर्तन पाहिलें पाहिजे. विद्वान् व

शहाण्या अनुभवलेल्या लोकांत स्वायंभु मनू हा आद्य आहे ह्मणून विवाहादि सामान्य गोष्टीविषयीं मनूचें काय मत आहे हें पाहूं.

पुरुष जन्मास आल्यापासून त्यांस वैदिक संस्कार सुरू होतात; परंतु पुरुषांच्या उपनयनाप्रमाणें स्त्रियांचा विवाह हाच वैदिक संस्कार आहे. ह्मणजे मुलांचें उपनयन होईपर्यंत जसा त्यांच्या वर्तनास प्रतिबंध नसतो, त्याप्रमाणें स्त्रियांचे विवाह होईपर्यंत त्यांचें अप्रतिबद्ध वर्तन असतें. विद्या संपादन केल्यावर आपण विवाह करावा, आणि संसाराचा भार आपले शिरावर घेऊन आपल्या स्त्रीसह आपण मातापितरांस मदत करावी. ह्मणजे ते संसारभार वाहून दमून गेलेले आणि वृद्ध झालेले असतात, ह्यामुळें त्यांस योग्य वेळीं मदत केल्यामुळें त्यांस आनंद होतो व ते आपल्यास आशीर्वाद देतात. आपण आपल्या जातींतील स्त्रीबरोबर विवाह करावा. वधू ( नवरी ) चांगल्या कुलांत उत्पन्न झालेली व रूपवती असावी. उत्तम कुलांतील वधू असली ह्मणजे तिला योग्य चालीरीती माहित असतात. जिचा पिता, भ्राता अगर आप्त आपल्यास ठाऊक नाहींत, ती जरी गुणवती व रूपवती असली तरी तिच्याशीं विवाह करूं नये. कारण तिचें कुल आपणास ठाऊक नसतें. सर्व गोष्टींपेक्षां आधीं कुल पाहिलें पाहिजे. कारण ज्याप्रमाणें तिचें कुल असेल, त्याप्रमाणें तिचे मानसिक विचार बहुतकरून असतात. कान, डोळा, हात, पाय इत्यादि कोणत्याही अंगांनीं ती हीन असूं नये. कारण आंधळी पांगळी असली ह्मणजे गृहकृत्यें योग्य रीतीनें चालणार नाहींत. वाचाळ, उद्धट अशी असूं नये. एकंदरींत कुल, शील, रूप पाहून आपल्या गोत्रांतील खेरीजकरून आपल्या वर्णांतील स्त्रीबरोबर विवाह करावा. जो ब्राह्मण शूद्रस्त्रीपासून पुत्राची उत्पत्ति करतो, तो ब्राह्मण्यापासून नष्ट होतो. पूर्वींच्या युगांत आठ प्रकारचा विवाह होता. त्यांचीं नांवें:–ब्राह्म, आर्ष, दैव, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस आणि पैशाच. परंतु त्यांतील सर्व नष्ट होऊन ब्राह्म अथवा ब्राह्मासारखाच विधी चालू आहे. वेदाध्ययन

केलेल्या ब्राह्मणास आपण बोलावून अलंकृत कन्या दान केली ह्मणजे, ब्राह्मणविवाह झाला. ही पद्धत ब्राह्मणांत चालू आहे, आणि इतर जातींत ब्राह्म, गांधर्व आणि पैशाच ह्यांची भेसळ होऊन नव्या पद्धतीचा विवाह चालू आहे.

शास्त्रांत सांगितलेल्या वधूशीं यथाशास्त्र विवाह केल्यावर रूपवान् सत्वगुणयुक्त, धनवान्, यशस्वी, धर्मिष्ठ, पुष्कळ आयुष्य असलेले पुत्र उत्पन्न होतात. धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें विवाह केल्यास चांगली प्रजा उत्पन्न होते व निंद्य विवाहापासून वाईट प्रजा उत्पन्न होते. ह्मणून निंद्य विवाह वर्ज करावे.

## स्त्रियांस कसें वागवावें.

स्त्रियांना मान द्यावा. त्यांचें पोषण करावें. विनाकारण त्यांस वाईट शब्दांनीं बोलूं नये व त्यांचा तिरस्कार करूं नये. ज्या घरांत स्त्रियांचा योग्य मान राहिल्यानें त्या आनंदित असतात, त्या घरांत सर्व देवता प्रसन्न असतात. स्त्रिया जर प्रसन्न असतील, तर त्या देवताकृत्याला मनापासून झटतील. यथाविधि पूजा झाल्यामुळें देवता संतुष्ट होतील. ज्या घरांत स्त्रियांना दुःख होतें, त्या घरांत सौख्य वाढत नाहीं व कांहीं दिवसांनीं तें कुल नष्ट होतें. नवराबायकोमध्यें भांडण होतें. नवराबायकोमध्यें कलह असल्यामुळें मुलांचें संगोपन चांगलें होत नाहीं. त्यांना योग्य शिक्षण मिळत नाहीं. अशामुळें संतति चांगली होत नाहीं, ह्मणून कुल वाईट दशेला जातें. ज्या घरांत भार्या नवऱ्यावर व नवरा भार्येवर संतुष्ट असतो व तीं आपआपलीं कामें योग्य मार्गानें करतात, त्या घरांत सुख नेहमीं वाढतें. स्त्रियेनें आपल्या नवऱ्यावर व नवऱ्यानें आपल्या बायकोवर एकनिष्ठ प्रीति करावी. ह्मणजे बायकांनीं पर पुरुषावर व पुरुषांनीं परस्त्रीवर मन ठेऊं नये. ज्या स्त्रिया पातिव्रत्यानें वागतात, ह्मणजे आपल्या पतीखेरीज दुसऱ्या पुरुषापासून सुखाची इच्छा न करितां पतीपासूनच सुख इच्छितात, त्या सर्व कुलाला शोभा देतात. कुविवाहानें, सदाचारानें न वागल्यानें,

वेदाध्ययन न केल्यानें, ब्राह्मणांचीं वगैरे उत्तम कुळें वाईट होतात. बालपणीं बापाचे ताब्यांत, यौवनीं पतीच्या आज्ञेत, आणि पतीच्या पाठीमागें पुत्राचे मताप्रमाणें स्त्रियांनीं वागावें. स्वतंत्रपणानें त्यांनीं केव्हांही वागूं नये. स्त्री या तिघांना सोडून एकटी व स्वतंत्रपणानें राहिली तर ती बिघडण्याचा संभव आहे, आणि ती बिघडली ह्मणजे नवऱ्याच्या आणि बापाच्या कुळाला कलंक लावते. याकरितां स्त्रियांनीं पतीपासून, पित्यापासून आणि पुत्रापासून विरहाची इच्छा करूं नये. स्त्रियांनीं गृहकार्यामध्यें दक्ष असावें.

## स्त्रियांकडे असणारीं कामें.

ज्या पुरुषाला पित्यानें आणि पित्याच्या आज्ञेनें भावानें वगैरे दिली, त्याची सेवा तिनें मरेपर्यंत करावी, आणि कदाचित् तो आधीं गेल्यास मागें व्यभिचारानें वागूं नये. सदाचारशून्य, दुसऱ्या स्त्रीवर लंपट, विद्यादि गुणांनीं विरहित असा जरी नवरा असला, तरी सुशील स्त्रीनें त्याची सेवा देवाप्रमाणें करावी.

पतिसेवेवाचून स्त्रियांना दुसरें व्रत नाहीं, दुसरें तप नाहीं किंवा दुसरा यज्ञ नाहीं, कीं ज्याचेयोगानें ती स्वर्गास जाईल. पुत्र झाल्याशिवाय स्वर्गप्राप्ति नाहीं आणि पुत्रासाठीं व्यभिचार करावा असें जर कोणी स्त्री ह्मणेल, तर पुत्र नसतांनाही स्वर्गप्राप्ति होते असें त्यांनीं जाणावें. पुत्रोत्पादन केल्याशिवाय सनक, वालखिल्यादि ब्राह्मण तपानें स्वर्गास गेले. भर्ता मेल्यावर ब्रह्मचारी स्त्री अपुत्रा जरी असली, तरी ती ह्या ऋषीप्रमाणें स्वर्गास जाते. जी स्त्री पुत्राकरितां व्यभिचारानें वागते, ती इहलोकीं निंदेस पात्र होते आणि मेल्यावर नरकाला जाते. जी स्त्री मन, वाणी आणि देह यांनीं पतीशीं व्यभिचार करीत नाहीं, तिला लोक साध्वी ह्मणतात. नंतर ती स्वर्गात पतीबरोबर सुख भोगते.

## स्त्रियांचें रक्षण कसें करावें ?

नवऱ्यांनीं आपआपल्या बायका स्वाधीन ठेवाव्या, प्रतिबंध न करण्यासारख्या अलंकार, भाषण, वर्तन वगैरे गोष्टी करण्यास त्यांस स्वातंत्र्य

देऊन त्यांना आपल्या ताब्यांत ठेवाव्या, आणि त्यांच्या ताब्यांत आपण कधींही राहूं नये. लहान लहान दुःशीलादि गोष्टीपासूनही आपण स्त्रियांचें रक्षण करावें. नाहीं तर स्त्रिया बिघडल्या तर दोनही कुलांना दुःख होतें. तूं अमुकच वस्त्र नेस अगर अमुकच अलंकार घाल, इत्यादि क्षुल्लक गोष्टींत फार जिकीर लावूं नये. परंतु आपल्या इच्छेनें वाटेल तसें वर्तन त्यांना करूं देऊं नये.

पतीनें स्त्रियांना चांगलें वळण लावून त्यांचें वर्तन शुद्ध राखावें, आणि त्यांचें व्यभिचारापासून रक्षण करावें ह्मणजे आपली संतति शुद्ध होते. स्त्री पतिव्रता असल्यामुळें कीर्ति वाढते, नाहीं तर याला आपली बायको राखतां येत नाहीं ह्याचा काय पुरुषार्थ, अशी लोकांत निंदा होते व आपल्या चरित्राला कलंक लागतो. स्त्रिया बिघडल्या ह्मणजे आपले पितर आपणास शाप देतात, कारण पिंडोदकक्रिया त्यांना शुद्धपणानें मिळत नाहींत. आचार नाहींसा होतो, त्यामुळें कुल बिघडतें, संतति अशुद्ध होते, अधर्म वाढतो. ह्याकरितां आपली प्रजा, चरित्र, कुल, आपली कीर्ति आणि आपला धर्म राखण्याकरितां आपण स्त्रियांचें प्रयत्नानें रक्षण करावें ह्मणजे संकर होण्याचें भय नाहींसें होईल. पति हा भार्येचे ठिकाणीं उत्पन्न होऊन पुत्र उत्पन्न करतो, ह्मणून तिला जाया असें ह्मटलें आहे. जसले पुरुष स्त्रियांना सेवन करतील, तसला पुत्र उत्पन्न होतो, ह्मणून संततीची शुद्धि राखण्याकरितां स्त्रियांनीं पती-शिवाय दुसऱ्या पुरुषांचें सेवन करूं नये, व पुरुषांनीं त्यांस पर-पुरुषांपासून राखावें.

पैशाच्या संग्रहाचें, त्याच्या खर्चाचें, घरगुती कामाचें, उपकरणीं वगैरे देवपूजनाचीं भांडीं स्वच्छ ठेवण्याचें आणि गृहसंमार्जनाचें काम स्त्रियांना सांगावें. पुरुषांनीं आपलें उपजीविकेचें साधन मिळवावें व बायकांनीं त्याची व्यवस्था लावावी. असा श्रमविभाग करावा. पुरु-षानें महत्वाचीं कामें संभाळावीं, आणि सर्व गृहकृत्यावर नजर ठेवावी,

आणि बायकांनीं प्रपंचाचीं बारीकसारीक सर्व कामें मन लावून करावीं. अशा प्रकारें प्रपंचाचा गाडा स्त्रीपुरुषांनीं सारखेपणानें वाहिला ह्मणजे हलका जातो व त्यापासून ऐहिक प्रपंचसुखाचा लाभ होतो. ( पैशाच्या संग्रहाचें आणि खर्चाचें काम स्त्रियांकडे सांगितल्यावरून त्यांस व्यवहारापुरतें शिक्षण दिलें पाहिजे असें होतें. ) मुलांचें संगोपन करणें आणि घरची टापटीप ठेवणें हेंही त्यांच्याकडे सांगावें. घरगुती कामामध्यें त्यांना स्वतंत्रता द्यावी ह्मणजे त्या नाखुष असणार नाहींत.

बारीकसारीक क्षुद्र कामाबद्दल आपण त्यांना फार जिकीर लावूं नये, आणि साधारण घरचें महत्वाचें कोणतेंही काम आपल्या अनुमोदनावांचून होऊं नये अशी तजवीज ठेवावी. स्त्रियांना क्षुल्लक कामासाठीं रागें भरूं नये, शिव्या देऊं नयेत आणि मारहाणही करूं नये. होतां होईल तों सौम्य शब्दांनीं त्यांचें पारिपत्य करावें. शिक्षा देण्यासारखाच त्यांनीं अपराध केला तर त्यांस लहानशा वेळवाच्या छडीनें अथवा दोरीनें पाठीवरच मारावें आणि दुसरीकडे कोठेंही मारूं नये.

मनुष्यांनीं चांगलें यथाशास्त्र आचरण केलें तर त्यांस कसें सुख लागतें आणि जगांत त्यांची कशी कीर्ति होते, तें सांगून व दुष्ट लोकांना त्यांच्या दुष्ट आचरणापासून शेवटीं त्यांस कसें दुःख होतें व कसा त्रास होतो ह्याचीं त्यांना उदाहरणें सांगावीं. ह्याप्रमाणें स्त्रियांना धर्माधर्माच्या गोष्टी सांगून सत्पुरुष आणि साध्वी स्त्रिया यांचा दृष्टांत देऊन उपदेशानें त्यांचें मन सन्मार्गाकडे लावावें.

स्त्रिया बहुतकरून पुरुषाच्याच वर्तनानें बिघडतात. पुरुष दारू वगैरे पिऊन स्वेच्छाचारी झाल्यामुळें, तो वाईट आणि दुराचारी लोकांच्या संगतीला लागून दुराचरण करूं लागल्यामुळें, पुरुष स्त्रीपासून बाहेर राहिले आणि त्यांस वियोग झाल्यामुळें, नवरा पाहिजे तेथें इकडे तिकडे भटकण्यानें, स्त्रियांना पतिसुख न मिळाल्यामुळें, आणि स्त्री सोडून तो रात्रीं दुसऱ्याच्या घरीं राहिल्यामुळें स्त्रिया बिघडतात.

पुरुषाच्या रूपाकडे, वयाकडे आणि स्थितीकडे स्त्रिया पहात नाहींत. तो तरुण असो अगर म्हातारा असो, रूपवान असो अगर कुरूप असो, श्रीमंत अथवा गरीब असो, तो पुरुष असला ह्मणजे झालें, स्त्रिया त्यापासून सुखाची इच्छा करतात. नवऱ्यांची स्त्रियांवर प्रीति नसली तर त्या व्यभिचारिणी निवतात. याकरितां त्यांला प्रेमानें वागवावें. नवरा चांगला असला ह्मणजे तो सदाचारानें वागून स्त्रियेला प्रेमानें वागवून तीस सन्मार्गास लावतो, ह्मणजे त्या दुष्ट होत नाहींत व चांगल्या निपजतात. स्त्रियांना यथाशक्ति वस्त्रालंकार देऊन आनंदित करावें. स्त्रिया ह्या घरच्या शोभाच होत. स्त्री आणि श्री यामध्यें फरक नाहीं असें मनूनें ह्मटलें आहे. ह्याकरितां स्त्रियांना लक्ष्मीप्रमाणें मान द्यावा. एकंदरींत "गृहिणी गृहमुच्यते" असें ह्मटलें आहे तें योग्य आहे.

स्त्री ही क्षेत्राचे ठिकाणीं आणि पुरुष हा बीजाचे ठिकाणीं आहे. त्यांपासून देहाची उत्पत्ति होते. बीज आणि क्षेत्र यामध्यें बीज श्रेष्ठ आहे. कारण सर्व जगाची उत्पत्ति बीजापासून होय. बायकोच्या पोटाची व्यवस्था करून देशांतराला जावें. नाहींतर स्त्री जरी सुशील असली, तरी पोटाकरितां दुसऱ्या पुरुषांशीं संबंध ठेवील. उन्मत्त, पतित, रोगी मुलगे उत्पन्न करणारा असा जरी नवरा असला, तरी त्याचा त्याग भार्येनें करूं नये. सप्तपदी झाल्यावर विवाह पुरा झाला असें होतें. ( याकरितां अलीकडे कांहीं लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, वाग्निश्चय करावा आणि पुढें मुलें थोर झाल्यावर सप्तपदी करावी. ह्मणजे अकालिक जर कोणी मरेल, तर दुसऱ्याचा पुनरपि विवाह करतां येईल. कारण अलीकडे पुष्कळ तरुण मुलगे अकालीं मृत्युमुखीं पडत आहेत, आणि त्यायोगें मुलींना दुर्दैवेंकरून वैधव्यांत सगळा जन्म काढावा लागतो. ) ऋतुकालींच पूर्वींचे चार दिवस वर्ज करून आपल्या भार्येचे ठिकाणीं पुत्रोत्पादनाकरितां रत व्हावें. स्त्रियांना रजोदर्शनापासून साधारण सोळा दिवस ऋतुकाल असतो. त्यांत पहिले चार दिवस एकादशी आणि त्रयोदशी असे सहा दिवस वर्ज करावे. पर्वदिवस वर्ज करण्यास

पहिल्या भागांत सांगितलें आहे. अति स्त्रीसंभोगापासून आयुष्य, बल, तेज कमी होतें, ह्मणून त्यास बंधन घातलें आहे. परस्त्री-सेवनासारखें आयुष्याची हानि करणारें दुसरें कांहींच नाहीं. ह्याकरितां स्वकल्याण चिंतणाऱ्या मनुष्यानें स्वस्त्री सोडून दुसऱ्याच्या बायकोकडे पाहूं नये.

## विद्यार्थ्यांचीं कर्तव्यें.

ज्या शिष्यापासून शुश्रूषा नाहीं व ज्यापासून धर्म व अर्थ साधत नाहींत, त्या शिष्याला शिकवूं नये. विद्यार्थी जर गरीब असेल तर त्यानें गुरूची सेवा करावी. फलें, पुष्पें वगैरे आणून त्याच्या धर्मकार्यास मदत करावी आणि विद्यार्थी जर संपन्न असेल तर त्यानें गुरूच्या निर्वाहास मदत करावी. ज्यापासून धर्मार्थ साधत नाहींत, अशा शिष्याला दिलेली विद्या माळावर चांगलें बी पेरल्याप्रमाणें फुकट जाते.

जो आपल्याला अर्थशास्त्रादि लौकिक विद्या सांगतो जो वेदशास्त्र शिकवितो, आणि ज्यापासून ब्रह्मज्ञान प्राप्त होतें, त्या तिघांना प्रथम नमस्कार करावा. जो वृद्धांचा मान राखतो आणि त्यांची सेवा करितो त्याचें आयुष्य, बल, कीर्ति आणि यश हीं वाढतात.

गुरूनें सांगितल्यावर अथवा आपण होऊनच शिष्यानें अध्ययनासाठीं यत्न करावा. आणि यथाशक्ति गुरूचें हित साधण्यास झटावें. अध्ययनाचे वेळीं शिष्यानें आपलें शरीर, वाणी, बुद्धि, इंद्रियें आणि मन ताब्यांत ठेवावीं आणि गुरूजवळ त्याकडे मुख करून बसावें. ह्मणजे विषयाकडे मन लागून त्याचें लवकर आकलन होतें. आणि गुरूसही शिकविण्यास हुरूप येऊन तोही शिष्याची विशेष काळजी घेतो. गुरू जर आसनावर बसले असतील, तर आपण नम्रपणानें खालीं उभें रहावें, आणि गुरूजवळ पाहिजे तसें आपण बसूं नये. गुरूचें नांव आपण आदरपूर्वक घ्यावें. गुरूच्या चालण्याची बोलण्याची चेष्टा आपण करूं नये, ह्मणजे त्यास वेडावून दाखवूं नये. आपण गुरूची निंदा आणि थट्टा करूं नये, व ज्या ठिकाणीं गुरूची निंदा चालली, असेल तेथें आपण राहूं नये

अथवा ती ऐकूं नये. गुरूची निंदा आपण केल्यास त्याचा कोप आपल्यावर होतो, आणि मेल्यानंतर आपण वाईट जन्माला जातों. ज्याप्रमाणें कुदळीनें खणतां खणतां भूमीमध्यें पाणी लागतें, त्याप्रमाणें गुरू-शुश्रूषेनें विद्या मिळेते. मातापितरांनीं आपल्या उत्पत्तीला आणि पालनाला जे क्लेश भोगले आणि आपल्यावर जे उपकार केले, त्यांचा प्रत्युपकार आपण शेंकडों वर्षांनींदेखील भरून काढूं शकणार नाहीं. माता पिता आणि आचार्य यांचें आपण प्रिय करावें व त्यांची आपण सेवा करावी. त्यांची सेवा करणें हेंच आपलें तप होय. हे तिघेही आपणास तीन वेदांप्रमाणें पूज्य आहेत. आपली वेदशास्त्रादि विहित विद्या संपल्यावर श्रद्धावान् मनुष्यानें गारुडादिक चांगली विद्या नीच जातीच्या मनुष्यापासूनही घ्यावी. चांडालापासूनही उत्तम गुण घेणें योग्य होय. विषामध्यें अमृत असल्यास विष टाकून अमृत घ्यावें. तसेंच वाईट मनुष्यापासून चांगली गोष्ट घ्यावी. बालापासूनदेखील हित-वचन ग्राह्य आहे. कोणी जर आपल्या हिताची गोष्ट सांगितली, तर मग तो लहान मूल कां असेना, त्याची आपण तो पोर सांगतो अशी अवहेलना करूं नये. व त्याच्या बोलण्याचा अनादर करूं नये. चांगलें वृत्त शत्रूपासूनही घ्यावें. अमेध्य पदार्थापासूनही उत्तम पदार्थ घ्यावेत. त्याप्रमाणें नाना प्रकारच्या विद्या चित्रलेखनादि कला शिल्पशास्त्र हीं कोणापासूनही घ्यावींत. मी श्रीमान् आहें, मी विद्वान् आहें, मी चांगल्या कुलांत जन्म घेतला आहें, इत्यादि अभिमान बाळगूं नये आणि शिकण्याकडे दुर्लक्ष करूं नये.

## गृहस्थाचे वगैरे सामान्य धर्म.

ब्राह्मणाचें खरें कर्तव्य ह्मटलें ह्मणजे धर्मप्राप्ति हें होय. दुसऱ्यास पीडा न देतां अथवा अल्प पीडेनें ब्राह्मणानें उदरनिर्वाहार्थ द्रव्य मिळवावें. जास्त द्रव्य मिळाल्यास ऐहिक क्षणिक विषयोपभोगाच्या सुखाकडे लक्ष्य न देतां, पारमार्थिक, नित्य व नाश न पावणाऱ्या सुखाचा लाभ होण्याक-रितां यज्ञ करावे. ब्राह्मणानें पंचमहायज्ञ नित्य करावे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांनीं पंचमहायज्ञ समंत्रक करावे, आणि शूद्रांनीं मंत्रा-

वांचून करावे. अनिंद्य कर्मे न करितां आणि फार क्लेश न करून प्राणयात्रेपुरताच आपण धनसंचय करावा. वाणिज्यामध्यें खरेखोटेपणा करावा लागतो, आणि सेवा तर श्ववृत्तिच, ह्याकरितां दोन्हीही यथाशक्ति टाकावी. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्या समागमीं ब्राह्मणास कुशल विचारावें. क्षत्रियास अनामय, वैश्याला क्षेम आणि शूद्राला आरोग्य विचारावें. आपण रस्त्यावरून जात असतां जर कोणी गाडीवर बसलेला, ह्यातारा, रोगी, स्त्री, ब्रह्मचारी, लग्नसभारंभास जाणारा वर, आणि गरोदर स्त्री हीं समोरून आलीं असतां अथवा मागाहून आलीं असतां त्यांस आपण बाजूस होऊन लवकर मार्ग द्यावा. सर्व लोकांनीं आपले फार हाल न करितां न्यायानें पैसा मिळवावा आणि सन्मार्गीं खर्च करावा. दुसऱ्याची संपत्ति पाहून आपण खेद मानूं नये. आपल्या खऱ्या प्रयत्नानें जें मिळेल त्यावर संतोषानें रहावें. ज्याला सुखाची इच्छा असेल, त्यानें आपल्या इंद्रियांचा संयम करून संतोषानें रहावें. संतोषमूलकच सुख आहे आणि त्याचा विपर्यय दुःख होय. विषयाचे ठिकाणीं मनाची फार आसक्ति असूं नये. स्नानसंध्यादि कर्मे करून व उपजीविकेचें साधन मिळवून फावलेल्या वेळांत बुद्धीची वृद्धि करणारीं, हितकर, धनधान्य देणारीं, न्याय व्याकरणादि शास्त्रें, अर्थशास्त्रादि व्यवहारशास्त्रें, ज्योतिर्वैद्यकादिशास्त्रें आपण पढावीं. ज्यांत कांहीं फल नाहीं असें कर्म करूं नये. स्वकल्याण चिंतणाऱ्या मनुष्यानें बहुश्रुत ब्राह्मण, क्षत्रिय, आणि सर्प यांचा अपमान करूं नये. बहुश्रुत ब्राह्मण शापानें आपलें नुकसान करील. क्षत्रिय शूर असल्यामुळें तो आपला नाश करील. आणि सर्पासारखा द्वेषी तर मिळणारच नाहीं. आपण प्रयत्न करूनही धनादिप्राप्तीचा आपला इष्ट हेतु साधला नाहीं ह्मणून मी किती अभागी आहें, माझ्यासारखा वाईट मनुष्य जगांतदेखील नाहीं, नको हें जगणें, माझा धिक्कार असो, इत्यादि विचारांनीं आपला स्वतःचा अपमान करूं नये. मरेपर्यंत आपला इष्ट हेतु साधण्याचा प्रयत्न करावा. जगामध्यें कांहीं दुर्लभ आणि अशक्य आहे असें समजूं नये. प्रयत्नांतीं सर्व साधेल. सत्य बोलावें. प्रिय बोलावें. सत्य असून अप्रिय असेल

त बोलूं नये. आणि प्रिय परंतु असत्य असेल तेंही बोलूं नये. असा सनातन धर्म आहे. लोकांस प्रियकर असेल तेवढें बोलावें. आणि कोणाशीं शुष्कवाद व वृथा वैर करूं नये. सकाळीं झुंजुरकें असतांना आणि सायंकाळीं कडोसा पडल्यावर रानांतून वगैरे एकटें गैरमाहितीचे मनुष्याबरोबर प्रवास करूं नये. कारण एखादे वेळीं आपला घात होण्याचा संभव आहे. काणा, लंगडा, अंधळा, मुका आणि मूढ ह्यांची निंदा करूं नये. सदाचरणानें वागणाऱ्या लोकांचें आयुष्य वाढतें. प्रजा दीप्तिमान, बुद्धिमान व तेजस्वी होतात व अक्षय्य धनसंचय होतो. दुराचारी मनुष्यांची लोकांत निंदा होते. आणि शेवटीं त्याला चोहों-कडून दुःख सोसावें लागतें. जी जी गोष्ट पराधीन आहे, तिचा होईल तितका त्याग करावा. जें जें स्वतःस करण्यास योग्य असेल तें तें करावें. कारण जें जें परवश तें तें दुःखमय व जें जें आत्मवश तें तें सुखजनक असतें. हेंच सुखदुःखाचें लक्षण होय. जें जें कर्म केलें असतां करणाऱ्यांच्या आत्म्याची परम तुष्टि होते, तें तें सशास्त्र कर्म करण्याचा प्रयत्न करावा. आणि जें जें कर्म केल्यापासून मनाला खेद होतो, तें तें निंद्य कर्म टाकावें. नास्तिक-पणा, देवतांची निंदा, वेदांची कुचेष्टा, दंभ, मान, क्रोध, आणि क्रूरता इतके दोष वर्ज करावे. धनाभावामुळें खेद आणि दुःख झालें तरी धर्मा-वरील श्रद्धा कमी करूं नये. चांगल्या लोकांशीं संबंध ठेविला ह्मणजे आपली कीर्ति वाढते व कुल उच्च प्रतीला जातें. आणि अधम लोकांशीं स्नेह केला ह्मणजे कुल अधम दशेला जातें. जो द्रव्यासंबंधानें शुद्ध तोच खरा शुद्ध आहे. ह्मणजे अन्यायानें जो द्रव्यार्जन करीत नाहीं, तोच शुद्ध होय. नाहींतर वरपांगीं पुष्कळ शुचिर्भूतपणा दाखवून जो अन्यायानें पैसे मिळवितो, त्यास अशुचीच ह्मटलें पाहिजे. गृहस्थाश्रमा-मध्यें आपण सर्व लोकांना मदत केली पाहिजे. ज्याप्रमाणें प्राणवायु आश्रय करून सर्व लोक राहतात, त्याप्रमाणें ब्रह्मचारी व संन्यासी गृहस्थाश्रम्यावर अवलंबून राहतात.

जो मनुष्य अन्नादिदानानें सर्व लोकांची पूजा करितो, तो ह्या लोकीं कीर्ति मिळवून परलोकीं स्वर्गसुख भोगितो. जो एक रात्र राहतो, त्यास अतिथी ह्मणावें. जो अतिथिपूजा करीत नाहीं, तो भोजन करीत नाहीं. अतिथीपूजनापासून आयुष्य वाढतें, कीर्ति मिळते, आणि हा लोक सोडल्यानंतर स्वर्गसुख मिळतें.

सुवासिनी, सून, लहान मुली, रोगी, आणि गर्भिणी स्त्रिया इत्यादिकांना अगोदर जेवावयास घालावें. अतिथीस, गरीबास, अथवा ब्राह्मणास, शक्ति असूनही, अन्नदान करीत नाहीं, ह्मणजे जो आपल्याकरितांच अन्न शिजवितो, व नैवेद्य वैश्वदेव करीत नाहीं, तो अन्न खात नाहीं, तर पापच खातो असें ह्मणावें. नेहमीं अन्नपूजा करावी ह्मणजे तें आदरानें भक्षण करावें. अन्न पाहिल्याबरोबर आनंद मानावा. त्याची निंदा करूं नये. आणि दररोज असेंच अन्न मिळावें ह्मणून ईश्वरप्रार्थना करावी. अति भोजन हें अजीर्णादि रोग उत्पन्न करतें. त्यापासून आयुष्य कमी होतें. यज्ञयागादि गोष्टी वेळेवर होत नाहींत. यागास विरुद्ध असल्यामुळें तें पुण्यजनक नाहीं आणि हा फार खादाड आहे अशी लोक निंदा करतात.

इंद्रियें जिकलीं असतां सर्व गोष्टी सिद्धीस जातात. जो इंद्रियांना जिंकतो तो सर्व जगासही जिंकील. उपभोगानें इच्छा तृप्त होत नाहीं, तर ती उलट वाढून अनावर होते. उदाहरणार्थ अग्नि तुपानें शांत न होतां अधिक प्रदीप्त होतो. याकरितां संपूर्ण इंद्रियसमूह वश करून आणि मन ताब्यांत ठेऊन, देहास फार त्रास न देतां आपले सर्व मनोरथ साधावेत. कोणी विचारल्याशिवाय बोलूं नये. कोणाला अन्यायानें कांहीं विचारूं नये. जरी आपणास ठाऊक आहे, तरी विद्वानानें ठाऊक नसल्यासारखें वागावें. ज्याचे डोक्यावरील केश पिकले तो वृद्ध नव्हे, ह्मणजे वयानें लहान असून जो विद्येनें मोठा, तो वृद्ध होय. विद्येनें मोठेपणा पाहिजे, वयानें नव्हे. दुसऱ्यास कटु भाषण करूं नये व कोणाचा द्रोह करूं नये. ज्या भाषणानें दुसऱ्यास उद्वेग होईल असें भाषण वर्ज करावें. अवमानाबद्दल विषाद

करूं नये. तर ज्यानें अवमान केला त्याचा प्रतीकार करण्याचें मात्र मनांत धरून त्याबद्दल प्रयत्न करावा. अवमान सहन केल्यापासून सुखानें झोप येते. नाहींतर खेद वाटून चैन पडत नाहीं. सहन केल्यानें सुखानें वेळच्यावेळीं मनुष्य उठतो आणि जगामध्यें व्यवहार करतो. मी विद्वान् व जितेंद्रिय अशा बुद्धीनें स्वस्त्रीभिन्न दुसऱ्या स्त्रीसंनिध एकांतांत राहूं नये. देहधर्माप्रमाणें कामक्रोधादि विकारांना वश होणाऱ्या पुरुषाला 'मग तो विद्वान् असो अगर अविद्वान् असो.' विषय मोह उत्पन्न करण्यास समर्थ आहेत. ह्मणून ह्मटलें आहे कीं, आई, बहीण, मुलगी यांच्याशींदेखील आपण निर्जन प्रदेशांत ह्मणजे एकांतांत राहूं नये. कारण हा बलवान इंद्रियसमूह शास्त्राप्रमाणें चालणाऱ्या विद्वानांसदेखील अतिशय वश करतो.

शृंगारादि चेष्टेनें पुरुषांस मोहवून त्यांचें मन वळविणें हा स्त्रियांचा स्वाभाविकच धर्म होय. ह्मणूनच विद्वान् लोक स्त्रियांवर फार आसक्त असत नाहींत. ह्याकरितां इंद्रियसंयम करून प्रामाणिकपणानें आपण वागावें, ह्मणजे आपलें कल्याण होऊन आपला संसार सुखानें पार पडतो. ब्राह्मणाचा वध करणारा, दारू पिणारा, चोरी करणारा आणि गुरूच्या बायकोशीं व्यवहार करणारा ह्यांस महापातकी ह्मणतात. ह्मणून ह्या पातकांपासून अलिप्त रहावें.

ऋषींच्या समाधानासाठीं मनूनें धर्मशास्त्र सांगितलें. त्याचें येथवर विशेष खोल पाण्यांत न जातां व्यवहारोपयोगीं सार दिलें आहे. वाचक याचा यथायोग्य उपयोग करून घेतील अशी आशा आहे.